
रंगारी
अनघा कुलकर्णी

# रंगारी

लेखक – अरुण कुळकर्णी.

**किंमत -प्रिंट कॉपी रु. १६०-००**

**डिजीटल कॉपी फ्री (eshaity.com)**

**प्रथम आवृत्ती  मे २०२१**

# मनोगत

कोकणात डोंगर पायथ्याला जन्मलेला मी फिरत फिरत बडोद्यापर्यंत पोहोचलो. वाटेत कित्येक लोक भेटले. काही मित्र झाले, काहीच्या ओळखी झाल्या, काही भेटले, बोलत गेले. या सर्वांनी जाता जाता मला एक भेट दिली. त्यांची बोली भाषा, त्यांच्या व्यक्तिमत्वाचे रंग, आठवणीत राहील असा सहवास.

आज केव्हा तरी त्यांचं आठवणीतून दर्शन मिळतं. ठरवलं हे गोष्टीरुपात रंगवता आलं तर पहावं.

जसे दिसले, जसे बोलले तसे रंगवण्याचा हा प्रयत्न करताना त्यांच्या बोली भाषांचा वापर तशाचा तसा करायचा असं ठरवलं. म्हणून लहानपणीच्या मालवणी बोलीचे, पुढे कोल्हापूर, सांगलीच्या वास्तव्यात कुणबाऊ बोलीचे असेच रंग समोर येऊ लागले, मनात साठत गेले. रंगवत गेलो.

तो हा कथा संग्रह “रंगारी”

आपला अभिप्राय कळवा जरूर.

अरुण कुळकर्णी.

Arungk1943@gmail.com

Mob. 7359212211or 7228884030

# श्रेयावली

प्रिंट प्रकाशक व वितरक-

सुहास खोपकर
सुहास्यरेखा प्रकाशन
३, नंदधाम डुप्लेक्स
मांजलपूर, वडोदरा- ३९० ०११
संपर्क – ९०९९९ २५९६८

मुखपृष्ठ व आतील चित्रे-
सुहास जगताप

*या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रूपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.*

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000.. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

डिजिटल प्रकाशन- मे २०२१

ई-साहित्य (esahity.com)

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : १ मे २०२१

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.


# अर्पण

आपल्या बोली भाषांच्या गाठोड्यासह माझ्या मनात घर करून राहिलेल्या आजपर्यंतच्या सर्व कथेतील नायक व नायिका ज्यांनी मला आपल्या गोष्टी सांगीतल्या. आपल्या बोली भाषेतून रंग चढवला. आणि कित्येक वर्षे मनाच्या एका कोपऱ्यांत घर करून राहिले. त्या सर्वांना हे पुस्तक समर्पित.

अरुण कुळकर्णी.

# कथा अनुक्रम

१. मित्राच्या नावाची अजब कहाणी
२. दोन मैल
३. न तुटणारी नाळ
४. विठुआक्का
५. ढाण्या वाघ
६. डॉक्टर.
७. हिरकणी
८. रंगारी



# मित्राच्या नावाची अजब कहाणी

मार्कंडेय श्रीपाद हिरवे हे नाव जबरदस्त असेल तरी मारक्या अगदी साधासुधा सरळ मुलगा होता. "मार्कंडेय" एवढे मोठे भारदस्त नाव तसे घ्यायला जड आणि कोकणात कोणतेही नाव सरळ घेण्याची पद्धत नाही. गणपत या काना मात्रा नसलेल्या सरळ नावाचेही गणप्या केले जाते. शकुंतला हे भारतवर्षातले अत्यंत लाडके नाव सखू होते. तसेच मार्कंडेयचे नाव मारक्या झाले. अगदी घरी, दारी, शाळेत, पेठेत, बसस्टॅंडवर, हॉटेलात सगळीकडे लोक त्याला मारक्या म्हणूनच बोलावीत. अगदी शाळेत असल्यापासून हेच बाळनाव आम्हाला माहीत. शाळेच्या हेडमास्तरनी मात्र काळजीपुर्वक त्याच्या वडीलाना बोलावून, "त्याच्या आत्याने ठेवलेले पाळण्यातले नाव सांगा" असे दरडावून विचारले तेव्हा श्रीपादराव गोपाळराव हिरवे दोन मिनिटे रंगबद्दलणाऱ्या सरड्या प्रमाणे लाल हिरवे होत म्हणाले, "त्याच्या आत्यालाच बोलावतो, आम्ही त्यास मारक्याच म्हणतो हो. काही तरी ऋषि मुनिंचे नाव आहे. काय बरे?" एवढे बोलून श्रीपादराव गहन विचारात गेले. हेडमास्तर म्हणे अर्धा तास कपाळाला हात लावून बसले होते.

एक सुस्कारा टाकत ते म्हणाले, “कठीण आहे! कठीण आहे या गावात शाळा चालवणे.”

ही गोष्ट अशीच्या अशी वर्षानुवर्ष शाळेत सांगीतली जात होती. याचे कारण शाळेचे जिवंत वर्तमानपत्र रघुनाथ तरफे. हा रघुनाथ हेडमास्तरांच्या खोलीत (त्या काळी ऑफिस नव्हते, फक्त खोल्या व वर्ग असायचे) काय घडले हे इत्थंभूत सगळ्या शाळेत मालवणी मसाला लावून पुरवत असे. अशा कित्येक गोष्टी कित्येक वर्षे अमर होऊन आळवल्या जायच्या. मला वाटते आम्ही शाळा संपवून कॉलेजला गेलो, तेव्हा केव्हा तरी रघुनाथ म्हातारा होऊन घरी बसला असेल व या गोष्टींना पूर्ण विराम मिळाला असेल. पण रघुनाथ सगळ्या गोष्टी इतक्या रंगवून सांगे की त्यांना एक छान विनोदाची झालर लागलेली असे. त्याच्या गोष्टीपैकी काही गोष्टी अजून लक्षात आहेत, कान्हेरे बाईंच्या रजेबाबत उडालेला हेडमास्तरांबरोबरचा खटका व नंतर झालेली व वर्षानुवर्ष चालत राहिलेली दिलजमाईची गोष्ट. एम्.व्ही.सावंतसर एम् व्ही च नाव का लावतात? त्यांच्या खऱ्या नावाची फोड करून सांगताना तो म्हणाला, कोकणी रिवाजा प्रमाणे त्यांच्या व त्यांच्या वडीलांच्या नावाच्या पहिल्या दोन दोन अक्षरानी जे नाव बनते ते इतके भयानक आहे. की त्याचा त्यांनी धसका घेतला व नाव एम्.व्ही. करून टाकले.

या सर्व गोष्टी तो त्या त्या माणसासमोरही सांगायला घाबरत नसे. तो सावंत सराना सहज दम मारे. खास कोकणी

ढंगात तो त्यांना सांगे " एम्. व्ही. माझ्यावर नको डाफरूत. एम्. व्ही. म्हणजे काय ता सांगीन सगळ्यांका."

"तुका खंय म्हायत आसा माझा खरा नाव?" असे काहीतरी बडबडत सावंत सर तिथून पळ काढीत.

हेडमास्तर काही वैतागून बोलू लागले की हा साळसूद चेहरा करून ऐकून घेई. मग त्यांनी काम सांगीतले की हळूच विचारी, "काननबाईनी दिल्लला काम बाजूक ठेवन तुमचा काम करू ना? बाई चिडाच्यो नाय ना?" कान्हेरेबाईना तो काननबाला नटी करायचा.

हेडमास्तर वैतागत व काही न बोलता निघून जात. अशा या बदमाश रघुनाथच्या कित्येक करामती पहात, आम्ही लहानपणीच शिकून तयार होत होतो. शिकत नव्हता तो फक्त मारक्या. मारक्याच्या डोक्यात आडवळणे घेणाऱ्या या गोष्टी कधी शिरल्याच नाहीत. तो अगदी सरळ साधाच राहिला होता. आम्ही रघुनाथकडून एखाद्याच्या वर्मावर बोट कसे ठेवायचे, याचे सखोल शिक्षण घेऊन, सफाईदारपणे कारणे देऊन काम टाळण्याचे कसब आत्मसात करीत होतो, तेव्हा मारक्या "म्हणजे काय?" या प्रश्न चिन्हापुढे सरकतच नव्हता.

आमच्या गोटात आठ दहा मुलं होतो. मारक्या त्यातलाच एक. अगदी साधा शामळू म्हणून आम्ही त्याला सांभाळूनही घेत असू व त्याची खिल्ली पण उडवत असू. त्याचे नाव जरी मारक्या होते तरी प्रत्यक्ष भांडणाच्या किंवा मारामारीच्या वेळी मारक्या कुठे तरी दडी मारून बसलेला असे. भांडण, मारामारी संपली की

हळूच कुठून तरी उगवे. मग धावत जाऊन रघुनाथकडून अयोडिन व कापूस आणून ज्यांना लागले असेल त्यांची सेवा करी. आमच्यातही काही भडकू मुले असायची. जखमेवर आयोडिन लावताना चुरचुरले की एखादा जोरदार धपाटा मारक्याच्या पाठीत घालताना अस्सल कोंकणी शिव्यांची माळ त्याला घालीत. मारक्याला त्याचे काही वाटत नसे. पण त्या मुलाला चुरचुरले याचे वाईट वाटून तो धपाटा खाऊन देखील, त्याच्या जखमेवर फुंकर घालीत असे. अशा या सरळ, साध्या मारक्याचा शाळकरी सहवास पहिली ते अकरावीपर्यंत आम्हाला लाभला. एक नंद्या सोडला तर आमची ही टोळी पहिली ते अकरावीपर्यंत एकसंध राहिली. सगळे चांगले पास व्हायचे पण मारक्या नेहमी पहिल्या नंबर वरच असायचा.

चौथीपर्यंत मजा होती. सर्व काही पाटीवर लिहून परीक्षा. गणितात तोंडी हिशोब करून उत्तर लिहून पाटी उलटी ठेवायची. मास्तर प्रत्येकाचे उत्तर तपाशीत व आपल्या वहीत त्याच्या नावासमोर बरोबर की चूक ते लिहित. सगळे प्रश्न विचारून झाले की मार्क सांगत व वहीतही लिहित. या परीक्षेला आम्ही लोक जास्तीत जास्त मार्क मिळवू. कारण मारक्या. उत्तर आले की मारक्या पाटीवर लिहीताना मोठ्याने उच्चारीत लिहित असे. ते शेजारचा आमच्यातला कुणी तरी ऐके व मग सगळ्यांना सांगे. या परीक्षेत उत्तर शोधण्यापेक्षा मारक्याच्या उत्तराचा मोह जास्त असे. सगळे लक्ष तिकडेच लागलेले असे. पण मारक्याला याचा पत्ता नसे. त्याला माहीत पण नसे की आम्ही त्याचे उत्तर ऐकून

लिहितो. समजले असते तर तो म्हणाला असता “ अभ्यास करावा रे असे केलेत तर तुमचा अभ्यास कच्चा राहील ” एवढा सरळ साधा मुलगा होता तो.

आम्ही कित्येक शिक्षकांबाबत मते बोलून दाखवू. काही चांगली काही न रुचणारी. एखादे वावगे मत याने ऐकले की ताबडतोब आम्हाला उपदेश मिळे. “अरे गुरुजी आहेत ते. असे बोलू नका रे त्यांच्याबद्दल. गुरुर्ब्रह्मा हा श्लोक माहीत आहे ना?” आम्ही हसून त्याची उडवत असू.

एके दिवशी हे महाशय शाळेला आले नाहीत. मारक्या शाळेत आला नाही, हे आम्हाला चुकल्या चुकल्या सारखे वाटू लागलेच पण जवळ जवळ सगळ्या शिक्षकानी आम्हाला मारक्याबद्दल विचारले. आम्हालाही माहीत नव्हते. काय उत्तर देणार? एम्.व्ही नी तर कळस केला. म्हणाले “मित्र म्हणवता ना रे? मग मारक्या का नाही आला हे माहीत नाही? आजारी वगैरे असेल तर?” मग मात्र मनाला रुखरुख लागून राहिली. शाळा सुटल्या सुटल्या आम्ही सर्वांनी मारक्याच्या घरी मोर्चा काढला.

त्याच्या घरी पोचलो तर मारक्या दारातच उभा. एकदम धडधाकट मग शाळेत का नाही आला?

“का रे मारक्या! शाळेला दांडी का मारलीस? एम्.व्ही. सर बैचेन झालेत.” शाम गोऱ्याने तिरकस बॉल टाकला. “काही नाही रे. आईला ताप आलाय. बाबा कामावर जाणार. घरी तिच्याकडे कोणी नाही. मग घरी नको रहायला? तिला पेज पाणी कोण देईल?”

खरे होते मारक्याचे म्हणणे. आई, बाबा, मारक्या आणि त्याचा छोटा भाऊ. एवढेच कुटुंब. छोट्या भावाला त्याच्या आजोळी मामाकडे ठेवले होते. म्हणजे हे तिघेच. आम्ही अडचण समजलो. पण तरीही अक्कलेच्या दिवाळखोर शाम गोऱ्याने नको तेंव्हा तोंड उघडलेच "मातृ देवो भव का रे? मग किती दिवस आता घरी राहाणार?" आम्ही सगळयानी शाम्याला चापला. घरात जाऊन आईची चौकशी केली व परतलो. घरी लवकर पोचलो नाही तर "कुठे उंडगत होतात?" हा प्रश्न व दोन चार थप्पडांचा प्रसाद मिळाला असता.

मारक्याचं नाव आम्हालाच काय पण त्याला, त्याच्या आईला की बाबानाही धड उच्चारता येत नसे. एकटा शाम्या ते बरोबर उच्चारीत असे. कारण त्याच्या घरी कायम संस्कृत पठण, पूजा, अर्चा होतच असे. मग याचे नाव त्याच्या आत्याने कसे काय ठेवले? आमचा शोधक स्वभाव. मग सर्वजण मारक्याचे नाव मार्कंडेय कुणी व कसे ठेवले असेल याचा शोध घेण्याचा विचार करू लागले.

एक गोष्ट नक्की झाली. ज्या घरात संस्कृत कुणीच बोलत नाहीत, ज्यांची मायबोली मालवणी आहे, ज्यांना शेतीकाम करून मेहनत करून पोट भरण्याची गरज आहे, अशा कुटुंबात असले भारदस्त नाव आलेच कसे.?

"अरे! वेड लागलेय का तुम्हाला? माणसाला एक ओळख हवी म्हणून नाव दिले जाते. त्यात एवढे शोधायचे काय?" मारक्या

"अरे पण तुझ्या आत्याला मार्कंडेय म्हणायला तरी येते काय रे?" शाम्याने कुजकट प्रश्न मारक्यावर फेकला.

"शाम्या, आत्या आली आहे. दोन चार दिवसासाठी. आई आजारी आहे ना म्हणून बोलावले आहे बाबानी. आज विचारतो तिलाच." मारक्या आपल्या सरळ स्वभावाला जागत सांगू लागला. दुसऱ्या दिवशी शाळा सुरू होताच आम्ही मारक्याला गाठून विचारले "काय रे आत्याला विचारलेस? काय म्हणाली ती?"

"ती म्हणाली ऋषि मुनिंचं नाव ठेवावं वाटलं मग कानांत बोलली तुझ्या. तेच नाव रे तुझं " मारक्या

"अरे पण काय बोलली कानांत?" आम्ही परत कोरस मधे विचारले. "तिने म्हटले काय रे? मार्कंडेय?" शाम्याने अगदी स्पष्ट विचारले.

"तिला नाय जमणार एवढे अवघड नाव." मारक्या हळूवार होत म्हणाला.

"अरे! मग तुझे पाळण्यातले नाव काय? तिला म्हणाताच येत नाही तर तू मार्कंडेय कसा?" शाम्या आता जोरात विचारत होता. एवढ्यात रघुनाथ आला. आमचे बोलणे त्याने ऐकले असावे. तो आगावू पणे म्हणाला," काय शोधतात रे? मारक्याचा खरा नाव? ता फक्त माकाच म्हायत आसा. सांगू?"

"सांग! सांग!" आम्ही सगळ्यानी रघुनाथला गराडा घातला. "अरे हेचा नाव शाळेत घालूक हेचे आयस बापूस इल्ले ना तेवाची गोष्ट. त्यो अगदीच ल्हान. हेडमास्तरानी हेच्या

बापाशीक इचारल्यानी नाव सांगा. ते म्हणाले मारक्या! हेडमास्तरनी परत इचारल्यानी. पाळण्यातला सांगा, घरांत काय म्हणतास ता नुको सांगू. आयस आणि बापूस दोघाय बोलूचे बंद. हेडमास्तर करवादले तेवा आयस कशी म्हणता तायबायनी नाव ठेवला ता येयत नाय म्हणूक. आमी मारक्याच म्हणतव. हेडमास्तर रागातच म्हणाले तायबाय कोण? तिका घेवन या ! मग काय दोघाय उठान गेली.” रघुनाथ थांबला.

आम्ही वैतागलो हे तर आम्हाला रघ्याने आधीच सांगीतले होते. तेच तो परत गिरवीत होता.

“रघ्या तुला खरे काय ते माहीत असेल तर सांग.” शाम्या दम मारीत बोलला.

“दम कोणाक मारतस? माका? तंगडी काढून हातात देयन.” आता रघ्या शाम्यावर डाफरला तसा मारक्या एकदम म्हणाला, “ए! माझ्यामुळे भांडू नका रे. कशाला पाहिजेत या उचापती?” पण आमचे समाधान नाही झाले. शाम्याला वगळून आम्ही रघ्याला गाठले. “रघ्या पुढे सांग! शाम्याला कटवलाय आम्ही”

“शाणोच हा तो शामो. परत माका काय बोललो तर दोन चढवीन म्हणून सांगा. माका दम मारता!” रघ्या आपला शाम्यावरचा राग दाखवीत होता आणि मूळ मुद्दा बाजूलाच ठेवीत होता. “आम्ही समजावतो रे शाम्याला. तू आम्हाला मारक्याच्या नावाबद्दल सांग. त्याची आत्या आली होती का रे?”

"शाम्याक सांगू नकोत तरच सांगीन. तेणी ईचारल्यान आणि तुम्ही सांगल्यात तर माझ्याशी गाठ हा" रघ्या

"नाय सांगत आता तरी सांगशील?" आम्ही.

तेचा काय झाला. मारक्याच्या आयशेक नी बापसाक नाव काय सांगूक येयना......."

"ते झालं रे हेडमास्तरनी मारक्याच्या आत्याला बोलवायला सांगीतले त्याच्या पुढे सांग." दिन्या मुसळे वैतागत ओरडला.

"नायतर काय नमनाला घडाभर तेल" कनु महाडीक

"तुमी म्हदी म्हदी बोलशात तर मी जातय बघा कसो. काय सांगुचा ता माका म्हायती की तुमका रे? गप ऐका काय सांगताय ता" रघु आडवा फाटत धमकावू लागला. आम्ही गप्प झालो. दोन मिनिटे शांततेत गेल्यावर रघुने पुढे सुरू केले.

"तर मारक्याचे आयस, बापूस आत्याक घेवन येतय सांगान गेले ते चार दिसानी उगावले. बरोबर एक बाई होती. मी समाजलय हीच ती आत्याबाय. लाल जरी काठाचा नववारी लुगडा नेसलली, कपाळार ह्या मोठा कुंकू, केसाचो मोठो आंबाडो घालून वर आबोलीची पाथी माळलल्यान. पण बुटकी होतीहां....." इथे रघू थांबला खिशातून चंची काढून तंबाखू मळायला लागला. मळून तोबरा भरेपर्यंत आम्ही धायकुतीला आलो होतो. हा काय म्हणून आमचा अंत बघतोय? लवकर का सांगत नाही? आत्याबाई उंच होती की बुटकी यात किंवा ती काय नेसली होती, काय काय माळले होते याचे आमच्या लेखी

काहीच महत्व नव्हते. आम्हाला फक्त आत्याबाईनी मारक्याचे नाव “ मार्कंडेय ” कसे उच्चारले असेल व हेडमास्तरना ते कसे समजले असेल यातच इंटरेस्ट होता.

“ए रघुनाथ (त्याला रघ्या म्हटले असते तर तो चवताळला असता. कारण हेडमास्तर त्याला रघुनाथ म्हणत तेच सर्वांनी म्हणावे असा त्याचा आग्रह असायचा) हे काय? तू आत्याबाईचे पुराण सांगू नको. डायरेक्ट सांग आत्याबाईनी हेडमास्तराना मारक्याचे नाव काय सांगीतले. तेवढेच सांग ना.” दिन्या मुसळेचा आता धीर आणि तोल दोन्ही सुटत चालले होते.

“तुका नाय आयुकुचा ना? जा रे तू हयसून. मी माझ्या परमाणेच सांगतलंय. आयकुचा त आयक” रघुनाथ तापत म्हणाला.

“तर ती आत्याबाय मारक्याच्या आयशी बापाशी मागसून चल्लली. मधीच तिघाय थांबली. मी ऐका होतय. आत्याबाय म्हणता कशी, शिखा माका लाज येता रे मास्तरासमोर बोलाची. काय करू. तसो मारक्याचो बापूस चिडान म्हणता कसो, रांXXच्या नाव ठेवलंस ना मारक्याचा! आमका कोणाक म्हणाकय येयत नाय. चल गप नी सांग तेंका नाव. हेडमास्तरांच्या खोलीत शिरली नी मी पाणी घेवन आंत शिरलंय” परत रघ्या थांबला खाकरला तंबाखूची पिचकारी मारली आणि आमचे चेहेरे न्याहाळू लागला.

आता मात्र आमचा संयम सुटणार असे वाटू लागले. दिन्या मुसळे म्हणाला, " मी जातो, हा रघ्या काय सांगणार नाही. उगीच कशाला लोंबकळत बसायचे त्याच्यासाठी !"

"तुमका आयकुचा हा का नाय? मग माजी सगळीच गोष्ट आयुकुची लागात. माका असा फाटकन सांगूक येयत नाय. समाजलां? जेंका जावचा असात ते जावा. तर काय झाला....." रघ्या

"रघुनाथSS" हेडमास्तरांच्या खोलीतून हाळी आली आणि रघ्या तिकडे धावला. जाता जाता म्हणाला, "उद्या बिद्या सांगान रे!"

आम्ही सगळे हताश होऊन खांदे पाडून उभे होते. आता काय? मारक्या हिरवेच्या नावाचा इतिहास शोधणे फारच अवघड होत चालले होते.

"आता रे?" दिन्या मुसळे विचारत होता. तेवढयात लांबून आमच्यावर नजर ठेवून असलेला शाम्या हजर झाला.

"काय रे, सांगीतले का त्या रघ्याने? डँबीस आहे तो. त्याला काहीच माहीत नसणार. तो फेकतोय. हेडमास्तर त्याला तिथे उभे ठेवणार थोडेच? एवढीशी गोष्ट सांगायची सोडून पुराण ऐकवत बसतो." शाम्या त्याच्या राग जाहीर रित्या व्यक्त करीत होता.

"ए! मारक्याची आत्या आहे की गेली? असली तर तिलाच विचारू. सगळे जणं शाळा सुटली की जाऊ मारक्याच्या घरी." दिन्या मुसळेने आयडिया दिली.

“काय रे मारक्या! आत्या आहे का अजून” मी मारक्याला विचारले

“हो आहे! पण काय रे सगळे येऊन कशाला विचारता. मीच विचारतो आज परत” मारक्या

“काही नको! तू घोळ घालतोस. आधीच नसते विचारलेस? काही नको आम्हीच येतो तुझ्या घरी” दिन्या मुसळे मारक्याला तंबी देण्याच्या आवाजात बोलला आणि मारक्या हिरमुसला होऊन गप्प झाला.

संध्याकाळी आमची वरात मारक्याच्या घरी निघाली. आठ दहा पोरे एकदम येतात हे बघून मारक्याची आत्या घाबरी घुबरी होत विचारू लागली. “काय रे काय झाला? मारको बरो आसा ना?” एवढयात तिची नजर मारक्यावर गेली. “ह्यो काय! मेलो धड धाकट तर हा. मग काय रे कशाक एवढी मोठी वरात घेवन इलात?” आत्याबायच्या तोंडून सटासट एक एक प्रश्न बाणासारखे निघू लागले आणि शाम्याने आपले बाण सज्ज केले “ काय नाय आत्याबाई, मारक्या म्हणाला आत्याबाई आल्यात मग आम्हाला वाटले तुम्हाला भेटावे. मारक्या खूप काही सांगतो तुमच्याबद्दल”

आम्ही सगळे विचारात पडलो. मारक्यानी कधीही आत्याबाईबद्दल बोललेले कुणालाही आठवत नव्हते. शाम्याची लोणकढी थाप मात्र आत्या बाईंवर जोरदार इंप्रेशन मारून गेल्याचे त्यांच्या चेहेऱ्या वरूनच दिसले. एकदम हसत त्या

म्हणाल्या. "माझी खबरबात घेवक इलात? या! या! मारक्या चटई टाक रे सगळ्यांका बसूक."

आम्ही सगळे ओटीवरच चटई टाकून बसलो न बसलो तोच दिन्या खुसपुसला, "अरे! सरळ विचारू टाका वेळ लावत बसू नका."

"शाम्यालाच बोलू देत. तो मस्त मस्का लावतो समोरच्याला." कनु म्हाडीकने आपले मत नोंदवले. व सर्वांनी मान हलवली एवढयात आत्याबाई एका ताटात चणे, चुरमुरे व दाणे घेऊन आल्या व म्हणाल्या, "सगळे घ्या! एकाच ताटात हाडलय. पण सारखे वाटून खा, भांडू नको."

"आत्या बाई बसा हो तुम्ही. जरा तुमच्या गावाबद्दल विचारायचे आहे. जमले तर तिकडची ट्रीप शाळा काढते काय बघायचे आहे." शाम्याने दुसरी लोणकढी ठोकली. आम्ही सगळे विचारात पडलो या शाम्याचे डोके आहे की थापानी भरलेले कपाट आहे?

"बसतय रे बाबानो! ईचारा काय ता आणि आमच्या गावाक कसली ट्रीप काढतास? काय हा आमच्या गावात? गरीबांचो गाव रे तो. तो बघूक येतलास? आमच्या गावात नाय नदी की किल्लो. जंगल आणि दगड धोंडयानी भरलेला गाव ता. सगळी मिळून दहा पंधरा आंब्याची झाडा नी चार सहा नारळाची झाडा एवढीच संपत्ती आमच्या गावाची. आणि काय म्हायती पायजे रे?" आत्याबाय.

“एवढेच आत्याबाई? मला वाटले खूप विद्वान लोकानी भरलेले गाव असेल. देवभोळे लोक असतील. पुराण कथा, अभंग, ओव्या म्हणणारे, गाणारे गाव असेल. कारण त्या शिवाय का तुम्ही मारक्याचे एवढे अवघड नाव ठेवले? आम्हाला कुणालाच ते म्हणता येत नाही. कसे सांगीतलेत हो त्याचे नाव त्याच्या कानात?” शाम्या.

शाम्याच्या विद्वत्तेबद्दल आमच्या मनात असाधारण आदर तयार झाला होता. प्रत्येक जण त्याच्याकडे डोळे भरून पहात होता.

“वशाडानो! ह्या इचारूक इलात? म्हातारीची टेर घेतास काय रे? तुमच्या मास्तरानी पण ह्याच इचारला, तेवा सांगीतली मारक्याच्या नावाची गोष्ट, मग झालो दाखलो शाळेत. आता काय होया तुमका?” आत्याबाई थोडया चिडल्या असे वाटू लागले.

“हे बघा आत्याबाई! शाळेत नाव लागले की जन्मभर तेच नाव सरकार दरबारी चालते. हे असले नाव चुकीचे कधी लिहले गेले तर मारक्याला पुढे जाता भोगावे लागेल. त्याला देखील त्याचे नाव सरळ सांगता येत नाही. म्हणून आलोय तुमच्याकडे. तुम्ही नाव सांगीतलेत की ते आम्ही त्याला पाठ करायला लावू. मग घोळ तरी नाही व्हायचा.” शाम्याच्या जीभेवर सरस्वती व डोक्यांत असत्यदेव राज्य करतायत असे वाटू लागले. साळसूदपणे तो आपल्या ढंगाने आत्याबाईना आपल्या

जाळ्यात अडकवत होता. त्याचे कौशल्य आज तो पणाला लावीत होता.

"असा काय! अरे माका तरी खय आठवता तेचा नाव. काय झाला. मारक्याच्या बारशाक शिरप्यान (श्रीपाद) बोलावला. मी आलय तेवा बाजूच्या गावाची जत्रा होती. जत्रेत दहिकालो पण होतो. बारशाक दोन दिवस होते. मग आमी दहिकाल्याचा नाटक बघूक जायचा ठरवला. शेजारणी जात होत्यो. म्हणून शिरपाक सांगून मी पण गेलंय. साटमाची शेंवता, ठाकूराची मैना, विटकराची शैलू अशो सगळ्यो बरोबर होत्यो. जत्रा संध्याकाळीच सुरू होय. आमी पोचलंव तेव्हा नुकतोच काळोख पडा होतो. जत्रेत ही दुकानाच दुकाना लागलली." आत्याबाईनी पाणी प्यायसाठी गडू उचलला. दिन्या मुसळे खुसपुसला, "आयला हे तर रघ्यापेक्षाही भारी होणार. चला फिरा आता जत्रेत तासभर."

"तर अशी ती दुकाना कसली कसली होती. साखरेची रंगबेरंगी गाठली काय. देवाचे दोरे काय, शिट्ट्यो नी खेळणी काय. फण्यापासून गंगावनापर्यंत सगळाच. सामान लावलंला."

"आत्याबाई तुम्ही काय घेतलंत फणी की गंगावन?" कन्या आत्याबाईंवर वैतागला होता त्याचे उट्टे काढत होता.

"मेल्या! मी कशाक गंगावन घेव? माझे केस तेवाय शाबूत होते आणि आजय आसत. मी फणीच घेतली. लय छान होती ती फणी चार वर्सा टिकली. मग एक एक दात पडूक लागलो मग टाकून दिली नदीत. जत्रेत घेतलंली ना. देवाच्या दारची म्हणून

नदीत टाकली.” आत्याबाई आता कुठून कुठे जात होत्या. आम्हाला समजेना त्यांना मूळ विषयाकडे कसे आणायचे. तेवढयात शाम्या शांतपणे आत्याबाईना म्हणाला.

“आत्याबाई घरी आई ओरडेल उशीर झाला तर. तेवढे मारक्याच्या नावाचे सांगाल का लवकर? म्हणजे घरी लवकर जाऊ. आईला काळजी नको.” परत एकदा आम्ही शाम्याकडे कृतार्थ नजरेने बघीतले.

“होय रे आईक काळजी असतलीच रे. पोरानी कसा वेळच्या वेळी घराक जावचा. आई-बापाची आज्ञा पाळूची. आमी आमच्या आई बापाक फार मानू, फार जपू. तुम्ही वागतास ना रे तशे?”

“हो! हो! तसेच वागतो, पण ते मारक्याचे नाव कसे ठेवलेत ते सांगा ना!” दिन्या मुसळे धायकुतीला येऊन बोलत होता.

“हो रे! तर दहिकाल्याक अजून वेळ होतो. जत्रेत फिरून झाला मग देवळात गेलंव. देवाचा दर्शन केलंव. शंकरांचा देऊळ होता ता. ही मोठी पिंडी. काळी काळी चमकणारी. वर एक भांडा लटकवलंला. तेच्यात्सून दूधाची धार पिंडीर पडा होती. एक पिवळो जर्द साप पिंडीर वेटोळा करून होतो. अरे बाबानो खरो नाय काय. धातूचो होतो. कोण म्हणा सोन्याचो, कोण सांगा पितळेचो, कोण दुसराच सांगी काशाचो. कसलोय आसना का, देवाचो हा तो एवढाच मनात ठेवायचा. तिर्थ प्रसाद घेतलो.

उत्सव होतो म्हणून देवळातच म्हाळवसाचा जेवाण होता. थंय जेवक गेलंव.”

“च्या मारी! चावला चावला.” असे बोंबलत कन्या म्हाडीकने आपल्या उघड्या मांडीवर एक चापटी मारली.

“काय झाला रे पोरा? किडो चावलो? थांब हा थोडो उद धूपाचो धूर करतंय म्हणजे पळतले सगळे किडे” असे बडबडत आत्याबाई उठली आणि घरात गेली

कन्या म्हाडीक तापत म्हणाला. “हिला तरी माहीत आहे का? काय पण गोष्टी सांगत बसलीय चला, घरी चला मला नाय वाटत ती सांगेल. तिला म्हणताच येत नसेल मार्कंडेय तर ती कशी सांगणार?”

कन्याचे म्हणणे अर्ध्या लोकांना पटले. अर्ध्यांना नाही पटले म्हणून सर्वच बसून आत्याबाई पुढे काय सांगते ते ऐकायला थांबलो. पण शाम्याने सगळ्यांना दम मारला कोणी मधेच काही बोलायचे नाही की विचारायचे नाही. डास, किडा काहीही चावले तरी सहन करायचे. आवाज काढायचे नाहीत. कारण त्यामुळे आत्याबाईला नवीनच विषय मिळतो बोलणं लांबवायला. खरे होते शाम्याचे म्हणणे.

उद धुपाचा धूर नाकातोंडात चांगलाच गेला. काहींना ठसका लागत होता तरी ते तो दाबत होते. काहींच्या डोळ्यातून पाणी येत होते. पण ते पाणी पुसत देखील नव्हते. न जाणो कोणत्याही कारणाने आत्याबाईंची गाडी रूळ बदलून दुसरीकडेच पळायला लागेल.

“तर बघा म्हाळवसाच्या जेवणाचा सांगत होतय मी. छान जेवण होता. गोडा वरण, भात, बटाट्याची भाजी, तांदळाची खीर आणि चटण्यो होत्यो दोन. पण सगळा एकदाच वाढला. भात भरपूर वाढलानी पण खीर एकच द्रोण. आणखी एक द्रोण मिळाली असती तर मजा आली असती. पण जेवक पंक्ती बसत होत्यो. परवडूक नको दोन दोन द्रोण खीर. म्हगाई केवढी झाली हा. रुपयाच्या नोटीत जितक्या सामान मिळा तेका आता पाचाची नोट लागता.”

आत्याबाई आता भक्तिभावातून आर्थिक भावात शिरत होत्या आणि आम्हाला जांभया यायला सुरवात झाली होती. कन्या महाडीकाचा तोल पूर्णपणे गेला होता. मधूनच कोण घोरते हे पहाण्यासाठी सर्वांच्या नजरा वळल्या, तर कन्या बसल्या बसल्या समाधी लावून घोरत होता. बाब्या सावंताने लगेचच त्याच्या तोंडावर हात दाबला आणि कन्या उठून उभा राहिला. दोन मिनीटे आम्हाला काय करावे हे कळेना. पण कन्याने प्रसंगावधान राखून करंगळी दाखवत घरातून बाहेर पळ काढला.

“काय झाला रे तेका? कशाक पळत सुटलो?” आत्याबाई

“काही झाले नाही. होणार आहे.” करंगळी दाखवत शाम्याने विनोद केला

“आत्याबाई तुम्ही पुढे सांगा. मारक्याचे नाव तुम्ही कसे ठेवलेत ते. काय बोललात त्याच्या कानात?” शाम्याने पुढच्या वाक्यात आत्याबाईना रुळावर आणून सोडायचा प्रयत्न केला.

“हां ताच सांगतंय मी मधी मधी बोलू नका. माझी तार तुटता.”

आमच्या सगळयांच्या किती आणि कुठल्या कुठल्या तारा ह्या आत्याबाईने तोडल्या होत्या ते त्यांना माहीत नव्हते.

“तर जेवाण झाला. सव्वा रुपये दक्षिणा देवाच्या पेटीत टाकली. आणि आमी दहिकाल्याक निघालव. वाटेत सरबताची गाडी दिसली. शैलू म्हणाली, जेवण जड झाला हा. जरा आंबट सरबत पिवया. जिरूक बरा. म्हणून गाडीवर गेलंव. चार आणे ग्लास होतो. एक एक पिलव. आंबट कमी, साखर कमी आणि पाणी मात्र ढमक ढवळ कसले चार आणे म्हणून गाडीवाल्याक दम मारलव तर म्हणता कसो, फौजदाराचो मेव्हणो आसय मी. पैसे काढा नायतर फौजदार हयच आसा देवळाच्या बाजूक. उगीच कशाक भांडा म्हणून तेचे पैसे भागवलव. प्रत्येकान आपआपले पैसे दिले. हो एकावरच भार कशाक?” आत्याबाई रंगात येऊन जत्रा आळवत होत्या. आमचे सरबत पुराण ऐकून आंबट झालेले तोंड आता कडवट व्हायला लागले होते.

“सरबत पिवन दहिकाल्याकडे पोचलव. तर थय फक्त पडदोच लोंबत होतो. अजून गॅसबत्ती पण लावलली नवती. पण पोर्णिमेची जत्रा होती ती. म्हणून जरा उजेड होतो. छान पिठासारख्या चांदणा पडलंला. निवांत गप्पा मारत बसूक येयत आणि जागाय चांगली पुढची मिळात म्हणून जावन बसलंव. आमच्या पुढ्यात दहा बारा पोरी बसलल्यो. आणि बाप्यांच्या बाजूक पंचवीस तीस पोरा कलकल करा होती.”

आत्याबाई साग्र संगीत मेळावा कसा होता हे दाखवू लागल्या आणि दिन्या मुसळेच्या छातीत कलकलायला लागलं. तो उठून बाहेर निघाला.

"जा रे आणि कोणाक जावचा असात तर जावन या. तवसर मी जरा पान खावन घेतय" असे म्हणत आत्याबाईनी चंची काढली आणि आम्ही सर्वच जण उठलो. बाहेर जाऊन विचार विमर्श करून पुढे काय करायचे हे ठरवायचा प्राथमिक विचार सगळयांच्या डोक्यात एकदम उजाडला होता.

बाहेर पडताच दिन्या मुसळे, कन्या म्हाडीक, शाम्यावर उखडले "अरे तू सांगीतलेस तसे गप्प बसलोय, डांस, मुंग्या चावल्या तरी कर्णा सारखे सहन करीत बसलोय. तरी ही आत्याबाई विषयावर काय येत नाही. अजून ऐकत बसायचेच की घरी जायचे ते ठरवा. फार झाले मारक्याच्या नावाचे पुराण. त्याला मारक्या ऐवजी माकड्या का नाय म्हणत रे हे घरचे? यायला ताप झालाय डोक्याला"

"अरे जरा सबुरीने घ्या. आत्याबाईचा दहिकाला आता संपेल. मग सांगतीलच ना?" शाम्या गोरे

"ए! शाम्या दहिकाल्याची स्टोरी कमीत कमी दोन अडीच तासाची असते. आणि एकादा नट गायला लागला तर पहाटही उजाडते. बसणार आहेस एवढा वेळ?" दिन्या मुसळे

"आंथरूण पांघरूण घेऊन आलो असतो. काय काय ऐकायला लागतेय ह्या आतेबाईकडून." कन्या महाडीक

“अरे कंटाळले असाल तर जा तुम्ही. पण मी जिद्दीला पेटलोय आता काय तो सोक्षमोक्ष लागल्या शिवाय मी हटणार नाही. भले मध्यरात्र झाली तरी. आत्याबाई सांगेपर्यंत बसणार आहे.” शाम गोरेने आपले रणशिंग फुंकून लढाईची सुरवात केली होती.

ढसाळलेल्या कन्या म्हाडीक व दिन्या मुसळेला त्यामुळे नवा चेव चढला आणि घरी पलायन करायच्या ऐवजी आत्याबाईंच्या चक्रव्यूहात शिरण्यासाठी त्यांना एकदम स्फुरण चढले.

सगळे परत ओटीवर येऊन स्थानापन्न झाले. समोर आत्याबाई अजून पान तयार करीत होत्या. पानाला चुना लावून झाला होता. सुपारी बारीक कातरून त्या पानावर ठेवीत होत्या. आम्हाला, “आलात! बसा! बसा! झालाच हा माझा पान, थोडो कात आणि तंबाकू टाकलो की झाला. पान तोंडात गेला काय जुन्यो आठवणी अजून ताज्यो तवान्यो होवन येतत. पूर्वींच्यो गोष्टी बरोबर आटवतत.”

बापरे! म्हणजे या पानामुळे आम्हाला बरेच काही अजून ऐकत बसावे लागणार की काय? हा संभ्रम प्रश्नचिन्ह बनून सगळयांच्या चेहेऱ्यावर उमटला. आत्याबाईंचा चक्रव्यूह फोडणे साधेसुधे काम नव्हते याची खात्री पटू लागली.

“आत्याबाई! तंबाखू खाणे वाईट. कॅन्सर होतो म्हणतात. कशाला खाता? आणि पान तोंडात ठेवून बोलताही येणार नाही. मग आम्हाला घरी जायला वेळ होईल. ते मारक्याच्या नावाचे

सांगा. मग दहिकाल्याची गोष्ट ऐकायला आम्ही उद्या परवा परत येतो.”

शाम्या आता चक्रव्युह हरणार की काय शंकेने व्याकूळ झालाय असे वाटले.

“अरे दहिकाल्याच्या गोष्टीतच, दहिकाल्याच्या नाटकातच मारक्याचा नाव गावतला. असा थोडाच सांगूक येयत. म्हणून सगळी गोष्ट ऐकूची लागतली.” आत्याबाई आता जरा धमकावतच बोलल्या. आणि आमचे चेहेरे पडले.

“तर काय! मी मधला काय सांगत नाय. हां सरळ दहिकाल्याच्या गोष्टीकडेच येतय. तर अर्ध्या तासानी सगळे ईले गॅसबत्ती लावल्यो. नट्टोपट्टो केलो आणि नाटक सुरू झाला. पहिली गणपतीची पुजा म्हणून गण सुरू झालो. गणपती झाल्ललो माणूस पुरा कुंकू अंगाक फासून आल्ललो. लाल लाल भडक. डाव्या हातान सोंड असललो गणपतीचो मुखवटो तेणी तोंडासमोर धरललो. तेका डोळ्याच्या जागेर दोन मोठी भोका होती. तेका दिसूक होया ना? पण मग तेचे डोळे खूप आत गेल्या सारखे वाटत होते, आजारी माणसा सारखे.”

“आत्याबाई गणपती आजारी कसा पडेल? देव ना तो.” दिन्या मुसळेने आत्याबाईवर तलवारीचा वार केला. तो हुकवत त्या म्हणाल्या, “तो काय खरो देव थोडोच? तो आपल्यातलोच एक. आणि तो धड उभो पण रवत नव्हतो. गणपती कसलो तो? गणपती काय चढवता काय रे?” आत्याबाईनी दिन्याचा वार तर चुकवलाच पण आपला वार असा काही केला की दिन्या बेशुद्ध

पडल्यासारखा गप्पगार झाला. आता मारक्याच्या नावापेक्षा चक्रव्युहाची लढाई रंगणार अशी लक्षणे दिसू लागली.

“मधे मधे बोलू नका रे! माझी तार तुटता. हां तर गणपती डोलत थरथरत उभो, बाकीचे गणपतीचा गाणा म्हणी होते. मधूनच वाकून गणपतीक नमस्कार करी होते. वंदना संपली आणि गौळण सुरू झाली. गौळणी चालल्यो मथुरेच्या बाजाराक त्येंका अडवला पेंद्यान दहि, दुध, लोणी द्या नायतर पुढे जावक देणार नाय म्हणालो तो. मग काय भांडाण सुरू. मग कृष्ण ईलो पेंद्याच्या मदतीक.”

“आत्याबाई पण इथे गोष्ट विचित्र वाटते. आम्हाला शाळेत सांगीतले की कृष्ण मथुरेत जन्मला देवकी त्याची आई पण वसुदेवाने त्याला द्वारकेला आणून यशोदेकडे ठेवला. तिनेच सांभाळले त्याला. कृष्ण, पेंद्या, गौळणी, राधा हे सगळे द्वारकेचे मग मथुरेला कसे पोचले?” शाम्याने भरघांव रथ हाकत आत्याबाईवर शरसंधात सुरू केले.

“गेलो असात कृष्ण मथुरेक आपल्या आयशीकडे. तू नाय जात तुझ्या आयशीकडे? तो काय कायम यशोदेकडेच रवतलो आयशीकडे नाय जातलो? सांगता मेलो माका!” आत्याबाईनी सगळे बाण व्यवस्थित मोडून शाम्याला तर गप्प बसवलेच पण कृष्णाचा आम्हाला माहीत असलेला नसलेला जन्म कहाणीचा रथ ही भेदून टाकला.

“आता गौळण संपली आणि नाटक सुरू झाला. एक ऋषि मुनि आणि त्येंची बायको त्येंका मुल होत नव्हता. तेणी शंकराची

आराधना केली. आणि भोळो शंकर लगेचच प्रसन्न झालो. म्हणालो तुका कसलो झील होयो. शंभर वर्सा जगणारो पण बुद्दू की सोळा वर्साच जगणारो पण हुषार? ऋषि म्हणालो. हुषार मुलगो दी शंकरान दिलो वर. तो सोळा वर्षाचो झालो. तेणी शंकराची आराधना केली शंकर प्रसन्न झालो. मुलाचे प्राण नेवक इल्लल्या यमराजाक तेणी रागावून परत पाठवलान. तो मुलगो जगलो. त्या मुलाचा माका कवतीक वाटला म्हणून तेचाच नाव मी मारक्याच्या कानांत सांगीतलय " आत्याबाई गप्प झाल्या.

"पण ते नाव काय?" आम्ही सगळ्यानी एकदम् हल्ला चढवला.

"अरे दहिकालो बघितलय तेवा सारख्या आयकून पाठ झाल्लला. तेवाचा आता आठवात काय रे?" आत्याबाईनी एकाच गदेने आम्हाला सर्वांना गारद केले. एवढा वेळ बसून देखील मारक्याचे नाव कसे काय पडले हे माहीत पडले नव्हते.

"पण तुम्ही हेडमास्तरना काय सांगीतलेत? त्यांनी नाव कसे लिहीले तुम्ही न सांगता?" घायाळ झालेल्या शाम्याने शेवटच्या एक वार कसातरी केला.

"अरे मी ही गोस्टच सांगीतलंय तेंका. मग तेणीच लिवला काय तरी आणि जा म्हणाले. माका काय नाव आठवणार होय रे. केवढा अवघड नाव ता पुराणातला आसा." असे म्हणत आत्याबाईनी उजवा हात डाव्या, उजव्या गालांना लावत भक्तिभावाने नमस्कार केला. आणि आम्ही आमच्याच थोबाडीत मारून घेत बाहेर पडलो.

"कुणाची आयडीया रे आत्याबाईना विचारायची?" शाम्या.

"अरे मला काय म्हाईत बाई एवढी घोळ घालत बसेल." दिन्या मुसळे.

"झोडा रे या दिन्याला, साली सगळी संध्याकाळ फुकट गेली. विटीदांडू तरी खेळलो असतो पोटभर." कन्या म्हाडीक

असेच दिवस, महिने वर्षे लोटली, आम्ही एस्.एस्.सी ची परिक्षा दिली. आता शाळा संपणार होती. आमचा गृप तुटणार होता म्हणून वाईट वाटत होते. शेवटचे दिवस म्हणून सगळे दररोज एकत्र जमत होतो. आणि रिझल्ट लागला. मारक्या पहिला आला म्हणून त्याचा सत्कार शाळा करणार होती. आम्ही सर्व हजर होतो.

हेडमास्तर बोलायला उभे राहिले

"मुलांनो आज मला फार बरे वाटते आहे. अशिक्षितानी भरलेल्या या गावात शाळा चालवण्याचे अग्निदीव्य मी फार वर्षापासून करतो आहे. आज मार्कंडेयने शाळेत पहिला येऊन व बोर्डात ५१ वा येऊन शाळेचे नाव उज्वल केले आहे. मला त्याहीपेक्षा समाधान याचे आहे. की आई वडीलांना याचे नाव देखील उच्चारता येत नाही. तरीही मार्कंडेयने ही प्रगती दाखवून मी त्याला दिलेले नाव धन्य केले आहे."

आमचे सगळ्यांचे कान इथे टवकारले गेले. हेडमास्तर काय सांगतायत हे. यांनी मारक्याचे नाव ठेवले.?

“त्याचा दाखला करायला आलेल्या आई, वडील की आत्याबाई यांना कोणालाच त्याचे नाव घेता येत नव्हते. पण त्याच्या आत्याने सांगीतलेल्या गोष्टी वरून अंदाज बांधून मी त्याचे नाव मार्कंडेय असे शाळेच्या रजिस्टर मध्ये नोंदवले. आज त्याने ते सार्थ केले आहे. तो तसाच सालस, सरळ, अभ्यासू, हुशार मुलगा आहे. मी त्याला पुढील आयुष्यात यश चिंतितो.”

आम्ही पूर्वी कधीही पिटल्या नसतील एवढ्या जोराने टाळ्या पिटीत होतो. आम्हाला मार्कंडेय नावाच्या गुपीताची फोड झाल्याचा आनंद गगनात मावत नव्हता.

*****



# दोन मैल

सकाळी नऊ वाजता पोचणारी मुंबईची बस संध्याकाळी सहा वाजता तालुक्याला पोचली होती. मुंबईहून निघाल्यापासून दोनदा बिघडली. रिपेअर करून निघायला दर वेळी चार तासापेक्षा जास्त वेळ लागला होता. बऱ्याच दिवसानी गावी जात होतो. गावची बस चुकली तर तालुक्याच्या बस स्टँडवर रात्र काढावी लागणार, ही शंका मनात येवून विरस होत होता. गावी पोचायची जबरदस्त ओढ लागली होती.

गाडी स्टँडवर पोचताच चौकशी केली. नरडवे बस आहे की गेली? "ती काय उभी आहे. सात वाजताची वस्तीची आहे." शब्द अमृता सारखे कानात शिरले. मुंबई गाडीतून सामान घेऊन नरडवे गाडीकडे धूम ठोकली. श्वास चढला होता पण गाडी मिळाल्याचा आनंद जास्त सुखवीत होता.

"गाडी रिकामी आहे ओ! आरामात चढा. अजून वेळ आहे सुटायला. सातची वेळ आहे." कंडक्टर मालवणी हेल असलेल्या शुद्ध मराठीत मला सांगत होता. चांगली खिडकी

पकडून मी विसावलो. एक चहा मिळाला असता तर? हा विचार आला. पण मुंबईच्या प्रवासाने आंबलेले, थकलेले शरीर आता सीट सोडायला तयार नव्हते. वारा छान सुटला होता. त्यामुळे उभ्या गाडीत मस्त डुलकी आली. जाग आली ती गाडी सुरू केल्याच्या आवाजाने. चला आता ही गाडी सर्व ठिकाणी थांबत गेली तरी पाऊण तासात मी घरी पोचणार होतो.

गाडी म्हणजे एक ऐन्टीक मॉडेल होते. त्याच्या प्रत्येक भागातून असंख्य आवाज येत होते. मी मनोमन प्रार्थना करत होतो. देवा गावी पोचेपर्यंत गाडी नीट चालू दे.

काही वेळा आपले ग्रह फिरलेले असतात हे खरे. गावाचा थांबा यायच्या दोन मैल अगोदर एक पूल नसलेली नदी लागली आणि नदीच्या सुक्या पात्रात बस बंद पडली. कोणत्या मुहूर्तावर मुंबई सोडली होती देव जाणे. पंधरा मिनिटे खटपट करून झाल्यावर ड्रायव्हरने भयानक बातमी दिली. दुसरी गाडी मागवावी लागेल, ही गाडी पुढे जाणार नाही. आता?

गाडीत फक्त सात पॅसेंजर उरले होते. आमचे गाव दोन मैल. पुढचे पिंपळगाव सहा मैल आणि शेवटी नरडवे दहा मैलावर असताना गाडीने संप पुकारला होता. इतर लोकांचे कोणी ना कोणी नातेवाईक आजूबाजूला होते. काही जण सामान भरपूर म्हणून गाडीतच विसावले. गावची ओढ असलेला एकटा

मी डोक्यावर बॅग, दोन्ही खांद्यात दोन पिशव्या व गळयात एक पिशवी असं सामान अडकवून घरचा रस्ता कापायचं ठरवलं. दोन मैल फार फार तर पाऊण ते एक तास. पण घरी तर पोचू, असा विचार करून चालू लागलो. डोक्यावर त्रयोदशी चतुर्दशीचा चंद्र वाट दाखवत होता.

नदीतून बाहेर पडलो आणि काही घरं रस्त्याच्या दोन्ही बाजूला सुरू झाली. झाडांनी भरलेल्या त्या परड्यानी चंद्राला पूर्ण झाकून टाकलं. रस्ता दिसेनासा झाला. थोड्याच अंतरावर एक भला मोठा साप आडवा सरसरत गेला. पाचावर धारण बसली. पुढच्या घरी मी साद घातली. गावड्यांचं घर होतं. ओळख सांगीतली. बस बंद पडल्याचं सांगून एक बांबूचा दांडा मागीतला. आपटत गेलो तर सापाची भीती नाही.

सोटा देता देता गावडे म्हणालाच, "सांभाळून जा. क्रुसाकडे सांभाळा. त्या किरीस्तावांची भुते सांज पडली की नाचत असतात." मी हसलो. भुते? हे लोक अजून विश्वास ठेवून आहेत?

दांडा आपटत चालू लागलो. कधी पिशवी खांद्यावरून घसरे, कधी गळयात लपेटलेल्या टॉवेलचा शेडा सुटून लोंबकळे. सगळं सावरत रस्ता कापत होतो. चंद्र परत सोबत करू लागला होता. छान वारा सुटला होता. त्यामुळे बरं वाटत होतं. आता

ख्रिश्चनांची सिमेट्री जवळ येत होती. गावडेच्या बोलण्याचा त्या वेळी उपहास केला खरा पण कुठे तरी मनात खळबळू लागले.

खरंच भुते असतात? छट्ट् भुते बिते काही नाहीत. इंजिनीयर झालास, अजून या भाकड कथांवर विश्वास?

वारा जोर पकडत होता. एवढ्यात कोणीतरी शीळ घालू लागले. कोण असेल? समोर रस्त्याच्या उजव्या बाजूला क्रूस दिसतोय. सिमेट्रीतून तर शीळ घालत नसेल ना कोणी? शीळ केव्हा जोरात होई मग मधेच बंद होई. नाहीतरी ख्रिश्चन हॅप्पी गो लकी. संध्याकाळी पार्टी सुरू. दारू नाच गाण्याची रेलचेल. ते तर नाचत नसतील? मेल्यावर पण असं एन्जॉय करत असतील त्यांची भुतं?

अंगात थरथर वाढत होती. पायातील जोर जातोय वाटत होतं. पण आता सुटका नव्हती. घर पाऊण एक मैल राहिलं होतं. घराचा विचार ठेवून चालू लागलो. जोराचा वारा आला. जोरदार शीळ ऐकू आली माझ्या पाठीवर हलकेच कोणी थोपटतंय वाटलं. कानामागे कोणीतरी गुदगुल्या करतय वाटलं. आता मी सगळ्या ओझ्यासकट धावल्यासारखा चालत होतो. कानामागे जोरात गुदगुली झाली. दांडा खांद्यावर टेकवून उभा राहिलो. हात कानामागे नेऊन कोण गुदगुल्या करतंय ते पहायला गेलो. भुत असेल तर मागे पहायचं नाही असं लहानपणी सगळे सांगत.

मानगुटीवर बसतं. हात कानामागे गेला. गुदगुल्या करणाऱ्याला पटकन पकडून खेचले. हातात माझ्याच टॉवेलचा शेव आला. त्याच्या सुट्या सुतानी मला गुदगुल्या होत होत्या तर?

थोडी थरथर कमी झाली. एवढ्यात जोरात वारा आला. परत ओरडल्या सारखी जोरदार शीळ आली. रस्ता आता उताराला लागला होता. झपझप पावले उचलू लागलो. एवढ्यात बाजूने कोणीतरी येतेय असा भास झाला. हलणारी सावली कोणाची म्हणून सहज मान बाजूला झाली. कोणीच नव्हतं. रस्त्याच्या बाजूच्या आंब्याची सावली कधी मागे तर कधी पुढे अशी डोलत होती. मागे कोणीच नव्हते.

परत जोरदार वारा आला. जोराची शीळ एवढ्या जवळून आली की सहज लक्ष जावे. जोराचा वारा बांबूच्या बेटातून जाता जाता शीळ घालत होता.

सगळं कोडं सुटलं होतं. उगीचच घाबरलो वाटलं. जरा श्वास स्थिरावतोय तो शेजारच्या जंगलातून चार पाच कोल्हे, कोल्हेकुई घालत धावत रस्त्यावर आले. भंबेरी उडाली. दांडा जोर जोरात आपटत मी ओरडत होतो. दांडा जमिनीवर आपटून मागचं टोक ओठावर दणकन आपटलं होतं. ओठातून भळभळ येणारं रक्त मी टॉवेलला पुसलं. टॉवेल रक्ताने भिजला म्हणून तिथेच टाकला.

दुखऱ्या ओठावर हात फिरवीत चालत होतो. आता लक्ष फक्त ओठावर होतं. झपझप चालतही होतो. समोर घर दिसू लागलं. आणि सुस्कारा सोडला. पाचशे वीस मैलांच्या प्रवासातले शेवटचे दोन मैल संपल्याचा सुस्कारा फार लांब लचक निघाला.

घरी जेवून खाऊन आडवा झालो तो सकाळी सूर्य वर आल्यावर उठलो. गावडे वडीलांशी बोलत असल्याचा आवाज आला. "तुमचो पोरगो ईलो ना घराक? मी दांडो दिललंय तो क्रुसापुढे रस्त्यात मिळालो. ह्यो रगतान भरललो टुवालय मिळालो. रात्री रांxxच्या किरीस्तावांच्या भुतांनी उच्छाद घातलो. शीट्र्यो मारी होती, वाऱ्यासारखी नाचा होती. सगळी आंब्याची तोरा पाडल्यानी. वशाड मेली. तेवाच तुमचो पोरगो चलत चलत येय होतो घराक. पोचलो की नाय बगूक इलय. रगताचो टुवाल बगून काळजात धडकी भरली हो"

*****



# न तुटणारी नाळ

“साईशेठ साडेतीन क्विंटल कांदा आणलाय नजर मारून घ्याल का?” साईनाथ आपल्याच तंद्रीत छताकडे नजर लावून बसला होता. कसल्या तरी गाढ विचारात हरवल्यासारखा वाटत होता. त्याच्या कानापर्यंत काहीच पोचत नव्हते.

“शेठ, कांदा चांगला हाय. तुम्ही बघाच एकदा. मग भाव करा. पण तुम्ही बगीतल्या वगर घेणार नाय म्हणतो बघा तुमचा मुनीम. नजर मारा म्हणजे मी मोकळा होईन.” तो शेतकरी गयावया करीत बोलत होता. अजूनही साईनाथ तंद्रीतून बाहेर येत नव्हता. मग मात्र शेतकरी उठला आणि साईनाथला हलवून जागं करू लागला.

“काय आहे बाबा? कशाला उठवतोस मला?” साईनाथ तंद्रितून बाहेर येत शेतकऱ्यावर जवळ जवळ खेकसला.

“काय करू शेठ? दोनदा सांगीतलं तरी ऐकलं नाय तुमी. विचारात बसला होता. म्हणून हालवावं लागलं शेठ, माफ करा. गावी परतायची घाई हाय. तेवढं मालावर नजर मारून घ्या म्हणजे मुनीम माल घ्यायला मोकळा.” शेतकरी अजीजीनं बोलत होता.

“शांतारामजी यांचा माल बघा आणि उतरून घ्या. हिशोब देऊन टाका आजच. तीन चार क्विंटलच्या मालासाठी माझ्याकडे का पाठवता? देऊन द्या त्यांचे पैसे आजच्या बाजारभावाने.”

हा साहेब, म्हणत शांताराम मुनीम उठले व शेतकऱ्याला घेऊन निघाले. त्यांना खूप आश्चर्य वाटलं. प्रत्येक वेळी माल बघूनच घेणारे आपले शेठ आज असे काय वागतायत. काय बिनसलंय?

साईनाथला सकाळी आंघोळ करून देवाला धूप निरांजन करताना एकदम कानांत कुजबुजल्या सारखे झाले. “झिलू! झिलूSSS रे?” बरेच वर्षांनी कोणीतरी आपल्या लहानपणीच्या नावाने बोलावत आहे याची त्याला जाणीव झाली. तो अस्वस्थ झाला. मागचे सर्व आयुष्य विसरून गेला होता. गावावरून पळून आल्यापासून आयुष्यच बदलेलं होतं. आयुष्यच कशाला सर्वच बदलेलं होतं. मूळ नाव, गाव सर्व विसरून एक नवी ओळख तयार झाली होती.

“साईनाथ शेठ” आताच चाळीशी उलटली होती. अडत बाजारात स्वत:ची अशी ओळख त्याने तयार केली होती. पण त्यासाठी खूप धडपड केली होती. गाव सोडल्यानंतर पाणी जसे उताराकडे धावते तसा हा आधाराकडे धावत होता. खूप मेहनत केली होती.

गावाहून पळून तो मुंबईला आला त्या वेळी जेमतेम बारा तेरा वर्षांचा होता. आजही तो प्रवास त्याला आठवत होता.

सकाळी ती हाक कानांत गुंजली आणि सगळे गतआयुष्य डोळ्यासमोरून झरझर सरकू लागले. बाबाच्या कुशीत झोपायचं लहानपण, त्यांच्या बरोबर होडीतून मासे पागायला जायचा हट्ट, आईची आणि बाबाची भांडणं. सगळं काही डोळ्यासमोरून सरकत होतं. साईनाथ अस्वस्थ होत होता. लहानपणी बघितलेली आयुष्याची स्वप्नं आणि आताचे आयुष्य यात फार फरक होता. बाबा समुद्रात होडी घेऊन जायचा. रात्रभर मासे पागून सकाळी, सकाळी परत यायचा. मग आई कालवणासाठी थोडे मासे काढून ठेवायची व बाकीचे घेऊन बाजारात विकायला जायची. सहा सात वर्षाचा झिलू एखादा मासा गपचूप काढून बाजूला दडवे. आई गेली की चुलीच्या मुंबरात भाजून मीठ, तिखट लावून खाऊन टाके. तृप्त होऊन मग तो झोपलेल्या बाबाच्या कुशीत शिरे. बाबा चळवळे आणि झिलूला जवळ ओढून झोपून जाई. बाबा आणि झिलू दोघेही एकमेकात असे मायेने गुंतले होते. आई बाजारातून आली की जेवणाला लागे. ताज्या माशांचे सार आणि डोंगरासारखा वाढलेला भाताचा ढीग बाप लेक ओरपत, भुरके मारत चूपचाप खात असत.

आईचे तोंड चालू असे. आईचा राग झिलूला येत असे. तोंडाळ बाई होती. बाबाला जेवतानादेखील तावातावाने काहीतरी बोल लावीत बसे. नेहमी पैसा, कपडे, कमाई यावरून बोल लावीत असे. बाबा काही न बोलता गप्प भात गिळत असे. तो खोल समुद्रात होडी घेऊन जायचा म्हणून समुद्रासारखाच शांत झाला होता असे वाटे. बाबा खूप मेहनत करून मासे पागून

आणी. आई ते विकून पैसे मिळवी आणि आपल्याकडेच ठेवी. तरी देखील ती बाबालाच बोल लावी. झिलूला बाबा आवडे. संध्याकाळी बाबा त्याला खांद्यावर घेऊन समुद्रावर जाई. वाळूवर उतरून धावायची मजा येई. बाबाचे इतर सवंगडी पण येत ते काहीतरी बाटलीतून घेऊन येत. पानांच्या द्रोणातून ते एकएक जण पीत. झिलू वाळूवरच्या कुरल्यांच्या मागे दौडत खेळत बसे. अंधार व्हायला आला की बाबा झिलूला घेऊन निघे. आता तो त्याला खांद्यावर घेत नसे. चालताना तो भेलकांडत चालत असे. झिलू मागे लागे.

"बाबा दमलंय मिया. उचलून घी ना."

"नाय रे माझ्या झिला! तुजो हात पकडतय, घेवक सांगा नुको. दोघव पडाव ना रे." बाबा झिलूला समजावे. समुद्रावर जाताना सरळ, ताठ चालणारा बाबा परतताना असा का चालतो हे झिलूला समजत नसे. पण बाबावर अपरंपार भक्ती असल्याने तो त्याचे ऐके.

ही चित्रे साईनाथाच्या डोळ्या समोरून झरझर चालत होती. आता इथे बसण्यात अर्थ नाही.

"शांतारामजी आज दुकान सांभाळा. जमलं तर संध्याकाळी येईन. नाही तर उद्या हिशोब घेईन तुमच्याकडून." एवढे बोलून साईनाथ उठला आणि सरळ खोलीवर निघाला. रेल्वे लाईनला लागून असलेल्या एका चाळीत त्याने खोली मिळवली होती. एकटा जीव त्यामुळे जास्त गरजा नव्हत्या. घराच्या जवळच असलेल्या राणेच्या खानावळीत कायम

जेवणाची सोय झाली होती. घरी चहा करण्यापुरती दोन चार भांडी, झोपायची स्टीलची फोल्डींग कॉट, एक स्टीलचे कपाट व एक भक्तिभावाने सजवलेला देव्हारा, ज्यात रवळनाथ आणि गणपतीच्या मुर्त्या ताज्या फुलांच्या हारानी सजून बसल्या होत्या.

साईनाथने घरी येऊन पलंगावर झोकून दिले. कधीच न अनुभवलेली एक आगळीच हुरहुर मनात दाटत चालली होती. उजवा हात चेहेऱ्यावर आडवा ठेवून तो उताणा पडला होता. तेवढ्यात परत एकदा कानांत आवाज गुंजला.

...........

"झिलूSS रे?"

हा आवाज बायकी होता. साईनाथ थरथरला, मनांत आले आईचे काही बरे वाईट नाही ना झाले? तिचे भूत होऊन कानात बोलत तर नाही? आपल्या या विचारासरशी तो झटकन उठून बसला. "हात!! भूत बीत काय नाय!" असं पुटपुटून परत आडवा झाला. आणि आईची कदर तरी का करायची. त्याच्या आवडत्या बाबाबरोबर ती भांडायची. आठ वर्षांचा झाला त्या वेळी थोडी थोडी समज त्याला येत होती. काळोख्या रात्रीना बाबा होडी घेऊन जात नसे. घरीच असे. जसा तो झिलूला कुशीत घ्यायचा तसाच तो आईला कुशीत घ्यायला बघायचा पण आई त्याला ढकलून द्यायची, बडबडायची-

"सोऱ्याचो वास आणि घामटान हा आंगाक तुमच्या. माका उलटी येता. बाजूक व्हा."

बाबा तरी देखील झटापट करायचा. अर्धवट झोपेत झिलूला समजायचे. आई सुटायचा प्रयत्न करतेय पण बाबा तिला जखडून जवळ घेतोय. ही झटापट थांबली की आई वैतागत उठायची. बडबड चालूच असायची.

"रांडेचो छळता. रात्री काय थंड पाण्यान न्हाव. राडो करून ठेवता नुसतो. मग उठून मागच्या पडवीत बदाबदा पाणी ओतल्याचा आवाज येई. थोडया वेळाने आई न्हाऊन आलेली वाटे. तोपर्यंत बाबाने झिलूला कुशीत घेतलेला असे. झिलू देखील कुशीत शिरून राही. बाबा आईला कशाला कुशीत घेतो. ती ढकलते, बडबडते. मला घेऊन झोपावं बाबाने. तिच्या वाटेला जाऊच नये असं वाटे. आता बाबाच्या कुशीतली उब त्याला गाढ झोपेत घेऊन जात असे. सकाळी सकाळी आई उठवी. त्या उठवण्यात कधी माया दिसली नाही. "मुडद्या उठ! केवाचा उजवाडला. माका जावचा हा सावताच्या बागेत पोफळी येचूक. उठ लवकर." झिलू गडबडून उठे. मागे जाऊन राखोंडीने तोंड धुवून येई. आई नटून तयार असे. त्याच्या पुढ्यात पेजेचा वाडगा आपटे आणि तरा तरा निघून जाई. बाबाचे मासे पागायला जाणे. चंद्रावर अवलंबून असे. तिथी प्रमाणे तो जायचा वेळ बदले. पण घरातून मात्र रात्री जेवून बाहेर निघून जाई. झिलू दहा अकरा वर्षाचा होत होता आणि त्याला थोडी समज यायला लागली होती. सकाळी बाबा यायच्या अगोदर आई तयार होई. पहाटेच उठून पाणी भरून न्हाऊन धुवून भात आणि निसत्याक बनवून ठेवी. स्वत: बकाबका खाऊन घेई. तिला ह्या सावंताच्या बागेत

सुपारी वेचायला जायची घाई असे. तरी पण जाताना ती पाथी नाहीतर वळेसर बनवून केसात माळी. पावडरीने तोंड सफेद करून टाकी. मगच निघे. आपल्याला लागणारे सामान ती माशे विकायला जाई तेव्हाच घेऊन येई.

ती बाहेर पडली की वाडीतल्या बायका तिच्याकडे पाहून, तिच्यामागे फिदी फिदी हसत. हळू हळू मला त्यांनी मारलेले ताशेरे ऐकू येत आणि मला आईची लाज वाटे.

"सुपाऱ्यो निवडूक काय थोबाड रंगवून जावक होया?"

"हरोय तसलो नी ह्याय तसला. घोवाक फसवता. मरात एक दिवस."

"पोराक एकटो टाकून ओवजत जाता बग कसा. लाजय नाय मेल्याक."

बहुतेक सगळे वाडकरी साईनाथचेच जातवाले. पावसात थोडीफार शेती व चार दोन नारळी पोफळी एवढीच संपत्ती असलेले. खपाटीला गेलेली पोटं आणि कमरेला आकडी कोयता लावून फिरणारी प्रजा. हळू हळू सगळे मासेमारी बंद करत होते. कामासाठी मालवण गाठत होते. काही लोक नारळी पोफळीवर चढण्यात तरबेज होते. ते मोठया जमीनदारांचे नारळ पाडण्याचे व पोफळी पाडण्याचे काम करून एक वेळेचे जेवण व थोडे फार पैसे कमवत. इतर वेळी भट्टी लावून दारू काढणे हा उद्योग. पण साईनाथचा बाबा तसा नव्हता. होडी घेऊन जायचा आणि मासे पागून आणायचा. होडी व्हलवून त्याचे दंड मल्ला सारखे फुलून आलेले असायचे. कित्येक वेळी दिवसापण होडी

घेऊन जायचा व तीन चार तासात परत यायचा. अर्धी टोपली तरी मासे आणायचा. समुद्राच्या पाण्यात फिरल्यामुळे काळा शाळीग्राम झाला होता. तरी तरतरीत, टुकटुकीत, चमकदार वाटायचा. फक्त संध्याकाळी चौपाटीवर वाडीतल्या चार लोकांबरोबर हातभट्टीची घेऊन तर्र व्हायची एकच खोड त्याला होती.

आई मात्र दररोज त्याच्यावर तोंडसुख घेत असायची. साईनाथचा राग राग व्हायचा. पण काय करणार? मी लहान होतो. घरातून पळून जाऊ लागलो. आमच्या शेजारीच दोन घरं होती. एक सखूकाकीचं आणि दुसरं मंगीकाकूचं. त्या बाहेर येऊन बोलताना दिसायच्या

“ऐकलंस मंग्या, हिरग्यान आरती ओवाळूक सुरवात केल्यान घोवाची. दुसरो धंदोच नाय तेका. सांज पडली की बोंब बराडो सुरू करता.”

“होय गे काय वाटात ता बोलता गो तेका. तो ऐकान बरो घेता. पैलवान हा एक लात पेकटात घातलान तर सरळ होयत रांडग्या.”

बाबा खरंच का ऐकून घेतो? का बोलत नाही? झिलूला प्रश्न पडायचा. आईचा राग यायचा. शेजारच्या बायांचाही राग यायचा. कशाला दुसऱ्यांच्या घरातले ऐकत बसतात. मग झिलू भरधांव सुटायचा समुद्रावर जायचा. वाटेत एक सुकी काटकी घ्यायचा. आणि ओल्या वाळूत खणू लागायचा जोर जोरात खणून वाळूचा ढीग एका बाजूला करत बसायचा. फूट, दोनफूट

खोलीवर पाणी झिरपायला लागायचं आणि अंगातून घामाच्या धारा लागायच्या. अंगा वरून समुद्रावरचा वारा हात फिरवायचा आणि थंड थंड वाटायचं. राग थंड व्हायचा. बराच वेळ तिथेच बसून रहायचा. रात्रीचा अंधार दाटत जायचा. चांदणे हळू हळू पसरायला लागायचे. भरती येवू लागली की समुद्राची गाज वाढायला लागायची. जोरात वहाणाऱ्या वाऱ्याने माडांच्या झावळ्यांची सळसळ वाढायची. त्यांच्या सांवल्या वाळूवर डुलायला लागायच्या. एकाद्या माडाखालची जुनी बोट व त्याच्यावर पडलेली माडाची अक्राळ विक्राळ सावली डोलायला लागली की पोटात भितीचा गोळा उभा रहायचा आणि त्यातच एकदम मागून हाक यायची ....

"झिलू SSS "

दचकून झिलू उभा व्हायचा. ही हाक त्याच्या बाबाची असायची.

"झिलू SSS रे खंय आसस?"

झिलू आवाजाच्या दिशेने धावत सुटायचा. तोंडाने बोंबटत असायचा "बाबा SSS पुळणार आसय रे! तु खंय दिसत नाय माका."

एवढ्यात बाबा किनाऱ्याच्या झुडपातून वाळूवर दिसू लागायचा. झिलू धूम ठोकत त्याच्याकडे जाऊन घट्ट मिठी मारायचा. आज त्याने हातभट्टीची लावलेली नसायची. आज तो पहाटे बोट घेऊन जाणार असायचा. झिलूचा हात पकडून तो घरची दिशा पकडायचा.

“अरे जेवक नुको तुका? उपाशी रवतलं? वाडीत शोधान ईलय. तुझो पत्त्योच नाय खंय.” झिलू गप्प राहायचा. काहीच बोलायचा नाही. मग तोच म्हणायचा, “आयशेचा बोलणा ऐकान वैतागलं रे? काय मनार नाय घ्यायचा आपण. आपला काम करायचा नी गप खायचा. मग भांडाण वाढत नाय. मी काय बोलतंय काय? असता एक एकाचो सोभाव.”

तोपर्यंत वाडी आलेली असायची. घरी पोचलो की आई परत आरती ओवाळणार का, याची भीती पोटात उभी व्हायची. पण ती काय पण बोलायची नाही. दोन पत्रावळीवर भात घालायची वर सार ओतायची एक एक मासा मघेच काढून घालायची. हे सगळे करताना भांड्यांचा आवाज वाढायचा. तोंड मात्र बंद असायचे. बाबा आणि झिलू भात ओरपून उठायचे. आणि खाटल्यावर एकमेका शेजारी गपगार बसायचे. ते दोघे घरात एकमेकांशी कधी बोलतच नसायचे.

मग आई ह्याऱ्या सावंताच्या बागेत जास्त काम म्हणून अगदी रात्र पडेपर्यंत राहू लागली. तिची नाटकं वाढू लागली. येताना ती ओच्यातून एक दोन नारळ आणि पसा दोन पशे सुपाऱ्या आणू लागली. एका मडक्यात ती सुपाऱ्या भरून ठेवे. मडके भरले की ते घेऊन ती बाजारात जाई व विकून येई. आता तिच्या पायात चप्पल आली. घरात पावडरीचे डबे आले आणि आई रंगू लागली. मला राग येई. बाबाने ही तिची नाटके बंद करावी असे वाटे. पण तो काहीच बोलत नसे.

पावसाळा आला की समुद्र खवळायचा. मग बाबाची होडी बंद. एक लहान जाळं घेऊन बाबा बाहेर पडायचा. आता त्याची मासेमारी खाडीत सुरू व्हायची. खाडीला होऊर नसेल तर मासे मिळत. बाबा कधी पण अर्धी टोपली भरल्या शिवाय घरी येत नसे. तिघांचं भागायला तेवढे मासे पकडणे जरुरी असे. पण तो केव्हा येईल याचा नेम नसे. कधी सकाळी सकाळी गेलेला बाबा दुपारी जेवायच्या वेळी येई. तर कधी दुपार टळून जाई. केव्हाही आला तरी आई मासे घेऊन संध्याकाळीच बाजारात जाई. कधी कधी बागेतून तिला यायला उशीर झाला तर मग मासे फुकट जात. शेजाऱ्यांना देखील नको असत. प्रत्येकाच्या घरातील कोणी तरी मासेमारी करीतच असे. नंतर तर आई हऱ्याच्या बागेत रात्रीपर्यंत थांबू लागली आणि मासे दुसऱ्या दिवशी सकाळीच घेऊन जाऊ लागली. ती आता मासे कुणाला तरी घालून घाईनेच परत यायची आणि तयार होऊन हऱ्याच्या बागेत जायची. माशांचे पैसे कमी मिळायचे. बाबाची मेहनत फुकट जायची असे झिलूला वाटे. त्याचा बाबा काही बोलत नसे.

............

साईनाथच्या डोळया समोरून हे चित्र झर झर सरकत होतं. आजूबाजूचं कसलंच भान त्याला नव्हतं. गाव सोडून तो आला त्या वेळापासून आत्तापर्यंत गावी गेलाच नव्हता. मग आज एवढी गावची आठवण का येतेय? मनात अशी अस्वस्थता का हे त्याला उमगत नव्हते. दुपार टळून गेली होती. पोटात भूक लागल्याची जाणीव त्याला झाली. त्याने चहा बनवला. चहा

बिस्कीटे खाऊन तो परत कॉटवर आडवा झाला. परत एकदा साईनाथ आठवणीत हरवला.

मुंबईच्या भाजी बाजारातली ती मजूरी त्याला आठवली. पहाटे तीन वाजता उठून बाजारात जावे लागे. भाजीचे मोठे गोण, टोपल्या ट्रक मधून उचलून ते अडत व्यापाऱ्यांच्या दुकानासमोर ठेवायचे. भूक लागली की ढीगातले दोन चार टोमॅटो, दोन चार काकड्या खायच्या आणि परत कामाला लागायचे. गावी कामाची सवय नव्हती, संध्याकाळी अंग ठणके. बाबाची खूप आठवण येई. डोळे पाण्यानी भरून जात. आता ठेले बंद झालेले असत आणि तो एखाद्या फळीवर आपले अंग मुटकळी करून झोपून जाई. त्याच्या अबोल आणि कामसूपणामुळे. एका अडत व्यापाऱ्याने त्याला कायम कामी ठेवून घेतले. पण त्या वेळी त्याची गडबड उडाली होती. त्यांनी नाव विचारताच झिलू गडबडला पण तोंडातून निघून गेले. "साईनाथ" त्याने त्या दिवशी स्वत:चं बारसं स्वत:च केलं होतं. मग मात्र पुढे जाता त्याला खूप खोटं बोलावं लागलं होतं. त्याचं सबंध नाव "साईनाथ मोरे" झाले. नावा बरोबर जातही बदलली. हळू हळू त्याने भाजी व्यापाऱ्यांकडून उरलेली भाजी उचलायला सुरवात केली. अडत बाजार दुपारी दोन तीन तास बंद असे त्यावेळी हा त्यातली चांगली भाजी निवडून वेगळी करू लागला. छोटे व्यापारी उपनगरातून येत व याच्याकडून स्वस्तात भाजी नेत. हळू हळू जम बसू लागला. तीन चार वर्षात त्याने स्वत:चा होलसेलचा ठेला घेतला. पैसे चांगले मिळू लागले. वर्षे निघून जात होती. झिलू

आता जगासाठी साईनाथ मोरे म्हणूनच ओळखला जाऊ लागला. कित्येक ओळखी झाल्या. काहींनी नावावरून त्याला जातभाई ठरवला. सोयरीका आणल्या. पण साईनाथने ठरवले कुणाला फसवायचे नाही. लग्न करायचेच नाही. आपल्या बाबासारखा ताप तो नकोच. त्याचा "लग्न" या शब्दावर पुरता राग होता. तो आपल्या खोलीत साईनाथ मोरे म्हणून आरामात जगत होता. त्यात त्याला बदल नको होता.

"झिलू SS रे" परत तीच हाक मनात गुंजली आणि साईनाथची तंद्री तुटली. ही हाक परत परत का ऐकायला येते? त्याला समजेना. प्रत्येक वेळी ही हाक त्याला गावाकडे नेत होती. आताही तो परत लहानपणात शिरला.

..............

आईचे आता बरे चालले होते असे वाटू लागले. नारळ आणि सुपाऱ्या ढीगानी यायला लागल्या होत्या. बाबा मासे आणायचा पण आईला विकायला जायला वेळच मिळत नसे. पोफळी पाडपाचे दिवस आले की, किंवा नारळ उतरवले की ती त्यातच असे. एकदा हऱ्या घरी आला. बाबा घरीच होता.

"हिरग्या आसा?" हऱ्याची हाळी ऐकून झिलू आणि मागून आई दारात धावले. काळ्या फटफटीवरून हऱ्या रुबाबात उतरला. गाडीची चावी काढून बोटाभोवती गरगर फिरवत पडवीत आला. आईची तारांबळ उडाली होती.

“येवा बसा! पण आमच्याकडे खुर्ची नाय.” ओशाळत आई म्हणाली. बाबा ढीम हलत नव्हता. पण आता त्याच्या नाकपुडया फुलत होत्या. चेहरा ताठरत होता. ओढ थरथरत होते पण तो काहीसुद्धा बोलत नव्हता. मधेच एखादा उसासा जोरात बाहेर पडत होता.

“हिरग्या तुझी नारळ सुपारीची बाग चांगली इली गो! माझीय एवढी चांगली नाय येवक.” हऱ्याने हंसऱ्या चेहेऱ्याने आईला सांगीतले. झिलूला नवल वाटले. आईची बाग? आमचे झोपडे सुद्धा वाळूवर सरकारी जागेत बांधलेले. आमची अशी नखभर पण जमीन नव्हती. आणि हऱ्या म्हणतोय “आईची बाग?” बाबा आईकडे चमकून पाहू लागला. त्याच्या डोळ्यात अंगार पेटला होता. का ते समजत नव्हते. बाबा तरातरा घरातून बाहेर पडला. खांद्यावर जाळे घेऊन मासे पागायला निघाला. झिलू त्याच्यामागे धावला.

“बाबा थाम मी येतय” झिलूची बोंब बाबाच्या कानापर्यंत पोचत नव्हती. वाळूत धावताना झिलूची दमछाक झाली होती. तो वाळूतच लोळण घेत रडू लागला. आज काहीतरी विपरीत होणार असे त्याला वाटू लागले. रात्र पडली तसा उठून घरचा रस्ता त्याने धरला. परत येताना सखूकाकी दिसली. बाहेरच तांदूळ पाखडीत उभी होती मिणमिणत्या चिमणीच्या प्रकाशात तिने विचारले.

“को रे तो? झिलू काय रे!”

झिलू न बोलताच घराकडे निघाला होता.

“काय बोलतलो बिचारो. रांडग्यान सगळ्याचो ईस्कोट करूचा काढल्यान हा.” सखुकाकी पुढेही काही बोलत होती. पण घरी पोचला तर आई मजेत होती. हऱ्या निघून गेला होता. आईने रांधायला घेतले होतं. आज तिने नारळ घालून सार बनवलं होतं. रात्र वर चढत होती पण बाबा येत नव्हता. झिलूला बाबाच्या आठवणीने रडू येत होतं. दोन तीन घटका गेल्यावर आईची टकळी सुरू झाली.

“खंय गेलो हा रामाक ठावक. जेवकय येळेर येवचो नाय. माझा काय मी जेवन गप झोपतलय. झिलू जेवतलं काय रे? की तुय बापासाठी थांबतलं?”

झिलू हलला नाही. बाबा रागावून गेलाय. तो आला की त्याच्या बरोबरच तो जेवणार होता. हिरग्याने स्वत:ला वाढून घेतले आणि जेवून भांडी साफ करायला बसली. बाहेरून जोरात आवाज आला. कोणीतरी धडपडलं होतं. झिलू धावत बाहेर गेला. बाबा झोकांडया खात उभा रहात होता. खांद्यावर जाळे नव्हते पण हातात बांबूचा पुरुषभर उंचीचा दांडा होता. तो घरात शिरला आणि त्याने डरकाळी फोडली.

“रांडग्या खंय आसस तू? ये हय बघतय तुझा आज तुझा कांडातच काडतय.”

आई भांडी टाकून घरात धांवली. तिला बघून बाबा पिसाळला “गरीब आसलय तरी तुका भुक्या ठेवलय काय गो?” एवढे बोलत त्याने एक दांडा आईला लगावला.

“मेलय गे बाय! शिरापडो हेच्या तोंडार. दारू पिऊन मारता माका धावा गे बायानो.” आईने बोंब ठोकली आणि वाडीतल्या सगळ्या बायका आणि पुरुष दारात जमले. झिलू धाबरून बोंब मारत रडत बाहेर पळाला. दार अडवून उभ्या असलेल्या बायकाना ढकलून तो बाहेरच्या पारीवर हमसून हमसून रडत बसला.

“पयल्यानच करूक होया होता ह्या. आता मारान काय उपेग. भंडलली बाय ती. सुदारतली थोडीच?”

“कसा नटून ओवजत जाय, भोग आता कर्माची फळा.” हे ताशेरे कशासाठी हे झिलूला समजत नव्हते. त्याला एवढेच माहीत पडत होतं की बाबा आईवर जाम तापलाय. आईनेच काय तरी केले असणार. त्या शिवाय का या बायका बाबाची बाजू घेऊन बोलतायत. आता हे केव्हा थांबणार? बाबा केव्हा जेवायला घेणार? सगळे प्रश्न त्याला भेडसावत होते. बाबा दांड्यानी झोडायचा तेवा आईची बोंब उठायची. मग त्याने बोलायला सुरवात केली.

“घर बाटवलस. काय कमी होता तुका? गरीब होतय तरी दोन घांस सुकाचे मिळतीत बघत होतय ना? काय अवदसा आठवली तुका. जा जावन तुझ्या बागेतच रव. तोंड दाखवू नको माका.” आई नुसते बोंबलत होती. नाही तर गळा काढून रडत होती. बाबाची इज्जत समुद्राच्या वाऱ्या बरोबर गावात पार चोळामोळा होऊन उडत पोचली होती. आणि शेजारच्या वाडीतले लोकही येऊन पोचले होते. काही जाणत्या लोकानी

घरात जाऊन बाबाच्या हातातला दांडा हिसकावून घेतला. हळू आवाजात त्याला समजावू लागले. झिलूला वाटलं होतं तेच झालं. आज वाईट कायतरी घडणार ते घडलं होतं. थोड्याच वेळात सगळं शांत झालं.

तमाशा संपला म्हणून बायानी घरचा रस्ता पकडला. थोर मंडळी देखील बाबा आता शांत झाला म्हणून निघून गेली. झिलू हळूच घरात शिरला. बाबा एकटाच खाटेवर निपचित पडला होता. त्याच्या कुशीत शिरत बाबाला त्याने मिठी मारली. बाबाचा हात त्याच्या डोक्या वरून फिरू लागला.

थोड्या वेळाने आईचा आवाज आला. “नारळ घालून निस्त्याक केलंय. खावक बसतास?”

“घाल मढ्यावर तुझ्या! माका काय एक खावचा नाय तुझ्या हातचा.”

“अहो! झिलू पण जेवलो नाय हा! तेच्यासाठी तरी उठा. अन्नार राग काढू नुको.”

“झिलू! जेव जा तू. माका काय नको हा.”

“मी नाय बाबा. तू जेवलस तरच जेवान. भूक लागली तरी उपाशी रवान. तू खाशीत तेवाच खायन मीया.”

बाबाने झिलूला उठवले. हात धरून जेवायला बसवले. एकाच पत्रावळीवर वाढले आणि त्याला भरवू लागला. चार पाच घास खाल्ले मग लक्षात आले बाबा खातच नाही. झिलू घास हातात घेऊन बाबाला भरवायला गेला. बाबाच चेहेरा बदलला ओठ थरथरू लागले. चेहरा वेडावाकडा हलू लागला आणि

बाबाला रडू फुटले. तो मुसमुसु लागला. त्याचा भरवण्यासाठी वर केलेला हात तसाच होता. मग झिलूचा हात पकडून त्याने घास भरवून घेतला.

........

साईनाथच्या डोळया समोरून हा प्रसंग झरझर सरकत गेला. त्यालाही गळयात आवंढा आलेला गिळवेना. दाटून आलेला गळा ठणकू लागला. डोळ्यातून धारा सुरू झाल्या. उठून एक पेला पाणी प्यायसाठी निघाला तेव्हा त्याचा झोक जात होता. कितीतरी वेळ आपलं गतजीवन त्याच्या डोळ्यासमोर येत होतं. त्याला आज कुठेही जावं असं वाटत नव्हतं पाणी पिऊन तो परत कॉटवर आडवा झाला. कॉटच्या कुरकुरण्यातूनही त्याला परत तो आवाज आला, "झिलू? खंय आसस रे!" आता ती हाक विचारणारी झाली होती."खंय आसस!" विचारत होती. कोणाची असेल. बाबाची? बाबाची नसणारच बाबातर केव्हाच गेला. समुद्राला दररोज जिंकणारा एक दिवशी त्यालाच कायमचा भेटायला गेला. झिलूला मग घरी रहाणं असह्य झालं होतं. "झिलू ss खंय आसंस?" कोण बोलवतंय मग बाबा आपल्याकडे तर बोलवत नाही ना? या विचारा बरोबर तो थरथरून गेला.

............

त्या भांडणानंतर घर सुधारलंच नाही. आई बागेत जायचीच. तिने ते सोडलं नाही. माझी बाग आहे मी कमवली आहे. असे काही तरी बरळायची. बाबा चिडायचा. पापाची कमाई कोण खाईल म्हणायचा. संध्याकाळ झाली की निघून

जायचा तो “तर्र” होऊन यायचा. मग काहीतरी भांडण चालू व्हायचं आणि आई दांड्याचा मार खायची. बोंब पाडायची, पहिल्यांदा वाडीतल्या शेजारणी खास करून सखुकाकी व मंग्याकाकी यायची. मधे पडून आईला सोडवायची. मग बाबा कॉटवर पडायचा. काय तरी बरळत असायचा आईला घाल घाल शिव्या घालायचा. हे दररोजचं होऊन बसलं होतं.

हे मासेमारी करून पोट भरणारे लोक. त्यांच्यातही जमीनदार होते. कित्येकांच्या नारळी पोफळीच्या बागा होत्या, आंबे फणस देखील होते. पण झिलूच्या बाबाकडे काहीच नव्हते. आज्याने देखील मासेमारी शिवाय काहीच केले नाही. बाबाने चांगली मासेमारी करून होडी तरी स्वत:ची केली होती.

त्याला आईने साथ दिली असती तर त्याने खूप काही केले असते. पण आई खूप श्रीमंत व्हायचा विचार करीत असावी. पण तिची बाग हे कोडे उलगडत नव्हते. बाबा कधीही न बोलणारा. पण आता दररोज शिव्या गाळी करत बसे.

एक दिवशी हऱ्या सावंत घरी आला. आई घरी नव्हती. बाबा कॉटवर आडवा झाला होता. झिलू त्याच्या जवळ बसून काहीतरी चाळे करीत होता.

“ईष्ण्याSS घरात आसस काय रे?” हऱ्याची हाळी ऐकून बाबा उठून बसला. हऱ्या आत आला. बाबा काहीच बोलत नव्हता. हऱ्यानेच सुरू केले.

“ईष्ण्या! तुका सांगतय ता ऐक, तुझ्या बायलेन माझ्या कडसून चार एकराची बाग नांवार करून घेतल्यान हा. तेचा पीक

पाणी खावन गप रव. हिरग्याक तरास देव नको. गाठ माझ्याशी हा.”

बाबा थरथरत होता. हऱ्या सावंत जमीनदार, पाटलाचा नातेवाईक, पैशाने मातब्बर. त्याच्या पुढे बाबाचा काय निभाव लागणार. राग येवून देखील तो अन्याय सहन करण्या शिवाय काहीच करू शकत नव्हता. तरी देखील तो बोलला.

“आमका नुको तुझी बाग. माशेमारीत्सून गावता ता पुरत होता आमका. कोणी सांगीतल्यान बाग देवक? मी नाय मागीतलय.”

“होय? ईचार तुझ्या बायलेक. हां ठेवलंय मी तेका. काय करशीत तू? तेचा पोटपाणी म्हणून दिलय चार एकराचो तुकडो. गप खावन रव. तेका तरास दिलस तर बग.” हऱ्या तरा तरा निघून गेला. बाबाचा चेहरा वेडावाकडा होऊन थरथरायला लागला होता. दांडा घेऊन त्याने इकडे तिकडे आपटायला सुरवात केली. आईचा आरसा फोडून टाकला. “हाSS थू!” “हाSS थू” करून राग थुंकू लागला. घरभर येरझाऱ्या घालू लागला. त्याचा आज रंग काही बरोबर वाटत नव्हता.

संध्याकाळी आई येईपर्यंत त्याने कसाबसा तग धरला. आईने घरात पाय ठेवताच तो डरकाळला.

“कोणाक इचारून ईकलस तुका. चार एकराच्या बागेसाठी घर सोडून दुसऱ्याची रांड होवक शरम नाय इली?” एवढे बोलून त्याने दोन चार दांडे आईला हाणले. आणि मोठे जाळे उचलून समुद्राकडे निघाला. झिलू त्याच्या मागे धावला.

झपझप चालत बाबा होडीकडे पोचला. होडीत जाळे टाकून, दोर सोडून होडी व्हलवत समुद्रात शिरला. अवसेचा काळोख हळू हळू पसरत होता आणि त्याची होडी खोल समुद्रात ठीपका होऊन नाहीशी झाली होती. झिलू पायाने वाळू उडवत रडत घराकडे परत निघाला.

"घरी आईची रडारड चालू होती. मधूनच बाबाला शिव्या घालत होती. तिची कटकट ऐकत झिलूने खाटल्यावर झोकून दिलं. आज बाबा ओहोटीच्या वेळी कसा गेला? भरतीला जातो नेहमी. असे बाबाचेच विचार चालू होते. केव्हा झोप लागली समजलंच नाही. रात्री केव्हा तरी जाग आली. पोटात गलबलल्या सारखं होत होतं. उपाशी झोपलो म्हणून असेल असं वाटलं. भात आणि कालवण घेतलं. पण घशाखाली एकही घास उतरेना. पोटातली गलबलही थांबत नव्हती. काहीतरी विचित्र वाटत होतं. झिलू तसाच लोळत पडला होता. उजाडले तसा समुद्रावर धावत सुटला. बाबाची बोट किनाऱ्यावर नव्हती. बाबा अजून आला नव्हता. एवढा वेळ तो कधीच राहीला नव्हता. दिवस बरा वाटेनासा झाला. भरकटत फिरत परत घरी आला. त्या वेळी आई निघून गेली होती. झिलू तळमळत झोपायचा प्रयत्न करीत होता. संध्याकाळी आई घरी आली.

"बाबा खंय रे झिलू?" तिने विचारले.

"अजून नाय ईलो." हुंदका गळ्यात दाटत होता.

"खंय रवलो देवाक ठावक." असं म्हणत आईने जेवण करायला घेतले. झिलू रात्रीपासून भुका होता तरी आताही

खायची इच्छा होत नव्हती. रात्रभर तळमळत होता बाबाची वाट बघत होता.

दुसऱ्या दिवशी सकाळी दोघे मासेमार आले. आईला विचारू लागले

"इष्णो हा घरात?"

"नाय परवाच रात्री जाळा घेवून गेले हत. आजून येवक नायत." झिलूच्या पोटात धस्स झाले. तो लक्ष देऊन ऐकू लागला.

"नाय! काय झाला हा. तेची होडी आमका समुद्रात दिसली. आत कोण दिसा नाय. म्हणून दोर पकडून घेवन ईलव. होडयेच्या आजूबाजूक शोधलंव पण कोणच दिसाक नाय. होडयेत जाळा नाय, माणूसय नाय. आमका वाटला होडी व्हावत इली असात. ईष्ण्याची होडी आमी वळाकतव. म्हणून घेवन ईलव. ईष्ण्याक सांगाक म्हणून ईलव. तो गेलो खंय?"

"तो माशे पागाक परवाच होडी घेवन गेलो. मी बगीतलय. मोठा जाळा घेवन गेल्लो." झिलू जोरात ओरडला आणि बाबाला हाका मारत समुद्राकडे धावला. थोड्या अंतरावर त्याला आईची बोंब ऐकू आली.

"समुद्रान गिळल्यान गोSSS"

झिलूच्या कानांत ही बोंब तापल्या सळी सारखी घुसली. "बाबा" "बाबा" अशा हाका मारत तो समुद्रावर पोचला. भरती पुरी आली होती. लाटा किनाऱ्यापर्यंत येत होत्या. दोन तीन होड्या लांबवर दिसत होत्या.

“बाबा बुडाला काय? पट्टीचा पोहणारा बुडेल कसा? पण दोन दिवस झाले. न खाता पिता एवढावेळ राहिलच कसा? काल पोटात गलबलत होतं. तेव्हाच त्याचे काय बरे वाईट झाले नसेल ना? रागावून गेलेला बाबा. जीव तर दिला नसेल ना? समुद्र आपल्या पोटात काही ठेवत नाही. बाबाचे प्रेत किनाऱ्यावर लागेल. झिलू समुद्राकडे पहात बसला. हळू हळू भरतीचं पाणी वाढत होतं. भरती बरोबरच समुद्र सगळे बाहेर आणून किनाऱ्यावर टाकतो. मेलेले देवमासे सुद्धा किनाऱ्यावर फेकून देतो.

ऊन वर येऊ लागले तसे झिलू उठला. आणि समुद्राच्या जवळ गेला. किनाऱ्या वरून पुऱ्या चौपाटीवर धावत सुटला. मैलभर लांबीच्या वाळूच्या किनाऱ्यावर कुठेही काही दिसत नव्हते. एक मोठी लाट पायापर्यंत पोचली तसा तिला लाथ मारून ओरडला “बाबाक गिळलंस तू. लवकर प्रेत दी तेचा.” मग रडत घराकडे धांवत सुटला.

घरी लोकांची गर्दी जमली होती. घरासमोरच मंग्या काकी, सखू काकी इतर बायकां सोबत उभ्या होत्या. सखुकाकीने झिलुला जवळ घेतला.

“ल्हान हा अजुन कसा होतला गो हेचा? इस्कोटच झालो सगळो.”

“तर काय! हिरग्या जायत ओवजत कोणाबरोबर तरी. हेचा कसा होतला?”

मग काही पुरुष मंडळीतून आवाज सुरू झाले.

“भरती सोपली काय ध्यान ठेवक होया. खंयय लागात प्रेत. बाजूच्या गावच्या होडीवाल्यांका पण सांगाक होया. प्रेत दिसला तर कळवा म्हणून.”

हे ऐकताना झिलूला रडू फुटत होतं. आतातर तो हमसा हमशी रडू लागला. सखुकाकी त्याला आपल्या घरी घेऊन गेली. डोक्यावरून हात फिरवत म्हणाली.

“वांयच भात नी कालवण खातंस? दुपार होवन गेली. भुकेलो असशीत.”

झिलूला काहीच खावेसे वाटत नव्हते. पण सखुकाकीनी दिलेला भात आणि कालवण हुंदके देत देत तो खाऊ लागला.

असेच तीन चार दिवस गेले. झिलू दररोज समुद्रावर जाऊ लागला. सबंध किनारा ओहोटीच्या वेळी पालथा घालू लागला पण त्याला बाबा मिळाला नाही. आजूबाजूच्या गावातूनही काही सांगावा आला नाही.

तो सखुकाकीकडेच राहू लागला. केव्हाही घरी जाई. आई त्याला जेवायचे विचारी. तो सखूकाकीकडे जेवल्याचे सांगे. मग आई बडबडायला सुरू करे.

“बापाशीन घात केल्यान. पोर पण घरा भायर. माका पाणी देणारा तरी कोण रवात काय? मरतय मी घरासाठी. पण सगळे चल्ले माका सोडून.” मग हुंदके देऊन रडणे सुरू. झिलू कॉटवर अंग झोकून देई. बाबाची मुर्ती डोळ्यासमोर येई. डोळ्यातून धारा लागत. आवाज न काढता तो डोळ्याचे पाणी वाहू देई.

पंधरा दिवस झाले आणि आई कामावर जाऊ लागली. झिलू विचार करू लागला. बाबा गेला आता आपल्याला कमवायला शिकले पाहिजे. तो समुद्रावरच्या होडीवाल्या बरोबर बोलू लागला. त्याना जाळे टाकायला, मासे पागायला शिकवा म्हणून मागे लागला. पण त्यांनी तेवढे लक्ष घातले नाही. बाबाचं लहान जाळं घरी होतं. तो ते घेऊन समुद्रात गेला. कंबर भर पाण्यात गेल्यावर जाळे फेकायला गेला तर ते सगळे गुंतून गेले. बाकीचे टाकत तेव्हा जाळे फुलोरा होऊन पडे. याचे खूप प्रयत्न करूनही तसे पडत नव्हते. लाटा त्याला मागे ढकलत नेत होत्या. दोन एक तास अशी मेहनत केल्यावर दमछाक झाली. एकही मासा मिळाला नव्हता. जाळे नीट गोळा करून बाबा जसा खांद्यावर टाकून घरी यायचा तसाच तोही निघाला.

"कोणाचो रे तू?" एक असेच मासे पागून परत जाणाऱ्याने विचारले.

"ईष्णूचो झील."

"हां! हां! तो बुडालो तो? मग माशे पागूक गेललं? किती गावले?"

"काय नाय गावक. पयल्यांदाच जाळा घेवन इलंय. टाकूचा म्हायत नाय. शिकवश्यात माका?"

"अरे तुझी उंची खंय आसा. माशे पागूक कमीत कमी तीन चार फूट पाण्यात जावक होया. तरच गावतीत. अजून ल्हान हस तू."

“पण माका जाळा पसरवून टाकूचा तरी शिकवा. मग मी होडयेत्सून टाकीन जाळा जरा आत जावन.”

.............

............

साईनाथच्या डोळ्यासमोरुन हे प्रसंग झरझर निघत होते. आता रात्र पडायला आली होती. तो उठला आणि दररोज प्रमाणे देवाला दिवा बत्ती करायला निघाला. अंग पडून पडून मोळेल्या सारखे झाले होते. धडपडतच त्यांने दिवाबत्ती केली. चाळीतून खाली जाऊन केळी घेऊन आला. आज जेवायची त्याला इच्छाच नव्हती. घरी येऊन केळी खाऊन परत आडवा झाला आणि त्याच विचार चक्रात शिरला.

..........

..........

आता आईकडे हऱ्या सावंत राजरोस येत होता. शेजार पाजारचे सबंध आईमुळे तुटत चालले होतं. एक दिवशी हऱ्या जेवणाच्या वेळी आला. आईने नारळ घालून माशे केले होतं. हऱ्याने मासे भातावर ताव मारला आणि आईने सुरू केले.

“हे गेले. माशाचे पैशे येणा बंद झाला. बागेतल्या नारळ नी सुपारीवर जगायचा कसा? काय तरी पैशाची तजवीज करूची लागतली.” स्वत:शीच बोलत होती, तरी ती हऱ्याला सुचवित होती.

“गो! चार एकर दिलंय तेचा उत्पन काय थोडा नाय. दोघांचा सज भागात. आणि काय देव तुका? माका माझे घरचे भायर काढतीत आणखी जमीन दिलंय तर.”

“जमिन नुको. महीन्याक दोन पांचशे दिलास तरी चलात.” मग ह्ऱ्या चिडला आईला अद्वातद्वा बोलला. आणि रागाने निघून गेला. खाटल्यावर पडून सगळे ऐकताना वाटले, आईला पैशाची हाव सुटली आहे. आता ह्ऱ्या यायचा नाही. बरं झालं.

पण तसं झालं नाही दुसऱ्या दिवशी ह्ऱ्या आला. आणि आईला पाचशे रुपये देऊन गेला. वर सांगून गेला “आज पाचशे दिलय. पुढच्या म्हयन्यापासून तीनशेच देयन तेवढ्यात भागव.”

पण आता आईचे आणि त्याचे मधून मधून भांडण होतच असे. झिलू कंटाळून गेला आणि घाबरूनही गेला.

एक दिवशी तडक उठला आणि त्याने बस स्टँड गाठला. सगळे मुंबईला जातात आणि चांगले पैसे कमवतात असे त्याने ऐकले होते. खिशात एक दमडी देखील नव्हती. बस स्टँडवर मुंबईची बस केव्हाची आहे ते माहीत नव्हते, दुपारी कधीतरी आहे समजल्यावर घाबरला. घरून कोणी शोधत आले तर परत घेऊन जातील वाटू लागले. त्याला परत जायचे नव्हते. पण येणार कोण? आई रात्रीच येणार. सखू काकी दुपारी जेवणाच्या वेळेला शोघणार, नाही पोचलो जेवायला तर चार दोन हाका मारून पाहील आणि गप्प बसेल.

दुपार टळली तशी पोटात भुक पेटली. बसस्टँडवरच्या पाण्याच्या टाकीतून पोट टम्म होईपर्यंत त्याने पाणी पिऊन घेतले.

दुपार चांगलीच टळून गेल्यावर मुंबईची बस लागली. शेवटच्या बाकावर अगदी कोपऱ्यात अंग चोरून तो बसला. गाडी भरून गेली. आणि सुटली देखील. झिलूला हायसे वाटले.

कंडक्टर तिकीटे देत येत होता. शेवटच्या रांगेपर्यंत पोचला. दोघा तिघांना तिकिटे दिली. पण तेवढ्यात बस थांबली. कोणी तरी चढू लागले आणि कंडक्टर ओरडू लागला.

“बस फुल आसा बसाक जागा नाय. चढू नुको.”

तरी दोघेजण चढलेच. सीटच्या मधेच खाली बसून गेले. बस सुरू झाली कंडक्टर वैतागला होता. झिलू शेजारच्या दोन पॅसेंजरना तिकीट देऊन त्या नवीन चढलेल्या लोकांकडे वळला. कोपऱ्यात अंग चोरून बसलेल्या झिलूकडे त्याची नजर गेलीच नाही. झिलूने सुटकेचा निश्वास सोडला. थोड्याच वेळात भुकेने आणि सकाळ पासूनच्या पायपीटीने दमलेला झिलू गाढ झोपेत गेला.

दुसऱ्या दिवशी सकाळी बस मुंबईत पोचली, “परळ आले उतरा. गाडी परळपर्यंतच आहे.” कंडक्टर आता मुंबईची भाषा बोलू लागला होता. झिलू उतरला. सगळीकडे गर्दीच गर्दी दिसत होती. मुंग्यांसारखी लोकं इकडे तिकडे धावत होती. झिलू बावरून काय करावे या विचारात गढला होता. एवढयात एका वयस्क माणसाने त्याला विचारले, “बॅग नेशील कारे पोरा टॅक्सीपर्यंत? धा रुपये देईन.” झिलूला आनंद झाला पटकन त्यांची बॅग उचलून तो चालू लागला. मिळालेले दहा रुपये घेऊन वडापाव खायला धावला. पोटाची भूक थोडी तरी निवळली.

मुंबई खरंच कोणाला भुकं ठेवीत नाही. मग त्याने ठरवलं स्टँडवरच हमाली करू. सगळीच सोय आहे स्टँडवर.

त्या दिवशी संध्याकाळपर्यंत त्याला साठ रुपये मिळाले होते. स्टँडच्या बाजूलाच असलेल्या हॉटेलात जेवण घेतले तर लग्नात वाढतात तसे ताट समोर आले. पुऱ्या, दोन भाज्या, आमटी कोशंबीर, कांदा लिंबू सगळेच होतं. भात आणि मासे एवढेच खाणे माहीत असलेल्या झिलूला ही मेजवानीच वाटली. स्टँडवरच्या एका बाकावर मुटकुळी करून तो झोपी गेला.

अशी परळच्या स्टँडवरची हमाली करता करता भायखळ्याला पोचला. भाजी बाजारात पहाटेपासूनच हमाली मिळत असे. सारखे ट्रक येत. भाजी उतरवून अडतांच्या ठेल्यावर नेऊन ठेवायची. संध्याकाळपर्यंत दोनशे ते अडीचशे रुपये मिळायचे. झिलूचे आता बरे चालले होते. हळू हळू त्याने भाजीचा होलसेल व्यापार करायला सुरवात केली. एका चाळीत खोलीही घेतली. अंगावर चांगले कपडे आले. पण या सगळयात तो आपले नाव बदलून “साईनाथ” झाला. सगळेच त्याला साईनाथ म्हणून ओळखू लागले. कुठून तरी ऐकलेले “मोरे” हे आडनावही तो सांगू लागला. आणि गावच्या झिलूचा साईनाथ मोरे झाला. कामाच्या व्यापात गाव, आई, बाबा, गत आयुष्य, समुद्र, होड्या, जाळी, वाडी, सखुकाकी, मंग्याकाकी सगळे सगळे पुसट होत चालले.

..........

रात्र बरीच झाली होती. साईनाथच्या डोळया समोरून हा आपला गतेतिहास झरझर सरकत होता. पूर्ण दिवस त्याने अस्वथतेत लोळत काढला होता. पण मन थाऱ्यावर येतच नव्हते.

"झिलू sss झिलू ये ना रे एकदा " आता ही हाक स्पष्टच ऐकू आल्यासारखी वाटली साईनाथ डोळे फाडून आजूबाजूला पाहू लागला. आवाज ओळखीचा वाटत नव्हता, पण बोलण्याचा ढंग मात्र ओळखीचा वाटत होता. कोण असेल? बाबा? हो त्याचं तर प्रेतही मिळालं नव्हतं. मग तो काय जिवंत होता. तो इतके दिवस कुठे ऱ्हायला होता? परत आला असेल का? पहाण्यासाठी उतावळा झाला असेल का? तोच हाक मारीत सुटलाय का? कित्येक प्रश्नानी थैमान घालून डोकं भणभणलं. हा आवाज आणि बोलण्याचा ढंग बाबाचा वाटत नव्हता.

गावी जावे का? हे मनात आले. आणि हळूहळू जोर पकडू लागले. रात्र अशी तळमळत घालवली सकाळी उठला आणि घाई घाईने ठेल्यावर गेला. ठेल्यावरची थोडी फार भाजी होती ती बाजूच्या ठेलेवाल्याला देऊन म्हणाला "आल्यावर पैसे दिलेस तरी चालेल. गावी जातोय चार सहा दिवसानी येईन. ठेला बंद करून घरी आला. बस संध्याकाळी होती. थोडी फार खरेदी करावी वाटली. सखुकाकी आणि मंग्याकाकीसाठी मिठाईचे पुडे घेतले, दोघांनाही साड्या घेतल्या. मग आई आठवली. तिच्यासाठीही एक साडी घेतली. खरोखर तर घेऊ नये असे

वाटत होते. पण मग घ्यायचा विचार सारखा सारखा येऊ लागला. म्हणून घेतली.

सर्व सामान एका बॅगेत घातले. थोडे कपडे, टॉवेल, साबण गोळा करून बॅगेत कोंबले. दुपार होत आली होती. साईनाथ बाहेर पडला. परळ स्टँडवर जाता जाता त्याने एका हॉटेलात जेवून घेतलं. बस स्टँडवर पोचला तर बस लागायला वेळ होता.

बस मधे बसल्यावर साईनाथचे विचार गावाकडे धांवायला लागले. त्यात तो गुंगून गेला. समुद्र डोळ्यासमोर आला. बाबाची होडी डोळ्यासमोर आली. आपली केंबळ्याची झोपडी आली. अठ्ठावीस तीस वर्षांनी तो गावाकडे परतत होता. मुंबईने त्याला चांगलं आयुष्य दिले होतं. शिक्षण नसतानाही त्याचा भाजीच्या धंद्यात जम बसला होता. चार पैसे गाठीला बाळगून होता.

त्याने लग्नच केलं नव्हतं. एकतर नाव बदलून जात दडवली होती. व आई बाबाची भांडणं बघून त्याचा लग्नावरचा विश्वासच उडाला होता. तो एकटाच सुखात जगत होता. गावाची आठवणही विसरत चालला होता, पण अचानक त्याला ती हाक ऐकू आली आणि सगळंच बदललं. गावाकडे जायची ओढ लागली. कशी लागली? का लागली?

थंड हवेच्या झुळुकांनी त्याला डुलकी येवू लागली आणि बसच्या खिडकीत डोकं टेकून तो झोपी गेला.

दुसऱ्या दिवशी सकाळी सकाळी बस गावी पोचली होती. गावचा नूर पालटला होता. सगळे रस्ते डांबरी झाले होते. बस

स्टँडवर रिक्षा दिसत होत्या. आता पायपीट करायची जरूर नव्हती. रिक्षा करून तो घराकडे निघाला. कोळी वस्तीत रिक्षा पोचली. सखुकाकीच्या झोपडी वरूनच त्याच्या झोपडीकडे जायचा रस्ता होता.

“सखुकाकी गे सखुकाकी!” साईनाथने साद घातली.

“सासूमाय हिरग्याआतेकडे गेली हा! असे ओरडत एक मुलगी वजा बाई दारात आली. हिरवी साडी, हिरवा चुडा या वरून नुकतेच लग्न झालेली वाटत होती. सखुकाकीला मुलगा झालेला दिसतोय लग्नपण झाले त्याचे?” असा विचार चमकून गेला. तो आपल्या घराकडे वळला. घराच्या दारात पोचताच त्याला आतले संभाषण ऐकू येवू लागले.

“खा गो वायच! ताकत येवक नुको?” हा आवाज सखुकाकीचा होता. साईनाथ घरात शिरला. आई खाटल्यावर पडली होती. सखुकाकी तिला भरवत होती. हे चित्र बघून साईनाथ थक्क झाला. सखुकाकीचे पांढरे झालेले केस तिच्या वाढलेल्या वयाचा अंदाज देत होते.

“सखुकाकी?” साईनाथने साद घातली.

“गे बाय! कोण?” म्हणत सखुकाकी वळली.

“कोण तुमी वळाखलय नाय वो”

साईनाथ पुढे झाला. वाकून त्याने सखुकाकीच्या पायाना स्पर्श केला. व म्हणाला,

“मी साई.....अर्रर. झिलू.. ओळखलंस नाय?”

“झिलू! अरे खय होतंस रे? आमी शोधून थकलाव. वाटला बापाशीच्या पायार पाय ठेवन गेलस की काय? किती वरसा झाली रे! खंय होतस रे? बघ गो हिरग्या तुझो झिलू ईलो.”

सखूकाकीला उमाळा आला होता. आनंद ओसंडून वहात होता. डोळ्यातून झरकन् दोन धारा निघाल्या आणि तिने पदर डोळ्याला लावला. उठत तिच्या रडक्या थरथरत्या आवाजात म्हणाली, “झिलू! भरव आता तुझ्या आयशीक. लय ध्यास घेतलान तुझो. झिलू खंय! झिलू खंय!चो जप करा होती. बरा झाला ईलस तो.” आणि मागून एक हुंदका फुटला.

साईनाथ पुढे होत आईकडे पाहू लागला. आईला लकवा झाला होता.

“ये बस! हय” आईने हुंदका दाबत उजव्या हाताने जागा दाखवली. तिने कॉटवर तिच्या शेजारी बसायची खूण केली. पण साईनाथने एक स्टूल ओढून कॉट जवळ घेतले आणि त्यावर तो बसला.

“लांब बसलं रे! अजून राग हा माझ्यार?” आईचा आवाज बद्लला होता. लकव्याने डावी बाजू निकामी केली होती. पण चेहेऱ्यापर्यंत आला नव्हता. सखुकाकीच्या हातून भांडे घेऊन त्याने चमच्याने आईला पेजेच्या घास पुढे केला आणि आईला हुंदका फुटला. ती हमसून रडू लागली. सखूकाकीने उशा जवळ जाऊन तिच्या डोक्यावरून हात फिरवायला सुरवात केली.

“गप रव गो बाय! आता इलो हा ना झिलू? झाला ना तुझ्या मनासारखा? किती आठाव काढी होतस चार दिवस. झिलू खंय, झिलू ये रे! ह्याच बोला रे दिवसभर.”

सखूकाकी सांगत होती आणि साईनाथला आठवत होता तो भास. मुंबईला त्याला ऐकू आलेली हाक. म्हणजे ती आईची होती तर. आईचा घोगरा झालेला आवाज पण बोलण्याचा ढंग न बदललेला म्हणून ओळखीचा वाटूनही ओळखता येत नव्हता.

“आता राग ईसर. आणि बस तेच्या जवळ. भरव तेका. आमी कायव झाला तरी परकी. जाग्यार पडला त्यावेळपासून दिवसभर मी बगतय. आणि रात्री मंग्या येता.” सखुकाकी झिलूला हाताला धरून उठवता उठवता बडबडत होती. तिने त्याला आई जवळ खाटल्यावर नेऊन बसवलं. त्याला आईची सवयच नव्हती. पण अगतिक होऊन पडलेल्या तिला पाहून झिलूच्या पोटात गलबल्या सारखं होत होतं. तिच्या शेजारी जाऊन बसला. आणि तिने डोळे भरून पहायला सुरवात केली तसा उठला आणि म्हणाला,

“हात पाय धुवून येतय गे सखुकाकी. मग सांग माका हिचा असा कसा झाला ता?”

“हा मीय जेवन येतय, तुकाय जेवान हाडतय. फणसाची भाजी, खाशीत ना” सखुकाकीच्या या एका वाक्यात प्रेम, जिव्हाळा, माया सगळे समावले होते.

कोंकण सगळेच गरीब. निसर्गाची रेलचेल असूनही हे सगळे हाता तोंडाची गाठ पडली तर पडली, यातले. समुद्रात,

रानात, बागेत पेरलेले, असे काही ना काही दिवसा काठी मिळवून त्यातच समाधानाने राहाणारे, पाव्हणा पै आला की त्या वेळी सण उजवणारे, घरी आलेल्याला आपण अर्धपोटी राहून जेवू घालणारे. साईनाथचं मन सखुकाकीच्या त्या वाक्याने हलून गेलं. काय होतं सखुकाकीकडे? अठराविश्वे दारीद्र्य. तरी देखील गाव सोडायच्या अगोदर तिने साईनाथला कितीतरी दिवस जेवू घातलं होतं. आजही ती सांगत होती. "जेवाण घेवन येतंय."

"थांब! सखुकाकी भेट हाडलय तुझ्यासाठी घेवन जा." साईनाथ उठला आणि तिच्यासाठी आणलेली साडी व मिठाई बॅगेतून काढून तिच्या हातात ठेवली.

"बघ माका म्हायत नाय, तुका सून ईली ती, नायतर तिच्यासाठीय आणलं असतय. आणि मंग्याकाकीक सांग जाता जाता बोलावलंय म्हणून."

"रे माझो गुणी झिलू तो! हिरग्या बग गो, झिलून नवी कोरी साडी हाडलान माका. अरे! आयशीक नाय हाडलंस? "

"हाडलंय तर. पण तिका वायच उठान उभी रवांदे मग देयन. नेशीत मग."

तोपर्यंत साडी. उघडून खांद्यावर टाकून ती आनंदी सखुकाकी डोळे मिचकावीत घराकडे निघाली.

झिलू हात पाय धुईपर्यंत. मंग्याकाकी येऊन हजर झाली. "खंय होतं रे झिलू एवडी वर्सा? सगळ्यांका इसारलं काय रे?"

साईनाथने तिलाही साडी दिली, मिठाई दिली. पाया पडायला गेला तर तिने घट्ट मिठी मारली. डोक्यावरून हात

फिरवत राहिली. एवढ्या वर्षात मनात साठवलेली माया भरभरून बाहेर पडत होती.

गाव सोडलं त्या वेळी तो बारा तेरा वर्षांचाच होता. विचार करण्याचे वय नव्हते. आता तो विचार करू शकत होता. ‘गाव सोडून गेलो आणि या निर्मळ प्रेमाला मुकलो.’

“जेवन घे रे.” दारातून येताना सखुकाकी ओरडतच आत शिरली. ताट जमिनीवर ठेवून तिने पाट म्हणून एक फळकूट ठेवले. बसेपर्यंत पाण्याचा लोटा भरून आणला. एका बाजूला मंग्याकाकी आणि दुसऱ्या बाजूला सखुकाकी बसून मग एवढया वर्षांचा इतिहास झिलूला सांगायला लागल्या. साईनाथ असा कधी जेवलाच नव्हता. एकटेपणाची सवय पडलेला साईनाथ बावरतच जेवत होता. पण त्याचं लक्ष त्यांच्या गोष्टीत शिरत होतं.

झिलू निघून गेल्यावर दुसऱ्या दिवशी त्याच्या आईने सगळीकडे शोधा शोध सुरू केली होती. आणि संध्याकाळी बोंब मारून गांव गोळा केला होता.

“बापाशी पाठसून समुद्रात घुसलो रे SSS माजो झील. रोज जाळा घेवन जाय समुद्रार” अशा अनेक आठवणी काढत ती रडत होती. अशा बऱ्याच आठवणी एकदा मंग्याकाकी तर एकदा सखूकाकी साईनाथला सांगत होत्या. मग विषय आईच्या बागेतल्या घरावर आला. आणि त्याला नव्याच गोष्टी समजू लागल्या.

तो गाव सोडून गेला आणि हळू हळू आई थारावली. सखुकाकी आणि मंग्याकाकीनी तिला रोखून धरले. ती

बागेतल्या घरात जायला निघाली होती. त्यांनी तिला समजावले झिलू आणि झिलूचा बाबा दोघांचीही प्रेते मिळाली नाहीत. कशावरून ते जिवंत नसतील. कोणी परत आले आणि झोपडी रिकामी बघून निघून गेले, तर काय करशील? ह्या सावंताने, त्याच्या त्या बागेने दोघांचा घास घेतला. कशाला जाते तिथे? अशी समजूत काढून तिला रहायला लावले. ही गोष्ट ऐकताना एकदम सखुकाकी आई काय म्हणाली ते बोलू लागली आणि साईनाथचा घास हातातच राहिला. सखुकाकी सांगत होती.

"हिरग्या होय म्हणाला. नाय जायत त्या घरात म्हणाला. तेका जमिनवाला व्होयचा होता...."

आईला दारीद्र्यातून वर यायचे होते. बाबासाठी आणि माझ्यासाठी. गोष्ट पुढे सरकायच्या आधीच आईला जोराचा ठसका लागला. तशी सखूकाकी धावली. मंग्याकाकी पाण्याचा पेला घेऊन आली. आईला थारवत होत्या. साईनाथने जेवण तसेच ठेवले आणि हात धुवून तो आईकडे धावला. हळू हळू डोक्यावरून हात फिरवत तो तिच्या शेजारी बसला. आई म्हणून की फक्त माणूसकी म्हणून, हे त्याला समजले नाही. हळू हळू आई थारावली, तसे सखुकाकी म्हणाली, "चल गो मंग्या, बसु दे आयस आणि लेकाक बऱ्याच वर्सान भेटतं हत. झिलू हाळी दी रे काय लागला तर." असे म्हणत त्या दोघी निघाल्या. साईनाथ आईजवळ बसून होता. आईच्या डोळयातून आता धारा सुरू झाल्या होत्या. तिला झिलूचा डोक्यावरुन फिरणारा हात

सुखावत होता. ती एकदम घोगऱ्या झालेल्या आवाजात बोलू लागली.

“आयकलंस ना? अरे खरोखर मी सगळा घरासाठी करी होतंय. तुझो बापूस दिवसा रात्री केवाय उठा नी समुद्रात जाय. किती जणांका समुद्रान गिळल्यान. माजो जीव थाऱ्यार नसा रे तो गेलो काय. त्या माशात्सून काय मिळा? माका ह्या गरीबीत्सून भायर पडूचा होता. सांवताच्या बागेत सुपाऱ्यो निवडूक जाय. तेच्यात्सून. जा काय मिळा ता खावकच पुरा पडी. एक दिवस हऱ्याची नजर माझ्यार पडली. तो माज्याकडे बगतच रवललो........”

त्या नजरेने तिला बरेच काही सांगीतले. तिने ठरवले हऱ्या सावंताला जाळयात ओढायचा. त्याला झुलवायचा. त्याची खूप बागायती जमीन होती. एकदा तुकडा नावावर करून घ्यायचा. आपल्याकडे देण्यासारखे एकच आहे. ते शस्त्र वापरायचे. आणि ही गरीबी कायमची मिटवायची. ह्या असुरी विचाराने तिला झपाटले. ती त्याच्या बागेत जास्त वेळ राहू लागली. हक्काने पांच सात नारळ आणि चार पांच पशे सुपारी बिन दिक्कत घेऊन येऊ लागली. हऱ्या पाही पण नजरे आड करी. इथेच तिचा पहिला विजय झाला. एक दिवस हऱ्याने. तिचा हात पकडायचा प्रयत्न केला. तो हिसडून टाकून ती म्हणाली. आम्ही गरीब आहोत. तुमच्या तोडीचे थोडेच आहोत. मला एक जमिनीचा तुकडा दे. दहा पंधरा माड आणि पोफळी असलेला तरच जमेल. नायतर घरी येईन तुझ्या बायलेला सांगायला. तिला माहीत होतं

हे पाप आहे. लोकं नावं ठेवणार पण दारिद्र्य जायला आणि झिलूला आणि त्याच्या बाबाला चांगले जमीनदार होण्याच्या आणि श्रीमंत करण्याच्या भुताने ती पछाडली होती. पुढचे रामायण घडत गेले बाबा समुद्रात गेला. माणसांच्या समुद्रात झिलू हरवला. ती एकटी झाली. चार एकराची बाग तिने मिळवली होती. पण तिघांचाही बळी दिल्यानंतरच ती मिळाली होती.

झिलू गेल्यानंतर तिने स्वत:साठी म्हणून बाग कशीतरी सांभाळायला सुरूवात केली. ध्यास होता तो झिलूचा. झिलू एक दिवस येईल. बाबा, तोही एक दिवस येईल म्हणून ती जिवंत होती.

तिला जगण्याची गरज म्हणूनच बाग राहिली होती. तिला केव्हाच समजले होते. तिची खरी श्रीमंती हातून निसटून गेली होती. बागेत हळू हळू पैसे जमवत ती घर बांधत होती. हऱ्या घर होईपर्यंत चूप होता. मग त्याने त्रास द्यायला सुरवात केली. “बाग माजी हा. खंड दी नायतर बाग सोड” म्हणू लागला. नारळ, सुपाऱ्या परस्पर काढून नेऊ लागला. भांडणे वाढू लागली. शेवटी हिरा पंचायतीत गेली.

“बाग माजी हा, हेणीच नावार करून दिल्यान. नी आता पीक चोरून नेता. खंड दी नायतर बाग सोड म्हणता. ईस, तीस वर्सा बाग माजी हा या गावाक म्हायत हा.” पंचाकडे ही दरखास्त केली. पंच बसले, हिऱ्याला बोलावले. त्याने जे उत्तर दिले ते

ऐकून सगळे चक्रावले. तो म्हणाला, "बाग माजीच हा. हेच्याकडे काय पुरावो हा,,, रुजु करूक सांगा."

पंचाना याचे ढंग माहीत होते. बाग कित्येक वर्षे हिरग्याची बाग म्हणूनच सगळे ओळखत होते.

"कागद लिवन दिल्यान माका. हा माज्याकडे."

"हाडून दाकव काय तो कागद. बगांदे पंचांका काय हा ता."

"अरे पण सगळ्या गावाक म्हायत हा तू ती बाग हिरग्याक दिलस ती." पंच

"होय पण बाग ईकत दिलय, बक्षीस दिलय की पट्ट्यान दिलय. कशी दिलय ता सांगां दे तेका. नायतर कागद दाकवु दे."

हिराला संशय आला. आपल्याला वाचता येत नाही. याने काय लिहिलेय त्यात. ती उठली आणि येतय म्हणत घरी धावली. कागद घेवून ती परत आली. पंचांच्या हातात कागद ठेवून म्हणाली,

"ह्यो घेवा. काय लिवला ता मोठ्यान वाचा माकाय समजांदे."

पंचानी कागद वाचला. आणि ते हिऱ्या सावंतावर उखडले.

"हिऱ्या लाज नाय वाटत एकारद्याक फसवूक? तेका नादाक लावलंस. तेचा घर नासवलंस. शिकलंला नाय बगून ह्यो असो कागद बनवलंस? खंय फेडशीत ह्या पाप?"

"काय? लिवला काय हा त्यांत?" हिरग्याने विचारले

पंचानी तिला फोड करून सांगीतले. जोपर्यंत हिरग्या सावंताबरोबर राहील तोपर्यंत ती या बागेचा उपभोग करेल. ती जर त्याला सोडून गेली तर बाग परत घेण्याचा अधिकार सावंताकडेच असेल. या बागेवर हिरग्याच्या नवऱ्याचा किंवा मुलाचा कोणताही अधिकार नाही.

हऱ्याचा संग तिने केव्हाच सोडला होता. आता हे ऐकल्यावर तिच्या पायाखालची जमीन सरकली. "मुडद्या" म्हणत ती हिऱ्या सावंतावर वाघिणीसारखी धांवून गेली. पण मधेच अडखळली, धडपडली. उठली . तरी चालत घरी आली. खाटल्यावर पडली तर डावी बाजू हुळ हुळी झाली. आकसल्या सारखी वाटू लागली. डोके दुखत होते. उठायला गेली तर कोसळलीच. डावा पाय लुळा पडला होता. हात थोडा फार हलवता येत होता. तिने जोरात किंचाळी मारली.

"सखू बाय SSS" सखुकाकी धावत आली. न हलणाऱ्या हिराला बघून तिने मंग्या काकीला आणि इतर बायकाना बोंब मारून बोलवले. हिचा सारखा घोष चालू होता.

"झिलू रे SS खंय आसस?"

"झिलू रे SS एकदा तरी ये ना?"

साईनाथला त्याची जाणीव आत्ता होत होती. आधीच येवून जायला पाहिजे होते असे त्याला वाटू लागले. आईच्या डोक्यावरून फिरणारा हात आता फक्त माणूसकी म्हणून नव्हे तर भरलेल्या मायेने फिरत होता. तो त्याच्या आईला समजत होता.

तिला शांती आणि समाधान मिळत होतं. ती डोळे मिटून शांत पडली होती. मधेच जागी होऊन म्हणाली.

“माका पोचवल्याशिवाय परत जाव नुको हा. कसली रे माजी शिरमंती. सगळाच घालवून बसलंय.” साईनाथचा हात पटकरून तिच्या तोंडावर गेला.

“असा बोलू नये! मी खंय नाय जात.” त्या वाक्याने आणि त्या स्पर्शाने. त्याच्या आईच्या मुखावर शांत भाव पसरला आणि दुसऱ्या क्षणी ती झोपी गेली.

रात्री मंग्याकाकी आली आणि म्हणाली, “झिलू झोपतय रे मी हंयच. तुका नाय जमुचा आयशेचे कपडे बदलूक. आज बरा दिसता हा हिरग्या. पेज बरी जेवला. तू ईलस ना म्हणून थारावला रे!”

असे म्हणत तिने आपली पथारी आईच्या कॉट शेजारी लावली. साईनाथ झोपडीच्या दारात डाळी टाकून आडवा झाला. सगळ्याच आयुष्याचे, संबंधांचे त्याला कोडे पडले होते. विचार करता करता त्याला वाटले, गावाला आईने काढलेली आठवण मुंबईपर्यंत आपल्याला कशी काय ऐकू आली? आणि पोटात गलबलल्यासारखे का वाटले? बाबा रागाने समुद्रावर गेला त्या रात्री सुद्धा असेच गलबलले होते. हा कुठला संकेत मिळतो? सखुकाकी म्हणते तशी नाळ कापली तरी जन्मभर तुटत नसते का? अदृश्य पणे जोडलेलीच रहाते का? आई बाबांबरोबर. दोनदा आलेला हा अनुभव बघता सखुकाकीचा हा समज का मानायचा नाही? पांच इंद्रीयांच्या बाहेर सहावी ही नाळ संकेत

देत राहते. हेच खरं. आता आईला बरोबर घेऊन मुंबईला जायचं आणि चांगला उपचार करवून घ्यायचा. साईनाथाचा हा निश्चय झाला. दुसऱ्या दिवशी त्याने तो सगळ्याना सांगीतला. सखुकाकी व मंग्याकाकी मुसमुसू लागल्या. त्यांना आनंद झाला होता.

आणि हिरग्याला तिची खरी श्रीमंती परत मिळाली होती. मुलाबरोबर जोडलेल्या नाळेमुळे.

*****



# विठुआक्का

"चिटुकले", "पिटुकले", "ल्हानगे" यातला एकही शब्द ऐकला, वाचला की आठवण येते ती विठुआक्काची.

एकटी, देवीच्या व्रणानी भरून न पहाण्यासारखा झालेला चेहरा. नऊवारी साडीचा घोळ गुडघ्यावर गुंडाळून कमरेत खोचलेला, त्यामुळे साडी सावरत बसण्याचा प्रश्नच नव्हता. सर्वांकडे कायम कौतुकाने, मायेने, जिव्हाळयाने पहायच्या सवयीमुळे डोळयात हे भाव तुडुंब भरलेले. तिचा हात कुणा मुलाच्या पाठीवर फिरू लागला की तो शांत राहून त्याचा अनुभव साठवत असे. कुणाला खरं वाटणार नाही पण त्या हातातून पाझरणारी माया थेट आतपर्यंत पोचत असे.

विठुआक्काचं घर परसू एकदम सुंदर होतं. भलं मोठं अंगण. चौफेर बागडावं असं फुलझाडानी, आंब्या फणसाच्या, शेवग्याच्या झाडांनी भरलेलं ते परसू आम्हा लहानग्यांचं लपंडावाचं मैदान होतं.

विठुआक्का त्या घरात एकटीच रहायची. ती विधवा होती म्हणत. त्याचा लहानपणी अर्थ समजत नव्हता. आता आठवते तेव्हा आत जीव तुटतो. ती गरीब नव्हती. पाच सात एकर शेतजमीन होती. त्याचं पिकपाणी तिला पुरून उरेल एवढं होतं.

तरी देखील ती ठराविक लोकांच्या घरी काम करायला जात असे. आमचं घर त्यातलंच.

मराठ्यांची दोन मुले रघु आणि वसंत, फोंडक्यांची सुमी व बटु, मी अशी सात आठ मुले पकडा पकडीचा धिंगाणा घालू. आक्का त्यावेळी दाराच्या उंबऱ्यावर बसलेली असे. हातावर हनुवटी व हाताचे कोपर पायावर टेका लावल्यासारखे ठेवून ती आमचा दंगा पहात असे. चेहेऱ्यावर हसरा भाव असे. कौतुकाने भरलेले डोळे बारीक होत. कधी खेळताना भान हरपून जाई. अंधार पडे. फर्लांगभर असलेल्या घरी जायची भीती वाटे. मग आक्का सांगे. "थांबा रे सगळे. मी येते पोचवायला."

हातात भरीव बांबूचा सोटा घेऊन आक्का एक एकाला त्याच्या घरी सोडे. वर प्रत्येकाच्या घरी मधाळ भाषेत सांगे, "रागवू नको हा त्याला. माझ्यामुळे वेळ झाला."

आजीच्या गोष्टीत ऐकले होते. देव भक्तांच्या चुका आपल्या माथी घेतो. इथे आक्का आमच्या चुका आपल्या माथी घ्यायची, देवासारखी. पण लोक तिला पाहून घाबरत का? एवढ्या प्रेमळ, मायाळू बाईला कोणी कधी भितं का, रागावतं का?

मग समजलं गावचे सगळे लोक तिला मान देत, प्रेमाने वागवत. बाहेर गावचे व मुंबईचे चाकरमानी तिला नावे ठेवत, घाबरत असत.

पोहे करायला आक्का यायची. पडवीतल्या व्हायना (जमीनीत गाडलेले उखळ) जवळच्या चुलीवर उकडी साळ शेकायला बसे. दोन बाया व्हायना जवळ मुसळे घेऊन तयार असत. खास बनवलेल्या कापडी गोल मुटक्यानी आक्का साळ शेकताना मुंबईकरांना भयानक दिसे. संध्याकाळी उजेड कमी होई. चुलीतल्या लाल केशरी ज्वाळा आक्काचा चेहरा आणखी विद्रुप करीत. खालून येणारा ज्वालांचा प्रकाश गालाच्या उंचवट्यांची सावली डोळ्यांवर पसरत. नाकाची सावली नामासारखी थेट कपाळा वरून केसांपर्यंत पोचे. आणि आक्का एखाद्या भयानक भुताच्या चित्रा सारखी वाटे. मुंबईहून आलेली आमची काके, मामे, आते भावंडं घरात पळून जात. आक्काचे ते रुप पाहीले की रात्री दचकून उठत.

आमच्यावर अतूट माया करणारी ती, आम्हाला मात्र कायम मायाळू व गोडच वाटे. पोह्याची उकडी साळ शेकून पोहे झाले, की आक्का साधी साळ मडक्यात फिरवून लाह्या पाडणार. हासडून साफ करून पसा पसा आमच्या खोळीत घालणार. त्यासाठीच आम्ही डोम कावळ्या सारखे चुलीसमोर बसलेले असू.

आक्काकडे गोष्टींचे खूप भंडार होते. रामायणातल्या गोष्टी सांगताना ती तल्लीन होत असे. वाचलेली, कितीतरी वेळा ऐकलेली गोष्ट असली तरी आक्काकडून परत ऐकताना नवी

वाटे. कृष्णाच्या व पेंद्याच्या गोष्टी सांगताना ती हसवून सोडे. पण रामायणातल्या गोष्टीत ती स्वत:च हरवून जाई. राम वनवासाला निघायच्या वेळी किंवा भरत भेटीच्या वेळी ती रडे आणि ती रडते म्हणून आम्हालाही रडू येई. शाळेत शिकवलेल्या रामाच्या किंवा कृष्णाच्या गोष्टींपेक्षा आक्काच्या गोष्टी आमच्या लक्षात चांगल्या राहिल्या.

आक्काचं दिसणं आणि मायाळू असणं याचं प्रमाण व्यस्त का? आक्का खाऊन पिऊन सुखी असतानाही अशी आमच्या घरी कामाला का येते? काहीही नाते नसताना दिवाळीत चाव दिवसा दिवशी आर्जवाने आम्हा लहानग्यांना पोहे खायला का बोलावते? त्या वेळी याची उत्तरे शोधायचा प्रयत्नही केला नाही. आज जेव्हा ती आठवते, तेव्हा हे प्रश्न मनात डोकावतात. उत्तर मिळते. ती तिच्या एकटेपणावर मात करण्यासाठी स्वतःचं कुटुंब बनवत होती. आणि खरंच आम्ही तिची मुलं असल्या सारखेच वागू. तिच्या मांडीवर डोके ठेवून झोपण्यासाठी भांडू. तिचा हात डोक्यावरून फिरू लागला की मायेच्या त्या झऱ्यात डुंबत केव्हा पेंग येई समजत नसे.

आक्का सर्वात सुंदर, मायाळू, प्रेमळ बाई, नाही आईच, म्हणून अनुभवली.

*****



# ढाण्या वाघ

बरेच वर्षानी आज शित्या वाघ भेटला. माधवनगरात पावर लुम्सचे रिपेरींग करायचा धंदा घालून बसला होता. मी कॉलेजला असताना माधवनगरात रहात होतो, त्या वेळी शित्या माझा शेजारी होता.

संध्याकाळी रुमच्या पडवीत बसून शित्याच्या गोष्टी ऐकायला मजा यायची. त्याच्या खास गावच्या बोलीत आणि ढंगात त्याने सांगीतलेले एक एक किस्से ऐकताना जबरदस्त करमणूक होई. शित्या कारागीर होता. कसलेही मशीन उघडून दुरूस्त करण्यात पटाईत. मी इंजिनीयरींग करत होतो, त्यावेळी माझ्यापेक्षाही एक दोन वर्षानी लहान शित्या इंजिनीयर झाला देखील होता. कुठल्याही कॉलेजात न जाता झाला होता. "अरे तू किती शिकलास?" या प्रश्नांचं उत्तर फार मार्मिक असायचं.

"मी शित्या मन्या वाघ. मन्या वाघ म्हंजे माझा बाप. त्याच्यापेक्षा दोन बुकं जास्त शिकलो. दुसरी पास केली दोन वेळा बसून. मग काय आमच्या ढाण्यानं हाताखाली घेतला. कामाला लावलं. ढाण्या म्हंजी माझा बाप-मन्या वाघ. त्याला गाव ढाण्या म्हणायचं. आमचं नाव आगुदरच वाघ आणि बाप लय तडमड्या मग काय मन्या वाघाला गावानं केला ढाण्या वाघ."

हा किस्सा बरेच वेळ मी ऐकला होता. आता परत चाळीस वर्षांनी भेटत होतो. शित्या साठी ओलांडत होता. मी साठी ओलांडून एक दोन वर्षे होऊन गेली होती. आज भेटला तर ओळख दिल्यावर अदबीने म्हणाला, "या सायब आमच्या गरीबाच्या टपरीत बसायला ही लाकडी, लोखंडी स्टुलं हायत. बसायला जमंल न्हवं?"

"ए शित्या! सरळ बोल की पहिल्या सारखं हे काय अहो जाहो लावलंयस?"

"या भल्या थोरल्या गाडीतून आलायसा. सायब झालायत. आमी आपले त्या टपरीतले कारागीर तुमच्या सारकं बुकं नाय शिकलो."

"बाबा रे बुकं शिकूनच इंजिनीयर होतात असं नाही. मी कितीतरी कारागीर पाहिलेत. ते जन्मजात इंजिनीयर होते. तुझ्यासारखेच. तेव्हा तू मला आधी अहो जाहो म्हणणं सोड. मला सांग तू हे सगळं लहान वयातच कसं काय शिकला होतास? आता काय काय करतोस? नवीन काय काय बनवलंयस?"

"काय सांगू? मी कायच् न्हाई हो! माझा बाप मन्या उर्फ ढाण्या वाघाचं चरीत ऐकावं लागंल तुम्हास्नी. तवा समजंल मी कुठं, नी काय, काय नी कसं कसं शिकलो ते. आणि चरीत सांगायचं ढाण्याचं त दिवस पण न्हाई पुरायचा. हाय का येळ तेवढा तुमच्याकडं?"

मला मॅनेजमेंट केस स्टडीसाठी एखादी चांगली गोष्ट मिळेल का? हा विचार होता. मी पटकरून म्हणालो "वेळ काढून

आलोय. एक का दोन तीन दिवस लागले तरी थांबेन मी इथेच. पण मला ऐकायचीय तुझी गोष्ट.''

''आसं म्हणताय! मंग हितं काय निवांतपणा न्हाई मिळायचा. चला कृष्णेच्या काठावर झाडाखाली मुक्काम ठोकू. शेत आपलंच हाय. भाकरी तुकडा येईल घरनं चालंल का तुमास्नी?''

''अरे मी हॉटेलात उतरलोय तिथेच जाऊ की आरामात खोलीत बसून ऐकू तुझी गोष्ट.''

''नाय! नाय! ढाण्याची गोष्ट बंद खोलीत रंगणार न्हाई. त्याला मोकळा रानवारा, कृष्णेचं पाणी आणि जंगलातल्या एकाद्या झाडाची सावलीच पायजेल. नायतर ढाण्याचं चरीत खुलवून सांगता येणार न्हाई.''

या गोष्टीसाठी शित्याच्या सगळ्या अटी मान्य करून मी आणि शित्या दोन घोंगड्या गाडीत टाकून निघालो. शेतवडीतला रस्ता शित्या दाखवत होता, तसा मी गाडी चालवत होतो. कृष्णाकाठी एका डेरेदार आंब्याच्या झाडाखाली शित्याने दोन्ही घोंगड्या पसरल्या आणि आम्ही दगडाची उशी करून पहुडलो. शित्या आता आपल्या बापाची कुठली कथा सांगणार यासाठी मी अधीर झालो होतो.

''तर मिल्या तुला माझ्या बापाची ढाण्याची गोष्ट, नाय चरीत, ऐकायचंय न्हवं?'' त्याने पहिल्यांदाच मला कॉलेजच्या नावाने मिल्या म्हणून एकेरी संबोधलं तेव्हाच समजलो, आता शित्या खरा मूड मधे आलाय.

“बोल! सांग आता तुझ्या बाबाची कथा.” शित्याने कथा सुरू केली.

माझ्या बा च नाव मन्या. आजा म्हाईत न्हाई. बा भांडून ल्हानपणीच घरातून पळून गेलता. आज्याचं नाव टाकलं होतं त्यानं. का म्हाईत नाई. एकदा विचारलं मी तर भडकला. नाय नाय त्या शिव्या ऐकल्या. एवढ्या शिव्या त्याला येतात हे त्या दिवशी कळलं मला. परत विचारायचा नाद सोडला. गावानं त्याचं नाव ढाण्या केलतं. त्याच्या कर्मामुळे.

घरातून पळाला तो थेट कोलापूरात, उद्यमनगरात. त्या वेळला कोलापूर इंजिन बनवण्यात नाव काढून हुतं बघा. हा एका कारखान्यात घुसला. शेठच्या मागोमाग. त्याला म्हणला, “काम दे! काम कराया आन् शिकाया आलोय.”

“काय येतं तुला? अजून ल्हान हाइस की. वय काय?”

“वय माहीत नाय. बापान जनम नोंदला नाय की तारीक सांगीतली नाय. काम द्या! दोनदा जेवायला द्या. कारखान्यातच ऱ्हाईन. चौवीस तास. समदं शिकायची हौस हाय बघा. पोटा पाण्याला मिळालं तर एक नंबरी काम करून दावतो की नाय बगा.” बा बेरकी होता. त्याला वय बरोबर म्हाईत. कायदा पण माहीत. वय सोळा. कायदा म्हणतो अठरा नंतर नोकरी. बेणं हुशार; काय दडवायचं नी काय दाकवायचं पुरं म्हाईत. शेठने नोकरीत ठेवला. झाडू मारली. मशीनीना तेल पाणी केलं. नवीन नवीन मशीन बनत. शेतीत पाणी खेचायच्या पंपाला लावायला,

पिठाच्या गिरणीत बसवायला ल्हान मोठी खूप जातीची इंजिनं बनवायचे ते.

बा लय बेरकी. रात्री तयार इंजिन उघडायचा आणि परत लावायचा. गुपचुप शिकत गेला. वरीस झालं आसंल कारखान्यात. नवीन इंजिन बनलं. चालूच होईना, भुक भुक करायचं नी बंद पडायचं सगळे हैराण. चालू करायला हँडल मारून दोन गडी छाती दाबून बसले. शेठने इंजिनेर, फोरमन सगळ्यानला हाफिसात बोलावलं. बोंब मारून राडा सुरू.

सायब लोक शेठचा प्रसाद खात हुते. बा ला चानस मिळाला. बा फुडं झाला. तेलाचा पाईप टाकीच्या मुळातून उपटला. हातावर तेल घेऊन तपासणी केली. पंचा घेऊन टाकीतलं तेल खाली करताना गाळून घेतलं. मग सगळी पाईप लाईन काढली. वरचे सगळे सायब लोक अजून शेठच्या खोलीत त्याचा बोंब बराडा झेलत हुते. आन् भायेर बा दोघाना घेऊन इंजिनची पायपं आन् बाकीचे पार्ट साफ करून लावत हुता. तासा भरात त्याने सगळं बरोबर लावलं एका तगड्या गड्याला बोलावून हँडल मारायला लावलं. इंजिन फाक् फाक् करीत चालू झालं, पुरं तालात गरगरायला लागलं. आवाज शेठच्या कानात पडला तो धोतराचा सोगा पकडून धावत आला. बा ची करामत बघून थक्क झाला. बाला पयल्या झटक्यात फोरमान का काय केला. बाची ही गोष्ट मला रहिमकाकानी सांगीतली. वर म्हणाले “तुझा बा कारागीरांसाठी लय चांगला म्हणून काय बोललो नाय, पण इंजिनाच्या तेलात त्यानंच लाकडाचा भुसा रातच्याला

मिसळला होता. हे त्यांने दोन वर्सांनी नोकरी सोडताना सांगीतलं.”

लय आयडियाबाज बेणं. नोकरी सोडून बा अंगावर कामं घ्याया लागला.

आता बा चं नाव व्हायला लागलं. उद्यम नगरात इंजिन बनवणारं खूप जण. बा सगळ्यांना फिरून इंजिनची कामं शिकवू लागला. त्याचे पैशे त्याला मिळत. गब्रु झाला तेवा वय हुतं एकवीस वर्स. कारखान्यातल्या कामामुळे दंडाच्या बेडक्या पैलवानावाणी झाल्या हुत्या. एक पण चोपडी शिकला नव्हता. शिरीचीxxx पण फोडता येत नव्हती. पण रुपया आण्याचा हिशोब बरोबर करी. पैशावर कावळ्याचा डोळा ठेवून ऱ्हायचा हिशोब घेताना. पण पैशे खिशात आले की कामगारां बरोबर दिवाळी. सर्वांना चा पाणी पाजी. केवा केवा भजी पण खायला घाली. म्हणून दोस्ताना मोठा.

असाच एका दोस्ताच्या घरी गेला. त्याची दोन शेपट्या रिबीनीने बांधलेली अभ्यास करणारी भयण याला आवडली. मग काय डायरेक्ट दोस्ताला इचारलं. तुझ्या भयणीशी लगीन लावून देशील? दोस्त गडबडला, मग थारावला, जोरात ओरडला, “गंगे घरात जा! भायरच्या नजरा पडतात. बसलीय भायर बाजारबसवी सारखी.” तापला होता दोस्त. हा गडी म्हंजे माझा बा त्याला म्हंतो कसा. “अरे बोंब का पाडतो तिला. नाय म्हणून सांग. हा चाललो मी. पण एक लक्षात ठेव. लगीन हिच्याशीच होणार. ते पण पुढल्या महिन्याच्या आत. ही पण गोष्ट रहीम काकानी

सांगीतली. काय झालं माहीत नाही म्हणाले रहीम काका. पण चार दिवसात दोस्ताने त्याला घरी बोलावलं आन् सोयरीक पक्की झाली. आठ दिवसात लग्नाचा बार उडाला. रहिमकाकाला बा च्या लग्नातली खीर खूप आवडली. अजून याद येते सांगायचा.''

रहिमकाका नेहमी घरी यायचा म्हणून त्याला बा चे सगळे धंदे म्हाईत. दोघेही आता एकत्रच काम करीत. बाने लगीन केलं खरं, पण माझ्या मायला फार घाबरायचा. कारण ती चार बुकं पास होती. आणि बा एकपण न्हाई. तिचा शब्द तो कधीच पडू द्यायचा नाय.

आता तो आणि रहिमकाका गावागावात जाऊ लागले होते. शेतातली, गिरणीतली इंजिनं दुरूस्त करण्यातून उसंत मिळत नव्हती. बा दोन दोन दिवस गायब राहायचा. मग माझी माय भांड भांड भांडायची. मग बा गपगुमान एका कोपऱ्यात बसून ऱ्हाई. हे सगळं माझ्या जन्माच्या अगुदरचं राव. रहिमकाकानी सांगीतल्यालं. ते सांगत, ''तुझ्या बा ला सगळ्या गावातून मन्या ऐवजी ढाण्या म्हणत. ढाण्या वाघासारखा हुता बग तो. पण बायकोसमोर एकदम् ढिल्ला. काय होतं म्हाईत नाई.

एक वर्षी पाऊस लई ओतू लागला. पूर आला. नदी काठ सोडून गावात घुसली सगळे घरात अडकले. तुझा बा पण घरात अडकला. चार पाच दिवस घरातच. भायेर पाणीच पाणी. पाणी उतरलं आणि मी गेलो तुझ्या बाला भेटायला. चार पाच दिवस बायकोच्या तावडीत सापडून पार चेंदामेंदा झाला असावा असा

अंदाज बांदला मी. पण घरी गेलो तर सगळी खुषी दिसली. कधी नाय ते तुज्या मायने रहिमभाई चा पिणार का म्हणून ईचारलं? लगीन होऊन चार पाच म्हयने झालते. पण एक शब्द कदीपण न बोलणारी चा विचारते पायल्यावर मी हबकलोच. होय म्हटलं पण लक्ष ढाण्यावर गेलं. तो ही खुष दिसला. काय तरी भानगड झाली होती खरी. पण समजत नव्हतं नक्की काय झालं ते." रहिमकाका मग एकदम शांत झाले. थोड्या वेळानं मग एकदम म्हणाले, "धा म्हयन्यानी फोड झाली बग सगळ्याची."

मी ती कशी? म्हणून विचारताच म्हणाले, "तुजा जनम झाला." त्यावेळी मला कायच ध्यानात नाय आले. आता समजतो त्याचा अर्त.

मायच्या समोर गरीब असलेला माझा बा, भायेर एकदम् वाघ. समदं काम ताड की फाड. पण घरात माय फुडे म्यांव. पण माय कधी काय बोलताना दिसली नाय. पैशे आले की बा मायलाच द्यायचा. थोडे फार खर्चाचे तेवढे खिशात ठेवायचा. कृष्णेच्या डोहात सूर मारायचा. सापाला शेपूट पकडून गरा गरा फिरवायचा आणि लांब फेकून द्यायचा. मर्द गडी हुता.

मग मग बा भायेरची कामं हायत सांगून भायरच असायचा. घरात पैसा पण कमी द्यायचा. माय हुषार. तिनं माग काढला. बा नं शेत घेतलं हुतं. शेतात झोपडं बांधल्यालं. आन्...आन्.....बा नं दुसरा घरोबा केलता. शेतातल्या झोपडीत. झोपडीच्या मागं मोटेची मोठी इहिर होती. माय तिथं पोचली. तिला बघून त्यानं इहिरीत मुटका मारला. अबब!! काय मुटका

हुता. पाणी चारी बाजुनी उडालं आणि इहिरी भायेर आमाला भिजवून टाकलं. झोपडीतून ती बाय, आवाज काय झाला बगाया भायेर आली. मायने तिच्या झिंज्या पकडून माराया घेतलं. ही झोंबा झोंबी. पण ती बाय मायपेक्षा पैलवान निघाली. मायला लोळवलं. मी धा वर्साचा हुतो तेवा. मग मायच्या छाताडावरून उठत बोलली. "धन्याचा लय जीव हाय तुज्यावर म्हणून सोडलंय. गप सुकानं खा आपल्या घरी. हितं येवून तमाशा नाय करायचा परत."

माय माझा हात पकडून ओढत होती. मी इहिरीत बा ला शोधत होतो. मेला की काय? मग अंधारल्या इहिरीत दिसलं. बा एका दगडाला पकडून गप उबा हुता. जीता हाय. माझा जीव शांतला. माय बरोबर घरी आलो. माय दोन दिवस रडत होती. बा मातर दररोज सांजला येई. माय तोंडाने शिव्या घाली. पण जेवायला चांगलं रांधून त्याला घाली. आता चांगलं खायला घालून बा ला ती परत आपल्या घरात आणायचा प्रयत्न करीत होती. पण तो काय रात्री उठून निघायचा आणि शेतात जायचा.

पाटलाचं शेत खेडायला ठेवलं होत, त्या पाटलाकडे माय गेली. पाटलाला शेत काडून घ्या बोलली. पाटील म्हणाला, "का कावा करतेस बाई? मर्द हाय ढाण्या. काय शाळू पिकवलाय, काय घहू पिकवलाय. मेहेनत भारी करतो. आणि तुझी सवत ती माझी भाची हाय. मी काय जमीन नाय घेणार परत. पण ढाण्या तयार असला तर आणखी पाच सात बिघा देणार त्याला. म्हेनती हाय त्यो."

झालं माय नी मी घरी परतलो. माय आता पाटलाला पण शिव्या देऊ लागली. पण खरं सांगू, बा फार हिकमती. दोन वर्सात पाचपट जमीन पाटलाकडून मिळवली ट्रॅक्टर आनला. तीन तीन पिकं काडायला लागला. घरं बांदली. शेतातच. ती बगा.

शित्याने ज्या दिशेने बोट दाखवलं तिकडे मी बघू लागलो.

ते पिवळं दिसतं ते मायचं आणि ती आमराई हाय ना त्या पलिकडे दिसतं निळं निळं ते बाय चं. मायला बा पण हुशियार निघाला. दोगीनाय घरं बांदली पण मदे आमराई ठेवली. अर्दी मायची, अर्दी बायची. हळू हळू सगळं निवळलं नी मायनी बाय दोगीत मैतर झालं. शिजलेलं एकमेकाकडं जाऊ लागलं आणि दोनी बायानी बा ला वाटून घेतला. बा आठवडा हितं तर आठवडा तितं.

आता बा नं मला ट्रॅक्टर, विलेक्ट्रीक पंप सगळं दुरूस्त करायला शिकवलं. मला तोड, फोड, जोडीची लय आवड. सगळं फटाफट जमाया लागलं. आवडत नव्हतं ते शेतीतलं काम. काम करत न्हाई म्हणून बा नं ठोकला एक दिशी. तवा मला एक भयण झाली हुती. आणि बायला पण दोन पोरगे. माजे सोतेले भाऊ झाले होते. पण घरात सुकाळ होता. माझा बा ढाण्या वाघ, नी बाय शेतीत कायम राबत. तीन तीन पिकानी घर भरून जाई. पाटील येवून बाजारला सगळं इकून येई. बाला नगद रुपये देई. हिशोब सरळ. एक भाग पाटलाचा. दोन भाग बा चे. बाय हिशोबात तरबेज हुती. मामाला म्हंजे पाटलाला दर इचारून बरोबर हिशोब लावी. मग समजलं. बाय धा बुकं शिकलेली हुती.

आता सगळं चांगलं चागलं हुतं. पण ढाण्याच कसं, तो एका गोष्टीत कायम रस न्हाई.

मी आता बा सारकाच आजूबाजूच्या धा गावात रिपेर करायला फिरू लागलो. पैशे कमवू लागलो. माधव नगरात पावरलूम बसली. एकदोन उघडून जोडली. आणि त्याची सगळी कला डोक्यात फिट बसली. आवाजा वरून सांगू लागलो. हितं मिस्टीक दिसते. ते केलं की पावरलूम परत धावायला लागे. माधवबागेत शंभरावर पावरलूम. हजारो वारानी कापड तयार करायचे. माझं रिपेर काम रात्री दिवसा केवाई यायचं. म्हणून माधवबागेत खोली घेऊन ऱ्हायलो. मायचं घर हे दोन मैलावर शेतात. केवातरी जात होतो. एक दिवशी समजलं बा घरातून गायब. माय नी बाय गळे लागून एकत्रच रडल्या नी कामाला लागल्या. धा दिवसानी ढाण्या आला. दोघी वाघीणी वाणी तुटून पडल्या. सगळ्याना गप करून कामाला लागला. आठ धा दिसांच्या खटपटी नंतर एक भलं मोठं मशीन तयार झालं. गाव लोटलं बगाया. गव्हाच्या शेतात फिरवून घहु कापून दाखवला. काय मशीन हुतं सांगू गहू कापायचं, गवत फेकायचं आणि दाणं तेवढ मागच्या टबात टाकायचं. ढाण्या बेरकी. मशीन भाडयाने लावून लोकांचा घहु कापून देऊ लागला. रोकड मिळायला लागली. पाटलाला भाग कसला? पाटील समजून गेला ढाण्या हाय तो. पंगा नाय घ्यायचा. हळू हळू दिवस सरत हुते. मी माधवनगरात ऱ्हायचं ठरवलं. मायनं भयणींची लगीनं करून दिली. बायचे पोरगे माझे भाऊ ढाण्यानं शेतीत तयार केले. चार

वर्स झाली ढाण्या जख्ख म्हातारा होऊन गेला. पाठून माय गेली. दोनी येळेला बाय धाय धाय रडली. आता सगळी शेती बाय आणि तिची पोरं करतात. मायचं घर बंद असतं. मी केवातरी येतो पण मायच्या घरात नाही जात. बायच्या घरात जातो. कारण तिनं ढाण्याचा मिशीवाला पैलवानी फोटू तिच्या घरात मोठया भिताडावर लावलाय. ढाण्या जीता वाटतो त्यात. मायनं आसलं काय केलं नाय.

मला आजय वाटतं ढाण्या मायच्या नाय पण बायच्या उरात जास्त हुता. तिनं फोटू म्हणूनच लावला. पण मग वाटतं न्हाई मायच्या उरात जास्त होता. म्हणूनच त्याच्या पाठोपाठ ती गेली. मागं न्हाय ऱ्हायली.

मायला ढाण्या बेणं गेलं खरं पण माझ्या टकुऱ्याला मुंग्या चढवून गेलं हे आसं.

मिल्या! तूच सांग ढाण्या कुणाच्या उरात हुता ते?

मी गप्प गाडीची चावी उचलली आणि म्हणालो “चल” त्याच्या प्रश्नाचं उत्तर माझ्याकडेही नव्हतं.

*****



# डॉक्टर

खाकी हाफ पँट. अर्ध्या बाह्यांचा खूप खिसे असलेला व मिलिटरी सारखे बाह्यांच्या वर दोन पट्टे लावलेला खाकी शर्ट. डोक्यावर खाकीच गोल रीम असलेली अंग्रेज हॅट. हा अवतार लांबून दिसला की ताबडतोप ओळखू यायचे, डॉक्टर चाललेत. एका हातात चामड्याची बॅग तर दुसऱ्या हातात एक छत्री. बॅगेत डॉक्टरी मसाला म्हणजे औषधे, सिरींजा, सुया, गोळ्या असले सगळे भरलेले असायचे. डोक्यावर साहेबी हॅट असूनही ते छत्री बाराही महिने वापरीत.

कोकणी लोक बेरके. असले काही नजरेत आले की त्याची खिल्ली उडवण्यात पटाईत. बाजारपेठेतच डॉक्टरांचा दवाखाना होता. तिथे जाईपर्यंत कमीत कमी पन्नास दुकाने पार करावी लागत. पन्नास टक्के दुकानदार त्यांच्यावर एखादा तरी ताशेरा मारत.

“डॉक्टर! डोस्क्यावर हॅट असताना छत्री कशाला हो?” म्हापसेकर

“अरे, हॅट टक्कल दडवायला. आणि छत्री उनाचा त्रास वाचवायला.” सापळे

“ओ! सापळे, हॅट नाय उनापासून वाचवीत?” नरडवेकर

“नरडवेकर! खूप समजते हो तुम्हाला. एवढीशी हॅट काय एवढ्या मोठ्या देहावर सावली पाडणार? काय वो डॉक्टर, खरे की नाय?” म्हापसेकर

आता डॉक्टर समाधीतून बाहेर यायचे. आपल्याला कोणीतरी काहीतरी सांगतेय असे वाटून विचारायचे, “काय हो म्हापसेकर मला काही बोललात?”

आतापर्यंत बोललेले सगळे फुकट गेल्याचे त्या रिकामटेकड्या दुकानदारांच्या लक्षात यायचे व ते गप्प व्हायचे. म्हापसेकर मग उगीचच विचारायचा “काय दवाखाना उघडायला चाललात?”

“होय! आज जरा उशीरच झाला.” एवढे बोलून डॉक्टर पुढे निघत.

डॉक्टर अतिशय सरळ माणूस, हे माझं मत. या बाजारपेठेतल्या रिकामटेकड्या व्यापाऱ्यांचे तिरकस शेरे त्यांना समजतही नसत, की दुखवतही नसत असं वाटे. तरी देखील

कोणाची तरी तोंडभर टवाळी करायला मिळाल्याचे समाधान त्या बाजार बुणग्यांना मिळायचे.

गावात डॉक्टर एकच. त्यामुळे घरी कोणी आजारी झाले की निर्लज्जपणे हेच बाजारबुणगे डॉक्टरकडे धावत. मग डॉक्टर पेशंट बघायला धावत. त्यांनी उडवलेली खिल्ली डॉक्टरना समजली असती तर ते असे यांच्यासाठी धावले असते का? असा विचार मला चाटून जाई.

डॉक्टर खरच स्थितप्रज्ञ होते. त्यांना पेशंटच्या तक्रारी, भजी खाण्याचे कोणीही दिलेले आमंत्रण व गणितातले प्रॉब्लेम एवढेच ऐकू येई. बाकी सर्व निरर्थक असल्यामुळे ते बहुतेक ऐकतच नसत. इतका साधा, सरळ पण सर्वच बाबतीत उदासीन माणूस मी तरी पाहिला नव्हता. मला त्यांच्याबद्दल नक्की काय वाटे हे सांगणे कठीण होते.

गावी हजार जातीचे आजार, साथी चालायच्या. हे एकुलते एक डॉक्टर, अभिमन्युच्या आवेशाने प्रत्येकाला औषध देत सुटायचे. घरी जाऊन इंजेक्शने द्यायचे. तिथेच पोटभर भजी व दोन कप चहा मागून प्यायचे. पण त्या मागण्यात त्यांना जराही कमीपणा वाटत नसे.

डॉक्टर येणार समजले की घरातील बायका भज्यांची तयारी करायला लागत. त्यांना भजी खाताना दोन कप चहा

लागतो हेही सर्व गावाला पाठ होते. एक कप चहा ते भज्यांबरोबर पीत व दुसरा कप भजी खाऊन झाली की रिचवीत. इंजेक्शनच्या सुया, सिरींज, चिमटा उकळायला ठेवत व भज्यांचा फडशा पाडत. दुसरा चहा झाला की मग चिमटा उकळत्या पाण्यातून बाहेर काढीत. चिमट्यात मग सिरींज पकडून घेत व त्याची आत घुसवायची दांडी काढून बसवीत. एक दोन वेळ दांडी पुढे मागे करून पाणी उडवून लावीत. मग सुई काढून सिरींजच्या पुढे अलगद बसवीत. तोपर्यंत पेशंटच्या दंडाला तीन चार वेळ तरी स्पिरीट लावून झालेले असे. आता एका छोट्याश्या बाटलीतील औषध सिरींज मधे भरीत व पेशंटला सुई टोचायला पुढे सरसावत.

आता निरनिराळी नाटके बघायला मिळत. मनाने अगदीच हळवे, भित्रे असलेले लोक डॉक्टरनी सिरींज उकळत्या पाण्यातून बाहेर काढता क्षणीच “आयाSSईSS” करायला सुरवात करीत. डॉक्टरांच्या तोंडून निघे “गप ऱ्हा! अजून सुई लावायची आहे, औषध भरायचे आहे. वेळ आहे अजून टोचायला.”

दोन मिनिटेच शांतता राही. आता डॉक्टर सुई सिरींजला लावायला घेत व परत पेशंट विव्हळू लागे. सगळ्यात मजेची गोष्ट म्हणजे डॉक्टर सुई टोचत तेव्हा पेशंट गप्प होऊन पांढऱ्या फटक चेहेऱ्याने दंडात घुसणारी सुई अगदी न हलता पहात असे. डॉक्टरनी सुई बाहेर काढली की विचारीत. कुठे दुखले? शांत तर

होतात टोचताना. तेवढ्यात पेशंट परत एकदा आयाSSईSS आळवून घेई. डॉक्टर हसून सगळे आवरीत. बॅगेतून एकदोन पुडकी काढीत. औषधासाठी बाटली आणायला सांगीत व पाव बाटली पाणी भरून त्यांत कसल्या कसल्या दोन तीन पावडरी त्या पुडक्यातून घालीत. परत पाणी घालून बाटली अर्धी भरत. कागदाची पट्टी कापून बाटलीच्या बाहेर चिकटवीत. ती पट्टी अशी काही कापलेली असे की बरोबर आठ भाग दिसावेत. एक भाग म्हणजे एक डोस. औषध चार भागच असे. मग सांगत “चार चमचे साखर अर्धा कप पाण्यात घालून उकळवा व ह्या बाटलीत ओता. आठ भागपर्यंतच भरा. सकाळी, दुपारी व रात्री एक एक डोस द्या. परवा परत दवाखान्यातून औषध घेवून जा. होईल बरे एक दोन दिवसात.”

बॅग घेऊन डॉक्टर निघत आणि भजी करणारी बाई पटकन म्हणे “डॉक्टर भजी आहेत. बांधून देऊ? मुलांना होतील.”

डॉक्टर खूष होऊन म्हणत “हो हो चालेल, रात्री तोंडी लावायचे करायला नको मला.” बाई एक वर्तमानपत्रात गुंडाळलेली मोठी पुडी आणून देत व डॉक्टर ती शर्टाच्या खालच्या खिशात कशी तरी कोंबत. मला तेव्हा समजले, डॉक्टर चार खिशेवाला खाकी बुशशर्ट का वापरतात.

गावच्या लोकांकडून डॉक्टरना असे काही ना काही प्रेमाने मिळतच असे. मिळत नसत ते पैसे.

मी ही असाच एकदोनदा आजारी झालो. एकदा सर्दी खोकला ताप होता, एकदा नुसताच ताप होता. दोन्ही वेळी डॉक्टरनी बाटलीत औषध बनवून दिले. मला नक्की वाटले, दोन्ही वेळचे औषध एकच आहे. चव तशीच आहे. तसेच नाकातून वाफ काढते. घसा चुरचरवते. आजार वेगळा पण औषध एकच. पण एक खरे, दोन दिवस औषध घेतल्यावर सगळे खडखडीत बरे व्हायचे.

डॉक्टर आमचे जातवाले, त्यातून वडीलांचे अगदी मित्र. मुलगा माझ्या शाळेत. म्हणून त्यांच्या घरी मी जायचो. कधी मुलाला खेळायला बोलवायला, कधी वडलांचा निरोप द्यायला. असे कधी गेलो व डॉक्टर घरी असले की नेहमी अभ्यासाबद्दल प्रश्न विचारीत. अभ्यास करतोस ना रे? कितवा नंबर येतो वर्गात? गणितात किती मार्क पडले?

गणितावर विशेष प्रेम. कितवीत आहेस विचारून झाले, की त्या वर्गातली गणिते विचारायला सुरवात व्हायची. त्या काळी पाटी पेन्सील व तोंडी हिशोब करणे हाच मार्ग होता. त्यांनी सांगितलेली उदाहरणे तोंडीच सोडवून उत्तर द्यावे लागे. बरोबर आले तर वाहवा मिळे. चुकले तर समोर बसवून समजावीत. ते

समजावीत ते मात्र फार सुंदर असे. पण लक्ष खेळायला पळण्याकडे असे. केव्हा यांच्या तावडीतून सुटका होईल असे होई. ते मात्र चिकाटीने पिच्छा पुरवीत. मग काहीतरी कारण सांगून मी पळ काढी.

थोडा मोठा झाल्यावर मोठ्यांच्या बोलण्यातून डॉक्टर आणखी स्पष्ट होऊ लागले. डॉक्टर औषध देत पण कधीच कुणाकडे पैसे मागत नसत. काही निर्लज्ज तर म्हणत "कसले पैसे डॉक्टरला द्यायचे! स्टोव्ह आमचा, रॉकेल आमचे, अर्ध्या औषधात साखरपाणी आम्ही घालायचे मग काय वर पैसे द्यायचे?"

डॉक्टर अतिशय शांत असत. पैसे नाही मिळाले तरी औषधपाणी करीत रहात. मला आश्चर्य वाटे. डॉक्टरना खर्च असणार. दोन मुलगे शिकत होते. हुषार होते. डॉक्टर होणार म्हणायचे. म्हणजे डॉक्टरना भरपूर पैसे गोळा करायला हवेत. कसे करणार? कोकण म्हणजे गरिबीचे माहेर. प्रत्येक जण पैशांच्या कायम विवंचनेत. पैसे वाचवले, म्हणजेच कमवले असे तत्त्वज्ञान. मग डोक्यावर बसल्याशिवाय कोणाकडून पैसे काढणं मुष्कील.

डॉक्टरांची बायको लवकर वारली होती. दोन्ही मुलांना ते फार चांगले सांभाळत. सकाळी उठून भात, भाजी, आमटी केली

की दोन्ही वेळ चालत. आम्ही, शिरवडेकर, सावंत सगळे शेजारी, काही चांगले बनवले की शेजारधर्म पाळत असू. डॉक्टरांच्या घरी तीन तुकडे घालून माशांची आमटी, नाही तर तळलेले मासे हमखास जात. गणपतीत तर डॉक्टर घरी काही बनवत नसावेत. भरलेल्या ताटांतून मोदकांचा प्रसाद पांच सहा घरून यायचा. दिवाळीत फराळाची ताटे पण अशीच भरून यायची. मग डॉक्टर व्यवस्थित डबे भरून ठेवायचे आणि तिघेही दहा पंधरा दिवस पुरवून पुरवून खायचे.

लोकांकडे पैसे नव्हते पण शेजार धर्माची जाण होती. डॉक्टरांची दिवाळी इतरांसारखीच खाऊन पिऊन सुखात जायची. डॉक्टर स्वतः रव्याचे लाडू बनवायचे. बहुदा रव्याचे लाडू व मुग-गुळाचे लाडू ह्या दोन वानग्या त्यांना चांगल्या जमत. व त्या बाराही महिने त्यांच्याकडे खाऊ म्हणून पाहुण्यांसमोर येत. लोक हा पण चेष्टेचा विषय करीत. माझ्यासारखा कोणी त्यांच्याकडे जाऊन आला की त्याला खास मालवणी खोचीत विचारीत “काय डॉक्टरचा पाहुणचार घेऊन आलात? काय मुगाचा की रव्याचा पाहुणचार? नशीबवान रे तुम्ही.” डॉक्टर कंजूस म्हणून प्रसिद्ध. मग लाडू मिळवणारा लोकांच्या मते नशीबवान ठरे.

एकतर लोक पैसे देताना मागेपुढे होत. मग डॉक्टर घर कसे चालवणार? ते हात आखडताच घेणार. पण लोक कंजूसपणाचा

शिक्का मारायला मात्र एकदम तयार. पण असल्या शेऱ्यानी डॉक्टर कधी दुखावल्याचे दिसले नाही. कोणी समोर बोललेच तर सांगत “बाबा रे! अंथरूण बघून पाय पसरावेत. मी औषधे देतो ना? मग वर फराळ कुठून देणार? माझ्या औषधांचे पैसेही खिशातून जातात. देता काय रे तुम्ही?” मग मात्र समोरचा गप्प निघून जाई.

गावात एकही माणूस असा नव्हता की ज्याने डॉक्टरांचे पुरे पैसे कधी दिले होते. त्यात मोठे व्यापारी, वकील, खोत, इनामदार सगळेच होते. मला मात्र आता डॉक्टर खूप मोठा माणूस वाटत होता. निःस्वार्थ सेवा करणारा, साधा राहाणारा, आजाऱ्याला रात्री अपरात्री पण धावत जाऊन बघणारा व सरळ सल्ला देणारा डॉक्टर, म्हणजे गावाला मिळालेलं वरदान होतं. पण लोक मात्र त्यांना कृतघ्नपणा दाखवीत.

काही ठिसूळ बुद्धीचे लोक त्यांना हावरट म्हणत. एवढा मोठा डॉक्टर पण सगळ्यांकडून भजी गोळा करत असतो. हावरट नायतर काय? हे ऐकले की मला लोकांचा राग येई. फक्त सेवेने काय डॉक्टर मोठे होणार? त्यांना घर चालवायला, औषधे आणायला पैसे नकोत? पण लोकही कसे, उचलली जीभ लावली टाळ्याला. मी डॉक्टरांना फार मानू लागलो. त्यांच्या घरी जाऊ लागलो.

आता घरचे डॉक्टर मला दिसू लागले. खाकी पँट शर्ट उतरवून ते पट्ट्याच्या नाडीवाल्या चड्डीत शिरत. वर एकाद दुसरे भोक पडलेले गंजीफ्रॉक घालीत व घरचे काम नसले तर निवांतपणे पुस्तक वाचत पडत. त्यांची पुस्तके अगम्य असत. शास्त्राच्या पुस्तकात असायच्या तशा आकृत्या असत. भाषा इंग्रजी. मी मग विचारी “डॉक्टर यात कसल्या गोष्टी येतात हो?”

डॉक्टर सांगत “अरे हे मासिक आहे. याला मेडिकल जर्नल म्हणतात. नवीन नवीन रोग व त्यांच्यावरच्या औषधांची माहिती येते त्यात. ती समजून घ्यावी लागते. तरच लोकांना बरे करता येईल ना.”

मला नवल वाटले “म्हणजे तुम्ही अजून अभ्यास करता? आणि ही नवीन औषधे तुम्ही कुठून आणता? मिळतात तुम्हाला?”

मग जे त्यानी सांगीतले ते जबरदस्त धक्कादायक होते. त्यानी त्यांच्या कॉटखाली एकावर एक रचून ठेवलेली खूप पुडकी मला दाखवली. त्या पुडक्यांचे तीन ढीग होते. म्हणाले “ही तीनच माझी औषधे. एक एक चमचा पाण्यात टाकायचा व वर साखर पाणी मिसळले की औषध तयार. लोक खरं तर तीन दिवसांत बरे होणारच असतात. निसर्गच करतो काम. मी फक्त मन सांभाळतो. आजाऱ्याला औषध घेतल्याचे समाधान. पण

एक खरं, इतके आजार व रोग बघितलेत की साधा कुठला व अवघड कुठला हे चटकन लक्षात येते. मग ही औषधं देतो आणि वर सांगतो. वेंगुर्ल्याला नाहीतर कोल्हापूरला न्या म्हणून. या गावढ्यात औषधे कुठून आणणार मी? आणि आणली तरी परवडणार काय रे मला? पैसे कोण देणार त्या औषधांचे? चिंता तात्पुरती दूर करायची एवढेच माझ्या हाती.

या तीन पुडक्यातली औषधं ताप, सर्दी, डोके दुखीवर उपयोगी. दुसरी ही दोन पुडकी आहेत ती हगवणीवर उपायकारक. माझी डॉक्टरी इथेच पूर्ण होते. माहीत असले तरी गावच्या परिस्थितीमुळे मी फार सगळी औषधं नाही देऊ शकत. ही औषधं आता मिळणं कठीण होत चाललंय. इंग्लीश आहेत ती. आता मुंबईला सुद्धा मिळत नाहीत. कधी गेलो तर शोधून शोधून आणावी लागतात. आपल्या देशातही बनतात पण तितकी चांगली नाहीत रे.”

मी आ वासून सगळे ऐकत होतो. अनुभव असूनही डॉक्टरांची कसरत दिसत होती.

एक दिवशी डॉक्टरनी मला त्यांच्या घरी जेवायला बोलावले. मला वाटते मी पहिलाच भाग्यवान माणूस होतो ज्याला डॉक्टरांच्या घरी जेवायचे आमंत्रण मिळाले. तिथे गेलो तेव्हा समजले की मोठा मुलगा चांगल्या मार्कांनी पास झाला व

कॉलेजला जाणार म्हणून डॉक्टरनी कधी नाही ती सत्यनारायणाची पूजा करायची ठरवली होती. मला ब्राह्मण म्हणून बोलावले होते. पुजा झाली. प्रसाद फक्त सव्वा वाटीच्या प्रमाणानेच केला होता. वरण, भात बटाट्याची भाजी व चटणी हा बेत केला होता. पहिल्यांदाच मला कळले की डॉक्टरांच्या हातालाही सुंदर चव आहे. वरण, भातावर मी चांगला ताव मारला. डॉक्टरही प्रेमाने वाढत होते. जेवणा अगोदर मला पानाच्या विड्यावर एक आणा ठेवून दक्षिणाही दिली.

त्यानंतर चार दिवस मला सगळे नवलाने विचारत. एक आणा दक्षिणा ती ही डॉक्टरकडून मिळाली? सगळ्यांना एवढे काय आश्चर्य वाटत होते देव जाणे. कित्येकानी मला अनाहूत सल्ला पण दिला “अरे तो एक आणा खर्चू नको. जपून ठेव कायम. भरभराट होईल तुझी.” मला या बोलण्यात डॉक्टरांची टवाळी केल्याचा वास यायचा. पण एक नक्की समज झाला. डॉक्टर गावातील इतर कोणापेक्षाही माझ्यावर माया दाखवतात. माणसाला जरा जिव्हाळा मिळाला की तो त्या माणसाकडे जास्त ओढला जातो. माझेही तेच झाले. काही ना काही कारण काढून मी सारखा सारखा डॉक्टरांकडे जाऊ लागलो.

गावात एक औषधांचे दुकान झाले. मग डॉक्टर औषधे लिहून देऊ लागले. मोजक्या लोकाना त्यांच्याकडचे औषध देत.

आता औषधासाठी लोकाना पैसे खर्चावे लागू लागले. मग डॉक्टरांशी संवाद सुरू झाले.

"डॉक्टर तुमचं औषध नाय? बाटली विकत घ्यायची?" पेशंट विचारी

"अहो माझ्या औषधापेक्षा नवीन छान औषधे मिळायला लागलीत. लवकर बरे वाटेल." डॉक्टर

"काय एक दोन दिवसानी फरक पडणार? तुमचेच औषध द्या. पैशे नाहीत हो एवढे." पेशंट

"आता पैशाकडे बघाल की प्रकृतीकडे? जा हे औषध आहे दुकानात. स्वस्त आहे. जास्त पैशे नाय पडणार. आणि माझे तपासायचे दोन रुपये झाले." डॉक्टर

"डॉक्टर पयल्यांदा औषध तरी देत होता. आता काय न देता दोन रुपये? तुमी आणि दुकानदार मिळून गावाला भिकारी बनवाल लवकरच." पेशंट

"काय हो वेंगुर्ल्याला पाठवलं तर बसचं तिकीट आणि हॉस्पिटलचे पैशे किती होतील बघा. पंधरा वीस रुपये तरी लागतील. इथे माझे दोन रुपये आणि औषधाचे तीन रुपये पांच रुपयात भागणार हो. ठरवा तुम्ही काय ते." डॉक्टर

तो पेशंट गपचुप निघायचा व दुकानदाराकडून औषध घ्यायचा. डॉक्टरांचे पैसे बाकीच रहायचे. मला वाटू लागले, डॉक्टर आता व्यवहारी होत चालले. पैसे कमावायचा चंगच

बांधला वाटते. बरोबर होते. मोठा मुलगा नववीत आला होता. तीन वर्षांनी कॉलेज, बाहेर गावी राहाणे असल्या खर्चांना डॉक्टरना तोंड द्यावे लागणार होते. पैसे कमवायलाच पाहिजे होते.

थोड्याच दिवसांत गावात एकच चर्चा सुरू झाली. डॉक्टर औषध न देताच फी घेतात. काही लोक सरळ सरळ डॉक्टरनाच विचारू लागले. मग डॉक्टरनी सगळ्याना गप्प केले. त्यांचे म्हणणे सगळ्याना पटवू लागले. त्यांचे खर्च त्यांनी दाखवले. ते व्यापारी नव्हते की त्यांची शेतीही नव्हती. मग त्यानी जगायचे कसे? पूर्वी मोठे व्यापारी, वकील, इनामदार थोडेफार पैसे देत. शेतीवाले भाज्या, तांदूळ देत. चालून गेले. आता महागाई वाढत चालली. मुलांची शिक्षणं आली. पैसे कुठून आणणार? एवढी वर्षे होईल तशी गावाची सेवा केली. मुलगा डॉक्टर झाला तर माझ्यामागे गावाला डॉक्टर मिळेल पण त्याला पहिले खूप खर्च आहे. कोण देईल?

डॉक्टर जिंकले. गावाला मान्य झाले की डॉक्टरनी एवढी वर्षे लोकांची सेवा केली. आता गावाने त्यांच्या अडचणी समजून त्यांची फी द्यायची. मी हे अप्रूप बघून आनंदलो. डॉक्टर पैसेवाले होऊ लागले. पण त्यांच्या राहाणीत जरा देखील फरक झाला नाही. मुलगा छान मार्कांनी अकरावी पास झाला.

कॉलेजला निघाला. व गावच्या ऐपतदार माणसानी त्याला रकमा बक्षीस दिल्या.

आता डॉक्टर खूष दिसायचे. घरी डॉक्टर व छोटा मुलगा एवढेच. तोही दोन वर्षांत शिकायला बाहेर गेला आणि डॉक्टर एकटे झाले.

एक दिवशी डॉक्टरनी लग्न केल्याची बातमी वणव्यासारखी गावात पसरली. असल्या बातम्या गावात जिभाना मेजवानीच द्यायच्या.

“अरे! डॉक्टरनी लग्न केले. गावातून कोणालाच बोलवले नाही.”

“काय रे बाबा माणूस. पोरं येतील शिकून आता. त्यांचं लग्न करायचं की स्वतःचं?”

काहीनी डॉक्टरचीच बाजू घेतली. “अरे एकटेच ऱ्हातात. शीक पडले तर नको कोणी पाणी द्यायला. लागतो आधार सगळ्यानाच.”

मग हे वादळही काही दिवसात विरलं. मी देखील शिक्षणासाठी बाहेर गेलो. गावाचा व डॉक्टरांचा संपर्क सुटला. रजेत घरी आलो की आमच्या गावी जायचो. अशी काही वर्षे गेली असतील. मग एक दिवशी कोणाच्या तरी बोलण्यात डॉक्टर आले. समजले डॉक्टरना एक कन्या रत्न झाले आहे व दुसऱ्या बाळंतपणाला बायको माहेरी गेली आहे.

डॉक्टरांचा दुसरा संसार सुखात चाललेला वाटला. पण मग एकदम विचार आला, कन्या म्हणजे डॉक्टर चिंतेत असणार. लग्न, हुंडापांडा या सगळयाचे आमच्या कंजूस डॉक्टरांवर दडपण आले असणार. मग विचार आला. डॉक्टरना भेटून येऊया.

दोन दिवसांनी डॉक्टरांकडे दुपारची वेळ साधून गेलो. डॉक्टर नेहमीच्या चड्डी, गंजीफ्रॉकात होते. मला बघून हसत म्हणाले “ये! ये! रजेत आलायस वाटते?”

मी मानेनेच हो म्हणत एका खुर्चीवर बसलो. पूर्वी फक्त कॉटच होती. आता दोन खुर्च्या आल्या होत्या. सगळे सामान व्यवस्थित लावलेले दिसत होते. जमिनी छान सारवलेल्या होत्या. पुर्वीच्या धुळीने भरलेल्या व कॉटवर अस्ताव्यस्त पडलेल्या पुस्तकाना त्यांची जागा मिळाली होती. पाणी घेऊन आले ते एका ट्रे मधून चकचकीत ग्लासातून. डॉक्टरांच्या घराला शिस्त लागल्याचे जाणवले. आणि अजाणतेपणी तोंडातून पटकन बाहेर पडले “वा डॉक्टर! बरे वाटले. छान, आता डॉक्टरी व्यवस्थित चालते वाटते. लोक पैसे द्यायला लागले काय हो?”

आणि मग डॉक्टरनी जे काही सांगीतले ते अद्भूत होते.

“अरे माझी डॉक्टरी नेहमीच चांगली चालत होती. कधी मला कशाचीच वानवा नव्हती. लोक पैसे देत नव्हते एवढेच तुम्हाला दिसायचे. पैसे मिळवून काय करणार होतो रे? परत

सामान विकत घ्यायलाच वापरणार होतो ना? सगळ्या गावात मी एकच डॉक्टर. सगळेच ओळखीचे. रॉकेल आणले, दुकानदार पैसे कसे मागील? मला तो देत नाही तर मी तरी त्याला का द्यायचे? असेच सगळे घरात येई. तांदूळ, डाळ, रवा, मसाला, एवढंच काय चिंच, सोलं सुद्धा आणली तर पैसे नव्हते पडत. मग कशाला पैशाचा हट्ट धरू मी.

आणि हे लोक मला पैसे द्यायला लागले असते तर मला सगळे विकत घ्यावे लागले असते. पुरले नसते तर दुःखी झालो असतो. पैसे न मागता सगळ्यांना बरे करीत होतो. मग मला तेही मान देत होते.

इथल्या लोकांची मी नस ओळखली होती. पैसे यांच्याकडून घेणं म्हणजे दिव्य होतं. दुकानातून, कोणाच्या घरून काहीही वस्तू आणावी वाटली तर सरळ मागी. नाही कसे म्हणतील. वावच नव्हता नाही म्हणायला. पण म्हणून मी वाटेल ते मागत नसे. जरूर असेल तेच मागी. मी भजी खायचो. लोक खिजवायचे मी वेड पांघरायचो. आपल्याला काय घरी जेवण तेवढेच कमी बनवावे लागे. म्हणजे सगळ्याचीच बचत. दुकानदाराकडून सामान कमी, स्टोवला केरोसीन कमी, म्हणून लोकांकडे मागायचेही कमी. मग मी ठरलो कंजूस. कंजूस तर कंजूस; मला काहीच कमी नव्हते. कमी गोष्टी मागीतल्यामुळे दुकानदार राजी खुषीने देत.

दिवाळीत सगळे लोक उधारीवर गडगंज खरेदी करीत. माझी अगदीच नसे. अरे सगळे माझ्या घरची दिवाळी करीत. फराळ येईच पण पेशंटला बघायला गेलो की दिवाळीत फराळाची बशी पुढ्यांत येई. तुमची दिवाळी चार दिवसांची. मला आठ आठ दिवस पेशंटकडे फराळ मिळे. एक लक्षात घे मला पैसे न दिल्याने त्यांनाच मनात कुठे तरी अपराधी वाटत असेल. म्हणून माझे असे लाड करीत ते.

मुलाला शिकवताना पैसे लागणार ही विवंचना होतीच. मुंबईला गेलो तिथे एका डॉक्टर मित्राकडे बसलो होतो. त्याच्या दवाखान्याजवळच एक औषध दुकानदार होता तो आला व मित्राला म्हणाला डॉक्टर साहेब हा तुमचा महिन्याचा हिशोब. एक हिशोबाचा कागद व शंभर एक रुपये ठेवून तो गेला. मी सहज विचारले हे कसले हिशोब? मित्राने सांगीतले मी जी औषधे लिहितो ती पेशंट याच्या दुकानातून घेतात. तो मला विक्रीवर दहा टक्के कमिशन देतो. अरे औषध कंपन्या त्याला तीस पस्तीस टक्के देतात. मग तो मला देतो. सगळ्या मुंबईत हेच चालते. तू गावी हे नाय करीत? मग डॉक्टर म्हणून कमवतोस काय?

माझ्या डोक्यात चक्र सुरू झाली. गावात औषधाचे दुकानच नव्हते. रिटायर होऊन आलेले शिंत्रे मास्तर कसले तरी दुकान काढायचा विचार करीत होते. सरकारी नोकरीतून निवृत्त झाले होते. मग त्यांना एक दिवशी संध्याकाळी बोलावले व

सांगीतले. औषधाचे दुकान काढा. मी सांगेन औषधे कुठली आणायची ते. ती दुकानात ठेवत जा. मी लोकाना लिहून देईन तुम्ही विका. पस्तीस टक्के कंपन्या कमिशन देतात दहा टक्के माझे. मास्तरना आनंद झाला. म्हटले कुणाला बोलू नका आपण एक आहोत. मास्तर बरोबर समजले. त्यांनी दुकान काढले. मला महिना दोनशे अडीचशे रुपये मिळू लागले. दोन्ही मुलांचा बाहेर राहायचा महिना खर्च दीडशेपर्यंत पडायचा. त्याची सोय झाली. मला कसलाच त्रास झाला नाही.

मला बावळट म्हणायचे, माझी टेर घ्यायचे ते लोक बावळट की मी बावळट? बावळटपणाचा बुरखा मी जाणून बुजून घेतला होता. माझी वसुली करायला तोच मदत करीत होता. आता बघ दोन नवीन डॉक्टर आलेत. तेही औषधे लिहून देतात पण मास्तर कमिशन मलाच देतात. त्या डॉक्टरांना पत्ता पण नाही. ते त्यांच्या मोठ्या फी मधेच खूष. माझेही चालते मी स्वस्त डॉक्टर म्हणून. अजूनही लोक माझ्याचकडे जास्त.

मी अजून पूर्वीसारखाच राहातो. कोणालाही संशय येईल आणि बेंड फुटेल म्हणून असा राहातो. या कमिशनमुळे खूप पैसे येतात पण ते मालवणला पोस्टात नेवून ठेवतो. इथे नाही. पंचवीस पंचवीस हजाराच्या चार ठेवी आहेत. म्हणजे लाख रुपये झाले रे. आणि हे मला चिडवतात मुलीच्या लग्नात हुंडा कसा देणार म्हणून. अरे मी लाखोपती आहे. आहे का दुसरा कोणी या

गावात? माझ्या बावळटपणाच्या बुरख्याने मला हे सगळे दिलेय बघ. आणि डॉक्टरी पण मी सेवाभावाने केली. दोन्हीचे फळ आहे हे.

पुढे तू मोठा झालास तर उगाच हुशारी दाखवायच्या फंदात पडू नकोस. लोकाना ओळख, मगच बोलत वागत जा. कित्येक ठिकाणी बावळटपणाचा बुरखाच तुला उपयोगी पडेल.''

शांत चित्ताने कबुली जबाब देत डॉक्टर आपला एवढे दिवस पांघरलेला बुरखा टराटर फाडत होते. मला, सबंध गावाला त्यांनी आपल्या बाळवट अवताराने बावळट ठरवले होते. एकाच माणसाने सर्व गावाला आपल्या कह्यांत केले होते व कायम गुंगवून ठेवले होते. स्वतःला हुषार समजणारे पण पूर्णपणे गंडले होते व कायम फसत राहिले होते.

पण त्याचवेळी डॉक्टरनी एक वृत्ती जोपासली होती. गरजे पुरतेच मिळवायचे. लोक गंडतात म्हणून त्याचा फायदा ते उठवीत नव्हते. डॉक्टर एक सर्वात हुशार माणूस म्हणून आजही आठवत राहातात.

*****



# हिरकणी

माझ्या आजोबानी भटवाडीच्या जवळच घर बांधलं होतं. आमच्या दोन पिढ्या तिथेच मोठ्या झाल्या. पांदणीतून पाच मिनिटे चालत गेलं की भटवाडीतील पाच घरं होती. पेंडसे, शेवडे, जोशी व कानडे असे चार भटजी. पण कानडेंची दोन घरे झाली होती.

पेंडसे आमचे कुळब्राह्मण. म्हणजे आमच्या घरचे सर्व धार्मिक विधी पेंडश्यांशिवाय होतच नसत. गणपती स्थापनेपासून ते श्राद्ध, दशपिंडापर्यंत सर्व काही पेंडश्यांच्या हाती सुपुर्त केलं होतं. ते सांगतील ते आम्हाला शिरोधार्य.

पिढ्यान् पिढ्या हे चालत होतं. आजोबानी घर भटवाडी शेजारी बांधलं आणि पेंडसें बरोबरचा आमचा घरोबा वाढला. पूर्वीचं सोवळं, शिवाशीव हे कमी झालं. आमच्या घरचं पाणी पेंडसेंच्या घरची मुले पिऊ लागली. आमच्या मुलांबरोबर पकडा पकडीचे, लपंडावाचे खेळ खेळू लागली. घरोबा वाढत गेला.

मी गावी राहिलो. शेती पाहू लागलो. बाकी सर्व मुंबई पुण्याला चाकरी करायला गेले. पैसे कमवण्यात गुंग झाले. घर

घेण्यासाठी कर्ज शोधू लागले. मिळाले की हप्त्याची विवंचना करू लागले. मी मात्र घरी सुखात होतो. वाडवडीलार्जीत घर, शेतीचं उत्पन्न यात आमचं कुटुंब छान रहात होतं. चाकरमानी नेऊ शकतील एवढे तांदूळ, पोहे, कुळीथ, उडीद त्यांना देऊनही आम्हाला भरपूर उरत होते. पण माझ्या मुलांना त्या शहरी मुलांच्या परीट घडीचा मोह पडू लागला आणि ते शिकायला मुंबईला काकांकडे जायचा हट्ट धरून बसले व गेले ते गेलेच. अगदी कायमसाठी साता समुद्रापार. आता आम्ही दोघंच घरात राहिलो मी आणि माझी सौ.

शेतीच्या कामात दिवस भर भर जाई, पण संध्याकाळी घर ओकं बोकं वाटे. कंटाळा येई. दोघंच जणं किती आणि काय बोलणार एकमेकांशी.

पण एके दिवशी एक चार पांच वर्षांची मुलगी पांदणीतून आली. आमच्या फाटकाच्या आढ्याचे दांडे सरकवून सरळ आमच्या घराकडे येऊ लागली. मी ओटीवरच्या झोपाळ्यावर बसून हलका झोका घेत होतो.

परकराच्या ओच्यात काहीतरी घेऊन ती येत होती. छान जरीकांठी परकर पोलका, खास ब्राह्मणी छाप गोरा रंग, गोबरे गुलाबी गाल, तपकिरी घारे डोळे. अशी ती बाहुली, हळू हळू एक एक पायरी चढत ओटीवर आली. झोपाळ्यासमोर येताच मी झोका घेणं बंद केलं.

“काका! मला घ्या ना झोपाळ्यावर, मी फुलांची वेणी बनवणार आहे. शिकवाल मला?”

पहिल्याच भेटीत या मुलीने आपल्या निरागसपणाने मला पुरा गारद केला. वेणी बनवायला मला गुरु करायला निघाली होती. बायका, मुलींची कामं ती मला सांगत होती. मी तिला उचलून झोपाळ्यावर घेतलं. वर उचललं तशी तिची ओचा सांभाळायची तारांबळ उडाली. झोपाळ्यावर बसताच तिने ओचा खाली करून सगळी फुले तिच्या आणि माझ्या मधे पसरली. केळीच्या सोपाचे दोरेही घेऊन आली होती. एवढीशी चिमुरडी, पण फुलांची वेणी बनवायची सामुग्री अगदी साग्रसंगीत तयार करून आली होती. मला फार कौतुक वाटलं. मी विचारलं, “बाळा! नाव काय ग तुझं?”

“माझं नांव हिलकणी! बाबाचं नाव न्यानदेव, आणि घलचं नाव पेंडसे. काका वेणी कशी गुंतायची सांगा ना!”

मी संकटात सापडलो पण तेवढ्यात आमचे संभाषण ऐकून सौ. बाहेर आली. तिला पहाताच एकदम म्हणाली, “हा पेंडशांचा गोडांबा आलाय? चागलेच पाय फुटलेले दिसतात. काय ग! आईला सांगून आलीस का आमच्याकडे येणार ते?”

“आई ना कामात होती फाल. मला वेणी बनवायला शिकवत नव्हती. म्हणाली जा शेजाली खोतांकडे. त्या शिकवतील. म्हणून आले. काका शिकवा ना मला.”

“अग बाई! हे शिकवणार तुला? त्यांना कुठे येते. मी शिकवू का?”

“हो! काकू, तुम्हाला येते ना मग शिकवा की. काका! उठाल का तुम्ही? काकूना जागा द्या ना!”

बापरे! ही चिमुरडी पहिल्याच झटक्यात मला एक एक धक्के देत होती. अतिशय निरागस भाव, ही ताबडतोप मनात बसून गेली. आबोलीची भरपूर फुले तिने आणली होती. आमच्या सौने केळीच्या सोपाचे दोर पायाच्या आंगठ्यात कसे पकडायचे, दुसरा एक दोर आंगठ्याच्या विरुद्ध बाजूच्या टोकाला कसा बांधायचा, फुले गुंफून दोऱ्याने कशी घट्ट आवळून बसवायची हे दाखवले. त्या चिमुरडीची बसण्याची ढब, मान मुरडत एक एक गाठ घालण्याची, बरोबरच तोंडाचा चंबू करून दोरा फिरेल तसे ओठ फिरवण्याची लकब सगळंच और होतं. मी ते पहाण्यात गुंग होऊन गेलो होतो. ती वेणी बनवण्यात जीव ओतत होती. आजुबाजूचे भान हरपून कामात दंग झाली होती.

तीन चार इंचांची वेणी तयार झाली. थोडी फुले वेडी वाकडी लागली होती. तरीही त्या वेणीकडे अनिमिष, हसऱ्या नेत्रानी पहात ती विचारू लागली, “काकू! छान झालीय ना वेणी? दोन बनवणाल आहे. एक माझ्यासाठी आणि एक माझ्या आईसाठी.”

“अस्सं? आणि माझ्यासाठी नाही?” सौने तिला खोडकर चिमटा काढला.

“हो तुम्हाला पण कलुया. पण फुलं कमी पडली तल? तुमच्या वाडीत आहेत का आबुली?”

“अगबाई! माझं गुणी बाळ ते. आपण असं करू. मी एक वेणी बनवते म्हणजे लवकर आटपेल. चालेल तुला?”

“नाही काकू. दोन्ही मीच बनवणाल. तुमच्यासाठीही मीच बनवणाल म्हणजे मला चांगली यायला लागेल.” सौ निरुत्तर झाली. मी मात्र हा सोहळा झोपाळ्यासमोर खुर्ची टाकून डोळे भरून पहात होतो. ती वेण्या गुंफत होती खरी, पण त्या पहिल्या भेटीतच आमच्या घराशी, आम्हा दोघांशीही ती एक नातं गुंफत जात होती. “र” म्हणता येत नसलेल्या त्या चिमुरडीचं नावं हिरकणी म्हणून सौने सांगीतलं. खरंच ती हिरकणी होती. पहिल्या भेटीतच तिने आम्हाला आपलंसं करून टाकलं. तिन्ही वेण्या तयार होईपर्यंत तिने सौ ला उठू दिलं नाही.

वेण्या तयार झाल्या, तसं तिने सौकडून आपल्या डोक्यात एक माळून घेतली. मग विचारलं “काकू तुमच्या केसात माळू मी?”

सौ हसत म्हणाली,“ओ गोडाबाई! मी माळते माझ्या केसात. ही बघ.” सौने वेणी आंबाड्या भोवती फिरवून मागचे दोरे घट्ट बांधले. आंबाड्याचा काढलेला आकडा वेणीतून आंबाड्यात खोचला. हे एकटक पहाताना ती म्हणाली, “काकू! मागे न बघता कशी माळलीत? मागचं पण दिसतं तुम्हाला?”

“नाही ग बबुल्या! उद्या ये! मी तुलाही शिकवीन हां मागे तुझ्या केसात न बघता माळायला.”

हिरकणी आता दररोज येऊ लागली. कधी माझ्याबरोबर झोका घेत बसे. कधी स्वयंपाक घरात जाऊन हिच्या कामात लुडबुड करत असे. अनेक प्रश्नांचा भडीमार आमच्यावर

चाललेला असे. हीने एकदा विचारले, “गोडुल्या! भाजी भाकर खाणार आमच्या कडची? आई नाही ना ओरडायची?”

“हो काकी खाईन मी. आईला पण सांगेन खाल्ली म्हणून.” सोवळ्या-ओवळ्यातून गाव नुकतंच बाहेर पडत होतं. कदाचित् तिच्या आईला आमच्या घरी खाल्लेलं चालत नसेल तर? ही तर विचारून फसली होती. पेंडसे एकदम् शुद्ध ब्राम्हणी जेवणवाले, आम्ही मधे मधे सामिष खाणारे. कधी मासे तर कधी सागुती. मग हिने तोडगा काढला. हिरकणीला माझ्याकडे बसवून लगबगीने पेंडसेंकडे जाऊन विचारून आली. केळफुलाची भाजी व तांदळाची भाकरी एका ताटलीतून आणून हिरकणीला देत म्हणाली, “गोडुल्या! सांग हं मला भाजी कशी झालीय ते?”

हिरकणी भाकरीचे छोटे छोटे घास भाजी बरोबर घेत होती. तिला भाकरी भाजी आवडल्याचं तिच्या चेहेऱ्या वरून दिसत होतं. ही पुढ्यात उभी राहून तिला न्याहाळीत होती. “काय ग आवडली का भाजी?”

“काकू किती छान बनवलीत भाजी. पण यात एक वास येतोच तो कसला? छान आहे. आमच्या घरच्या जेवणात असला वास कधीच नाही आला.”

आम्ही समजून गेलो. लसणाची फोडणी या छोटीने ओळखली होती. बहुधा त्यांच्याकडे कांदा लसूण जेवणात वापरत नसावेत.

भाकरी खाऊन झाल्यावर झोका घेता घेता हिरकणी माझ्या मांडीवर डोके ठेवून केव्हा आडवी झाली आणि बोलता बोलता झोपी गेली समजलंच नाही.

थोड्या वेळातच आम्ही जेवून घेतलं. हिरकणी गाढ झोपली होती. चेहेऱ्यावर निरागसपणा पसरला होता. आम्हा दोघांनाही हिरकणी एक विरंगुळा बनून गेला होता. थोड्याच वेळात पेंडसे बाई लगबगीने आल्या. विचारू लागल्या, “अहो, हिरू आहे ना तुमच्याकडेच?”

आम्ही हो म्हणताच त्या शांत झाल्या. “अहो सारखी इकडे तिकडे फिरत असते. पुरा दिवस बडबड चालू असते. सकाळी तुमच्याकडे, दुपार नंतर शेवड्यांकडे नाहीतर कानड्यांकडे जाऊन बसते. सारखा प्रश्नांचा भडिमार सगळ्यांवर चालू असतो. एकटीच फिरते. मग वेळ चुकली की काळजी वाटते.”

“अहो येऊ दे तिला. आम्ही सगळी काळजी घेऊ. उद्यापासून मी येईन सोडायला तिला. ती आली की आम्हालाही थोडा विरंगुळा.” मी सांगीतले.

“अहो तिच्या वयाचं कुणीच नाही तिच्याबरोबर खेळायला. त्याचं वाईट वाटतं. या वयात धांवा धांव, पकडा पकडी असले खेळ खेळलं की तब्येत चांगली रहाते. पुऱ्या भटवाडीत कुणीच नाही.”

खरं होतं त्यांचं म्हणणं. ते निरागस बालपण खेळकर व्हायला तिच्या वयाची मुलं खेळायला पाहिजे होती. पण मी मनात निश्चय केला.

दुसऱ्या दिवशी ती आली मग आम्ही तिघानी पकडा पकडी खेळायची ठरवली. आणि खेळलोही. लपंडाव खेळलो. धांवून, हंसून लाल लाल होणारी हिरकणी बघून आम्ही दोघंही आनंदी होत होतो. पण तरी देखील तिच्या वयाचे होऊ शकत नव्हतो.

या वर्षी बिटकी, खोबऱ्या, हापूस, पायरी सगळे आंबे खूपच मोहरले होते. एक पत्र टाकून मुंबईकर चाकरमान्यांच्या मुलांना रजेत येण्याचे आमंत्रण धाडले. आमच्या पुतण्यांची, पुतणींची पाच सहा मुले रजेत आली. माझा भाऊ त्यांना घेऊन आला होता. एक दोन दिवसात ती थारावली. त्या दोन दिवसात हिरकणीची वाट पहात होतो. पण ती आली नव्हती. तिसऱ्या दिवशी उठलो आणि पेंडसेंच्या घरी पोचलो. खेळायला खूप मुलं आहेत सांगून हिरकणीला घेऊन आलो.

पहिल्यांदा एवढी मुले पाहून बावरलेली हिरकणी हळू हळू त्यांच्यात मिसळू लागली. मी सगळ्यांना दम मारला. "ती लहान आहे. तिला सांभाळा, पडणार नाही लागणार नाही पहा, आणि तिला दमवू नका. तिच्यावर राज्य आलं की खोटे खोटे बाद व्हा."

माझं सर्व काही मुलांनी ऐकलं. तासभर हौदोस घातला. हिरकणी धावून धावून चांगलीच दमली होती. मी झोपाळ्यावर

बसलो होतो. माझ्या शेजारी बसत म्हणाली, “मज्जा आली. लितु आणि मंगलला इथेच लाहू द्या ना. लोज खेळायला मिळेल.”

“गोडूले! आता तुला शाळेत जायचंय. या वर्षीपासून. मग शाळेत तुला खूप मित्र मैत्रिणी मिळतील, त्यांनाही शाळा आहे. तिकडे मुंबईला. मग त्यांना जायला नको का?” ही समजावू लागली.

मुले जवळ जवळ महिनाभर होती. तो महिना हिरकणी सकाळीच यायची ती संध्याकाळपर्यंत जायला तयार नसायची. आमच्याचकडे जेवण खाण चाललं होतं. पेंडसे बाई दोनदा तरी बोलवायला येत. तिचा हिरमुसला चेहरा बघून आम्हीच तिला पाठवीत नसू.

मुलं गेली, आणि हिरकणी विचारात हरवू लागली. “लितू आणि मंगल पलत कधी येणाल? काका त्यांना बोलवा ना!” हा घोष ती करत राहायची. अजून आंब्याच्या आढ्या घरात उतरत होत्या. तिला आंबे खायला देऊन किंवा काहीतरी विषय बदलून आम्ही तिला थारवायचा प्रयत्न करायचो. एकदा आंबे खाता खाता ती म्हणाली, “काका! तुमच्याकडचे आंबे किती गोड व मोठे आहेत. आमचे एवढे नाहीत. आई तल आम्हाला एक एकच देते. तुमच्याकडे मजा येते.”

भटवाडीतील सर्व जणानी गावातली घरं वाटून घेतली होती. वडिलोपार्जीत ती एक एका कुटुंबाकडे आली होती. पूर्वी सारखी सात आठ मुलं असण्याचे दिवस संपले होते. कुटुंब

लहान होत होती. आधीच भिक्षुकीवर घर चालवणाऱ्या भटवाडीतील भटजींचे दिवस कठीण होत चालले होते. त्यातच महागाई वाढत होती. थोडीफार जमीन प्रत्येकाची होती. पण त्याचं उत्पन्न खाण्यातच जात होतं.

आमच्या घरी आढ्या उतरत होत्या. मी दोन पिशवीत छान पिके आंबे भरले, एकात हापूस, एकात पायरी. आणि पेंडसेंच्या घरी पोचलो. बरोबर गोडुल्या हिरकणी बाई होत्याच. त्यांच्या प्रश्नांच्या फैरी चालल्या होत्या. होईल तसं मी त्याला तोंड देत होतो. पेंडसेंकडे आंबे दिले, तर ते पहातच राहिले. “अहो एवढे कशाला दिलेत? आहेत आमच्या झाडांचे देखील.”

“हे आमच्या गोडुल्या हिरकणीसाठी प्रेमाने दिलेत आम्ही. ती आमच्याकडेच असते दिवसभर. तुमच्या एवढाच आता आमचाही हक्क आहे तिच्यावर. आणि हे पहा काही लागले तर संकोच न करता सांगा. कुळ पुरोहित आहात तुम्ही आमचे. म्हणजे घरचेच झालात.”

पेंडसे गप्पच राहिले. पेंडसे बाई दारात उभे राहून सर्व पहात होत्या. पुढे होऊन त्यांनीही आंब्यांच्या पिशव्या उचलल्या नाहीत. हे लोक किती झालं तरी स्वत:ला ओशाळेपण येईल असं काही करणार नाहीत, फार स्वाभिमानी, आत्यंतिक व्यवहारी. कदाचित त्यांना प्रश्न पडला असणार हे आंबे घेतले तर परत फेडीला आपल्याकडे काय आहे? असेच कसे घ्यायचे आंबे. ते द्विधा मनस्थितीत पाहून मी लवकरच उठलो आणि घरी निघालो.

आता दुसराच मार्ग मी चोखाळायचा ठरवला. सत्यनारायण पूजा करायची ठरवली. भटजी पूजा सांगायला येतील व पेंडसे बाईनाही बोलवायचे सवाशीण म्हणून. एकंदर परिस्थिती वरून ते खूप अडचणीत संसार चालवत असणार हे माझ्या लक्षात आलं होतं.

सत्यनारायणाची पूजा पार पडली. भटजीना धोतर जोडी व पेंडसेबाईना साडी दिलीच पण वर एकशे एक रुपये दक्षिणा दिली. सत्यनारायणाचं प्रयोजन काय हे सांगताना म्हणालो, मुलाला पाहिजे तशी नोकरी मिळाली. मी बोललो होतो, ही नोकरी मिळाली तर पूजा करीन म्हणून. भटजीना पटले.

हळू हळू घरोबा वाढत होता. काही चांगलं चुंगलं रांधलं की त्यांच्या घरी जात होतं. दिवस, महिने वर्षे उलटत होती. हिरकणीची गावातील शाळा संपली होती. भाषा, उच्चार शुद्ध झाले होते. पण पुढच्या शिक्षणाची सोय गावात नव्हती. त्यानंतर मी तिचा पुढचा अभ्यास घेऊ लागलो. कॉलेजच्या अभ्यासात तिला फार गोडी लागली होती. वाचन वाढत चाललं होतं. तिचं डोकं एकदम् कोकणस्थी तल्लख. त्यामुळे घरी अभ्यास छान चालला होता. पण प्रश्न होता तो डिग्रीसाठी तिला कोणती युनिव्हर्सिटी परवानगी देईल? शेवटी एका युनिव्हर्सिटीचा एक्सटर्नल कोर्स एक वर्ष करून ती बी.ए.ला बसली. मराठी व इंग्लीश दोन्ही विषयात फर्स्ट क्लास मिळला. दोन्ही घरं आनंदाने न्हाऊन निघाली. पेंडसेनी माझे हात हातात घेऊन आभार मानायला सुरवात केली. मी हात काढून घेत म्हणालो, "अहो ती

आमची देखील तेवढीच मुलगी आहे. जेवढी तुमची आहे.” हिरकणी ऐकत होती. पटकन म्हणाली, “आई! ताई तुझी मुलगी आणि मी काका काकूंची. त्यांच्याकडे मोठी झाले, त्यांनी शिकवलं. आपल्या मुली सारखंच मला वाढवलं. मग मी त्यांची देखील मुलगीच ना?”

रात्री सौ आणि मी बोलत बसलो होतो. आम्हाला कृतार्थ झाल्याचं एक समाधान मिळत होतं. त्या गोडूलीने आमच्या स्वत:च्या मुलांपेक्षाही जास्त सहवास दिला होता. काय असेल हे नातं? गेल्या जन्मीचे ऋणानुबंध? पुढचा मार्ग हिरकणी ठरवत गेली. स्वत:च्या बळावर एम्. ए. झाली. मग बी.एड् . एम.एड् झाली नोकरी करता करता ती हे सर्व करत होती.

आणि एके दिवशी पेंडसे भटजी पेढे घेऊन आले. सात आठ मैलावर असलेल्या एका गावात हिरकणीची सोयरीक जुळवली होती. त्यांच्या आंब्यांच्या बागा होत्या मोठ्या प्रमाणात आंबा निघे. घरचे सर्व छान होते. मुलगा शेती शास्त्रातला पदवीधर होता. समंजस होता. हिरकणीची अट त्याला आवडली होती. लग्नानंतरही ती नोकरी करणार ही अट. लग्न ठरले ऐकून ऐकून आम्हालाही आनंद झाला.

लग्नाच्या दोन दिवस आधी हिरकणी आमच्या घरी आली माझ्यासाठी सफेद लेंगा व शर्ट आणि हिच्यासाठी जरीची छान साडी तिने आणली होती. म्हणाली, “काका! काकू! लग्नादिवशी हे कपडे करून लवकर या हं आमच्या घरी.”

“हो येणार तर! पण एवढं सगळं कशाला आणलंस? होते की आमच्याकडे समारंभासाठीचे कपडे.”

“तुम्हाला उद्या एक महत्वाचं काम देणार आहे मी. मग त्याला शोभेसे कपडे नको का? उद्या सांगेन काय ते” एवढं बोलून ती निघून गेली.

दोन दिवसानी लग्न होते. सकाळीच तासे वाजंत्री वाजू लागली तसे आम्ही पेंडसेंच्या घरी पोचलो. लग्न साधेपणातच झालं. हिरकणीने आग्रहाने सांगीतलं, “काका! काकू! कन्यादान तुम्ही करायचंय. आणि मी लग्नानंतर तुमच्या घरी येवून पाया पडणार, मंडपात नाही. तेव्हा तुम्ही लग्नानंतर जेवून तुमच्या घरीच जा!”

“अग पण तुझे आई बाबा करतील की कन्यादान. ते असताना आम्ही कसे करणार?”

“काकू! आई बाबानी ताईचं कन्यादान केलंय, आणि मी तर तुमच्या घरीच मोठी झालेय. मला शिकवलं, अगदी सख्ख्या मुलीसारखं केलंत माझं सगळं. आई बाबाना पण वाटतं तुम्हीच कन्यादान करावं माझं.”

आज हळद लागलेल्या त्या हिरकणीचे रुप पहाताना मला एकदम लहानपणीची ती आमच्या फाटकातून येणारी, गोबऱ्या गालाची गोडुली दिसत होती. घरी आलो. ही म्हणू लागली “माझ्या डोळ्यासमोर ती गोडुली सारखी येते आहे. वर्षे कशी झरझर मागे पडली. आज लग्नही झालं तिचं. आपल्याला कन्या

रत्न दिलं नाही देवानं. पण आज हिने आपणहून कन्यादानाचं पुण्य आपल्या पदरात घातलं.”

थोड्याच वेळात पेंडसे कुटुंब जावयासकट आमच्या घरी येताना दिसले. आम्ही सर्व तयारी ठेवलीच होती. ते दोघे पाया पडायला वाकले. हिच्या डोळ्यातून दोन थेंब हिरकणीच्या डोक्यावर पडून केसात अदृश्य झाले.

“हे काका, या काकू आणि हा झोपाळा पाहीलास विनय? हे माझं खरं माहेर. या झोपाळ्यावर अगदी लहानपणी बसले काकांबरोबर, ती अगदी बीए होईपर्यंत. असं हे माझं माहेर कसं वाटलं तुला?”

आनंदाचं रडू, दु:खाचं रडू हे सर्व पाहिलं होतं. पण आमच्या दोघांच्याही डोळ्यांतून समाधानाच्या धारा लागल्या होत्या. कन्यादानाचं पुण्य अनुभवत होतो.

*****



# रंगारी

"है च्याक् च्याक्" संध्याकाळी हा आवाज ऐकू आला की समजायचं की पारी घरी चाललीय. डोक्यावर हिरव्यागार चाऱ्याची भली मोठी वरंड घेतलेली पारी पुढे चालायची आणि तिच्या दोन म्हैशी व एक गाय एका सरळ रेषेत तिच्या मागून चालायच्या. जराही आजूबाजूला झाल्या तर पारीच्या तोंडून "है च्याक् च्याक्" निघायचे. मग आपोआप मागची लाईन परत सरळ व्हायची. आश्चर्य वाटायचे की पुढे चालणाऱ्या पारीला मागच्या ढोराने लाईन तोडलेली दिसे कशी? पांदणीत तिचा आवाज आला की आमचे बाबा म्हणत "पारीची परेड निघालीय. दिवेलागणीची वेळ झाली रे. कंदील, ठाणव्या घासलेट भरून तयार करा." पारीच्या परतीची वेळ अशी घड्याळा सारखी वापरली जाई.

पारी म्हणजे पार्वती. भैरव वाडीतील राणेंची मुलगी. राणेना तीन मुलं, दोन मुलगे एक मुलगी. दोघा भावांच्या मधली ही. मोठा भाऊ मुंबईला कापड गिरणीत साच्यावर कामाला

होता. दरमहा दहा वीस रुपयांची मनीऑर्डर पाठवी. त्यातून तेल मिठाचा खर्च भागे. पारीची आई जशी कामसू तशी पारी पण कामाला वाघ.

झुंजुमुंजु होताच पारी आपल्या गाई म्हैशी घेऊन रानाकडे निघे. हातात एक दांडा, डोक्यावर कांबळ्याची खोळ आणि खांद्यात अडकवलेली न्याहारीची पिशवी घेऊन ती निघे. पिशवीत चारा कापायची कोयती व पेंडा बांधायची दोरी पण असे. रानात निघायच्या आधी तिने दूध काढलेले असे, गोठा साफ केलेला असे. म्हणजे तिचे काम भल्या पहाटेलाच सुरू झालेले असावे.

कोकणात दूध दुभत्याचा अभाव असणारे ते दिवस. उजाडता उजाडताच तिची आई दुधाची भली मोठी कासंडी व मापाचा ग्लास घेऊन निघे. आमच्या घरी तिच्याच घरच्या दोन ग्लास दुधाचा रतीब होता. सकाळीच आलेल्या त्या निरश्या दुधाचा पहिला चहा बने तो फार सुंदर लागत असे.

पारीच्या आईची चार पाच एकर भातशेती व तीन चार एकर माळरानाची वरी, नाचणी, कुळीथ यांची शेती होती. ती शेतीत खपून छान पिक घ्यायची. राणे मात्र नांगर धरण्या खेरीज दुसरी कसलीच कामे करीत नसत. अक्कडबाज मिशा ठेवलेले राणे पंचायत, गावकी यातच लक्ष घालत. पारी आणि पारीची आई फार महेनती. सारख्या कामात दंग असत. आई स्वभावाने

थोडी शांत पण पारी म्हणजे रानातल्या वणव्या सारखी केव्हा पेटेल ते सांगता येत नसे.

उजाडायच्या अगोदर गुरांना घेऊन रानात गेलेली पारी अकरा वाजता घरी परतत असे. त्या वेळी ती आमच्या घरी येई. पाणी मागे, लोटाभर पाणी उभ्यानेच तोंडात ओतत गटगट आवाज करीत पित असे.

पारी उंची पुरी, सावळी, कामाने काटक झालेल्या बांध्याची होती. धारधार नाक, उभा चेहरा, टपोरे मोठे डोळे तिच्या गावरान सौंदर्यात भर घालायचे.

माझ्यापेक्षा वर्षा दीड वर्षाने पारी मोठी होती. त्यामुळे आमची गट्टी जमली होती. पारी आली की मी तिच्या मागे लागे. कायतरी खेळ म्हणून सांगे. ती पटकन उठून अंगणा बाहेरच्या मातीतून पाच गोल दगड आणी व परत येऊन खेळायला बसे. पाच दगडाचा पचीचा एक डाव होतो न होतो, ही बया उठून धावत सुटे. तोंडाने बडबडत सुटे, “माझी ढोरा गेली असतीत घराक. रांडग्या मेल्या, तुझी अक्कल खंय गेली. खेळत कसला बसलं कामा टाकून”. स्वतालाच शिव्या देत बडबडत जाणारी पारी बघून आम्ही सगळेच हसत असू. कुठल्याही कामात जरा चूक झाली की ती एक चापटी गालावर मारून घेई. नंतर स्वतालाच चार शिव्या घालून घेई.

महिन्यातून दोन तीन दिवस ती लहान भावाला ढोरांना चरायला रानात पाठवी व ती दुधाचे पैसे वसूल करायला रतीबांच्या घरी जाई. तिच्या आईने हे  काम मुद्दामच तिला सोपलेले असे. कारण जर कोणी होय नाय केले तर त्याला परीच्या तोंडाची शिव्यावळी ऐकावी लागे. वर धमकी पण मिळे, “ पैसे नेतेय ते आमी नाय खायत.. ढोरांच्या पेंड पाण्याक लागतत. माझ्या ढोरांच्या रगताचा दूध पितास तर नाय म्हशालच कसे? जरा तरी लाज ठेवा.” त्याच्या अगोदर व नंतर त्या माणसाने पारीच्या तोंडून शंभर एक अस्सल कोकणी शिव्या ऐकलेल्या असत. तिला नाही म्हणायची कोणाची म्हणून हिंमतच होत नसे.

आमच्या घरी ती येई ती अगदी शेवटी येई.. तिची आणि माझ्या वडलांची मस्त धुळवड चाले.

“ पारे पैसे नाय हत गो! दोन दिसान दिलंय तर चलतीत?”

“ होय! सांगतत पैशे नाय म्हणून. गावात सगळ्यात जास्त डबुला तुमच्या कडे हा, ता काय माका म्हायत नाय? आये माका तुमच्या कडे कित्या पाठवता ताच माका समजणा नाय.” पारी एवढं बोलून माझ्याकडे वळे. “बाबू जारे पैशाचो डबो हाडून दी त्येंच्याकडे. उठाचो आळस इलो हा त्येंका.”

इथे मात्र मी पारीला फितुर होई. डबा आणून वडलांच्या बाजूला ठेवे. वडिल त्या पितळेच्या डब्याची कडी उघडीत. हळूच आत डोकावत व परत म्हणत “गो खरच नाय हत पैशे.”

“ बघा हां! डब्यात बघूक लावलास तर आतले सगळे पैशे माजे. सगळे घेवन जायन. तुमी दिलास तर हिशोबाचेच घेवन जायन.” वडिल हसत तिचे हिशोबाचे पैसे काढून देत मग म्हणत “ गो तुझे ते मंत्र आयकूचे होते म्हणून नाय म्हणत होतय.. खयसून इतक्यो गाळी शिकलस गो? आमकाय म्हायती पडतीत तुझ्यो नव्यो गाळी.”

“काकानु! माणूस बघुनच गाळी घालतय मीया. माका काय पिंपळावरच्या हडळीन पकडल्यान काय? तुमका गाळी घालूक?

पैसे घेऊन ती उभी झाली तसे वडिल म्हणाले “ मग माका केंवा ऐकवशीत तु गाळी

अस्सल होयोत हां.”

“बघा अशो नाय येयत त्यो. काय तरी मना इरुध झाला काय आपसुक येतत पोटात्सून ओठार.” एवढ बोलून ती उड्या मारत पळत सुटली. जाता जाता वळून मला म्हणाली “ बाबू येतस माझ्या घराकडे? पची खेळूया आता रानात जावचा नाय.”

मी नाय म्हणून मान हलवी आणि दुडकत उड्या मारत पारी पांदणीत गायब होई.

मी नाय म्हणायला कारण होतं. ती माझ्याशी खेळली नसती. घरी गेल्यावर मिळेल त्या कामाला हात घालून करत

बसली असती. कामा शिवाय दुसरं काही तिला सुचत नसे. बाळपण हरवलं म्हणाव  तर ती नेहमी आनंदी असायची.

एक दिवशी सकाळी सकाळी ती आली. सरळ वडलांच्या समोर जाऊन उभी राहिली म्हणाली "बाबा चार दिवासा आधी नवी म्हस घेवन ईलो, ती आता विता हा, सगळा होयत ना बरोबर ? माका भियाक होता हा."

"काय भिव नको. सगळा बरोबर होयत. जा तू शांत पणान."

" मी नाय जावचंय. वियाली काय येयत गीरो सांगाक."

गीरो म्हणजे तिचा धाकटा भाऊ. आज मात्र मला आश्चर्य वाटलं

माझ्या मनाच्या कॅनव्हासवर पारीच एक चित्र तयार होऊन बसलं होतं. कामसु, कष्टाळू, वाचाळ, रागीट, खेळकर, हसरी, चटपटीत हे सगळे रंग त्यात भरले होते. कधी नाही तो भित्रेपणाचा रंग आज त्या चित्रात चढत होता. गाई म्हैशींवर प्रेम करणारी, त्यांना जीवापाड जपणारी म्हणूनच त्यांची वितं पाहताना घाबरून जाणारी. हा रंग जरा भरायला कठीण होता. रानात एकटी फिरणारी पारी, जिव्हाळया पोटी, म्हैशीच्या काळजी पोटी केवढी घाबरते ते समोर दिसत होतं. ते चित्र मनाच्या कॅनव्हासवर ठसत चाललं होतं.

तेवढ्यात तिचा भाऊ आला. पारीला म्हणाला "चल घराक म्हस वियाली."

" काय झालो रे रेडो की रेडी ?"

“ता काय माका नाय म्हायत.. आय म्हणाली टोणगोच झालो. आता पारीच्यो गाळी ऐकूच्यो लागतल्यो.”

“रांडेन ह्याय येळाक रेडोच दिलान तर.”

पारीच्या चहेऱ्यावर नाराजी पसरली. पाय आपटतच ती तिच्या घरी गेली. दुसऱ्या दिवशी सकाळी सकाळी दूध घेऊन पारी आली. बरोबर व्याल्या म्हैशीचा पहिल्या वेळचा चीक घेऊन आली. वडलांना म्हणाली, “काकानु ह्यो खरवसासाठी पयल्या वेळचो चिक हाडलंय. खरवस तुमचो चांगलो होता. आमकाय देवा. आयेक नाय येयत बनवूक तुमच्या सारखो.”

“मग तुका शिकवतय ये दुपारी.” वडील म्हणाले.

“ह्या येळेक नको. टोणगो घातल्यान वो काकानु. रेडी असती तर घरची म्हणून मोठी केली असतंय, जीव लावलं असतंय. पण काकानु आमच्याकडे रेडी नायतर पाडी कित्या नाय वो होयत? गायकय पाडो झालो, पयल्या म्हशीकय रेडो, आताय हिका रेडो. असा कसा वो?”

“जागेचो गुण असता गो! तू एक काम कर. तेंची बांधूची जागा बदल. मग बग होतीत.”

वडील तिची मजा करायसाठी बोलत पण ती अगदी मनावर घेई. कामाला वाघ असलेली पारी दुसऱ्या दिवशीच पडवी बांधायच्या कामाला लागली.

कोकणात घर परसू मोठी असतात. पूर्वीच्या पडवीला लागून काटकोनात दुसरी पडवी बांधायला घेतली. जुने चिरे, दगड लावून पडवीचा पाया बनवला, दिवसा केव्हाही फुरसत

मिळाली की ही पडवीचे काम करू लागली. पायात माती भरून चिखल केला. जरा सुकल्यावर धोपटून धोपटून घट्ट जमीन बनवली. गाई म्हैशीना बांधायचे खुंट आधी पासूनच जमिनीत रोवून घट्ट बसवले. खुंटांच्या थोडे पुढे आडव्या बांबूचे गोठण बनवले. ज्यात चारा टाकला की गुरांच्या पायाखाली येणार नाही. जमिनीला बाहेरच्या बाजूला जाणारा उतार बनवला. त्यामुळे गुरांच्या मुताचा चिखल गोठ्यात होऊ नये.

आता  भिंती छप्पर बांधायचे बाकी होते. वासे लावून कौले घालायला तिला एकटीला शक्य नव्हते, म्हणून बांबूच्या भेतात झुडुपांचे टाळ बांधून मातीने लिंपून भिंती बनवल्या. गवत, करड वापरून असेच छान छत बनवले. गुरांसाठी आता छान नवी पडवी तयार झाली. एकटीने बनवलेली. तिच्या कामात कोणीही लक्ष घातले नाही. तिच्या अखंड शिव्यांची माळ ऐकायला सर्व घाबरत होते.

दुसऱ्या दिवशी ती वडलांकडे आली, "काकानु! पडवी तयार झाली. मुहुर्त काढा." तो पर्यंत सगळी बित्तंबातमी तिच्या आईने वडलांपर्यंत पोचवली होती.

"गो! उद्याच बांध ढोरा. इतक्या काम एकट्यान केलंस, मुहुर्त कसलो बगतस. तो वरचो देव तुका प्रसन्न झालो सा."

एवढे ऐकताच पारी खूष झाली. तिची सगळी गुरे त्यांच्या पाडसांसकट नव्या पडवीत तिने बांधायला सुरवात केली.

दोन दिवस लोटले असतील, मागेच तिरवडेकरांचे घर परसू होते. ती बाई ओरडत आली. "तुमच्या ढोरांच्या शेणा

मुताचो वास आमच्या घरा पर्यंत येता. पडवी मोडून टाका.'' ती पुढे बोलायच्या आधीच पारी बोंबलायला लागली.

''काय गे! माझ्या परसात काय करूचा ता मी करीन. तू कोण XXX होतस माका सांगणारी. वास घाण येता तर खिडकी बंद कर या बाजूची. इली XXX माका सांगाक XXXची. हात लावन बघ XXXच्या  माझ्या पडवेक. XXXच्या तुझो हात मुळात्सून उखडलय नाय तर नावाची पारी नाय.'' पुढचा अर्धा तास पारी उकळत होती, खदखदत होती. दरवेळी नव्या नव्या शिव्या तिच्या तोंडून फुटत होत्या. तिचा तो अवतार बघून तिरोडकरीण शंभर एक शिव्यांचं गाठोडं घेऊन आपल्या घरी गपचूप परतली. तरी देखील मागच्या पडवीतून पारीची बडबड आणि शिव्या आणखी अर्धा तास चालू होत्या.

हा तमाशा बघायला वाडीतील सगळी बायका पोरे जमली होती. पारीचा तो भयानक अवतार पाहून सगळे गप्पगार झाले होते.

दुसऱ्या दिवशी ती आमच्या घरी दूध द्यायला आली तेव्हा वडील म्हणाले, ''पारी! असा संतापू नये आणि अशो गाळी वायट दिसतत गो तोंडात. जरा गाळी कमी कर. एकदा नाव बिगाडला की किती त्रास होयत तुझ्या बापाशीक? लगीन नको होवक तुझा?''

''माका भडकवला तरच भडकतय मी काकानु. माझ्या परसात खय काय बांधुचा ता मी ठरवतलंय की ती XXXची ती

तिरोडकरीण? तिचा आयकून घेतलंय तर डोक्यार बसात तेचा काय?"

वडील गप्प. बोलण्यात काही अर्थ नव्हता. पारी सुधारण्या पलीकडची आहे याची खूणगाठ त्यांनी मनात बांधली.

पुढच्या वर्षी पारीची दुसरी म्हैस व्याली, रेडी झाली. छान पांढरा ठिपका असलेली रेडी पाहून पारीला वेड लागायचेच बाकी होते. व्याल्या म्हैशीला आणि नव्या रेडीला मायेने गोंजारतानाही पारीच्या तोंडातून मायेने भरलेल्या खास शिव्या जातच होत्या.

चिक घेऊन आली वडलांसमोर ठेवत म्हणाली, "आता शिकवा माका खरवस" पुढचा तासभर ती आणि वडील खरवस बनवण्यात गर्क झाले होते. खरवस थंड व्हायला ठेवला आणि पारी घरी जाता जाता म्हणाली, "काकानु सांच्याक येतय मग खरवस खावया. तवसर रांडेची माजी जीभ लाळ सोडत रवतली."

स्वतच्या जिभेला सुद्धा शिवी दिल्या शिवाय तिला बोलता येत नव्हते.

पारीचं हे असं चित्र माझ्या मनावर ठसून गेलं होतं. तिचा मोठा भाऊ दहा दिवसांची सुट्टी घेऊन आला. वडलांशी काहीतरी बोलला. शिरस्त्याप्रमाणे मिठाईचा पुडा त्यांच्या हाती देऊन निघून गेला. संध्याकाळी पारीची आई आली. वडलाना

विचारू लागली, “काय तेणी ठरवलान ता तुमका पसंत हा काकानु? पोलीसात हा म्हणून जीव थोडो पाठीफुडे होता हा.”

“अगे! तोय येतलो हा ना पारीक बघूक चार दिवसानी, बघूया कसो हा तो. चार गोष्टी बोलल्यार समजातच ना? तेवा सांगतय तुका.”

“ह्या बरा बोललात, पण सगळा इचारा. दारू बिरू पिणारो नको.”

“हा बघतंय.”

म्हणजे पारीच्या लग्नाचा घाट घातला होता तिच्या भावाने.

चार दिवसानी एक उंचापुरा, भरभक्कम तरुण पारीच्या भावाबरोबर आला. वडील आणि त्यांची बोलणी चालली होती, मला प्रवेश नव्हता. ते जायला निघाले तेव्हा वडील म्हणाले, “भिमा पावण्याक घेवन ये उद्या. कोंबड्याची सागुती नी वडे करूया.”

दुसऱ्या दिवशी कोंबड्याची सागुती झाली. नवऱ्यामुलाचे आडनाव सावंत होते. कोकणातलाच होता. बोलता बोलता वडील म्हणाले, “पावण्यानु कोंबडीची सागुती केली हा, पण तेच्या आधी पाणी बिणी पिवची आमची पद्धत नाय. तुम्ही मुंबयकर तेय पोलीसातले, तुमका लागत आसात पण हय नाय गावचा. तेवढा माफ करा आमका.”

“अहो मी पण पीत नाही. पोलीसात आहे खरा पण कधीच कुठली नशा केली नाही. पोलीसात नाव आहे. आता हवालदार आहे, पण दोन वर्षात ए. एस्. आय. होईन. बाहेरून बी ए करतोय. या वर्षी पास झालो की पुढच्या वर्षी मार्ग मोकळा होईल.”

वडील मिस्कील हसत होते. पारीच्या आईचे शंका निरसन करायला पाहिजे ती माहिती त्यांनी सहज पदरात पाडून घेतली होती. पारीचा भाऊ आणि पाहुणे दोन दिवसात मुंबईला गेले.

पारीच्या आईला वडील म्हणाले, “डोळे झाकून पोरगी दी हेका. सरळ माणूस हा, पीत बीत काय नाय. काय काळजी नको करू.”

चार महिन्यात सराईवर पारीचे लग्न झाले. पुढच्या वर्षी मी शिकायला बाहेर पडलो. पाच वर्षे शिक्षण व नंतर नोकरी करता करता कित्येक वर्षे उलटली. माझी नोकरी मुंबईत होती. एक दिवशी पारीचा भाऊ भिमा समोर आला. अचानक भेट झाली. मिल बंद झाल्यामुळे तो अडचणीत आला होता. कायम गावी जायचा विचार त्याने सांगीतला. आणि मला पारी आठवली. विचारताच त्याने सविस्तर माहिती दिली. ती अंधेरीला पोलीस क्वार्टरमधे रहात होती. पत्ता घेतला म्हटलं पाहू कधी वेळ मिळाला तर जाऊन येवू.

एका रविवारी ठरवून निघालो. पारीच्या घरी पोचलो. पस्तीशी उलटलेल्या एका बाईने दार उघडले. नाकावरून पटकन

ओळखता आले ही पारी. विचारले, “पारी ना ग तू, ओळखलेस?”

तिच्या नजरेतील अनोळखी भाव पटकन नाहीसा झाला. पारीने एकदम सुरू केले, “बाबू ना. ओळखलं मी. पहिल्यांदा नाय ओळखलं पण आता ओळखलं. कुठे असतोस? काय करतोस? बस हा! यांना बोलवून आणते. त्यांनाही आनंद होईल” एवढे बोलत ती निघाली देखील.

मी घरात नजर फिरवली. नजर लागेल अशी टापटीप व व्यवस्थित सजवलेलं घर होतं. मला पहिला धक्का बसला तो पारीच्या बोलण्याचा ढंग पाहून. कोकणी हेल मधुनच डोकावणारी शुद्ध मराठी भाषा ती बोलत होती. एकही शिवी अजून तरी ऐकली नव्हती. आता ती एखाद्या संस्कारी, गृहिणीच्या भूमिकेत शिरली होती.

दहा मिनीटात ती आणि तिचा नवरा दोघेही आले. इन्स्पेक्टरच्या ड्रेस मधे तो एकदम रुबाबदार दिसत होता. मला बघून आनंदित झाला. आमच्याकडे यायचे आमंत्रण मी दिले. पुढच्या रविवारी जेवायचे आमंत्रण मला देत म्हणाला, “आत्ता तुमच्याकडचे राहू द्या. परत केव्हातरी ठरवू. येते दोन महिने बंदोबस्ताची फार कामे लागली आहेत. ती आटोपली की ठरवू तुमच्याकडचा प्रोग्रॅम. येत्या रविवारी तुम्ही या आमच्याकडे जेवायला. आता मला बंदोबस्ताची ड्यूटी लागलीय, निघायला

हवं. तुम्ही बसा गावच्या गप्पा मारत." एवढे बोलून घाईत निघून पण गेला.

"बाबू! किती वर्षांनी भेटतोय रे. पंधरा सोळा वर्ष तरी झाली असतील नाही?"

एवढ्यात आरडाओरड करत तीन मुलं घरात शिरली. मला पाहून चपापली व गप्प झाली. पारी म्हणाली, "अरे इकडे या. हे बाबूमामा. आजीच्या गावाहून आलेत. नमस्कार करा त्यांना."

एवढा वेळ मनातली गावची पारी आणि आत्ताची ही पारी यांची तुलना करता करता मी विसरूनच गेलो होतो. बॅगेतून चॉकलेट काढून तिघानाही दिली. मिठाईचा पुडा काढून पारीला दिला. तासभर गप्पा मारल्या. पारी चहा करायला गेली तेव्हा भूतकाळ व वर्तमान दोन्ही एकदमच डोळ्या समोर आले. ती पारी आणि ही पारी किती फरक होता. गेल्या दोन तासात एकपण शिवी ऐकली नव्हती. स्वच्छ भाषा, कमरेला गुंडाळलेल्या बोंगेवाल्या साडीच्या जागी नीटनेटकी नेसलेली गोल साडी, बोलण्यात आलेले मार्दव, चित्रच बदलले होते.

चहा घेऊन आली तसा मी एक चिमटा काढला, "पारी शिव्या विसरलीस वाटतं?"

हातभर जीभ बाहेर काढत ती म्हणाली, "शी! कशी होते नाही रे मी? आज आठवलं की माझीच लाज वाटते. सगळं विसरून जावं वाटतं. आठवण पण देऊ नकोस त्याची."

माझ्या मनातल्या कॅनव्हास वर गावच्या पारीचं चित्र अगदी ठसठशीत रंगलं होतं. आता बाजूला दुसरा कॅनव्हास तयार होत होता. त्याच्यावर ही नीटनेटकी, मुंबईच्या पाण्यावर उजळलेली, मुला संसारात रमलेली कुटुंबवत्सल पारी हळू हळू रंगू लागली होती. बाजूला तिला बिलगलेली तिची तीन गोंडस पाडसं देखील रंगत गेली.

तिने राग सांडला होता. शिव्या विसरली होती. सात्विकतेचा रंग त्या चित्रात भरत होता. विनोदी, हंसरी झाली होती. चैतन्याचा रंग भरत होता. कसे आणि किती रंग माझ्या हातून भरले गेले ते मलाच समजले नाहीत.

दोन्ही कॅनव्हास डोळ्यासमोर आणून मी पहात बसलो. नाक, डोळे, चेहरा यांची ठेवण सोडल्यास दोनात कांहीच साम्य नव्हते.

मनाच्या कॅनव्हास वरच्या या दोन्ही पारी एकच असुनही दोन वेगळी वेगळी व्यक्तिचित्रे रंगली होती. या चित्रांचा रंगारी बनण्याचं अतीव समाधान मला मिळत होतं.

*****

## अरुण कुळकर्णी यांची इतर पुस्तके

१. श्रद्धा संस्कार संस्कारक्षम श्लोकांचा संग्रह. (प्रिंट व डिजिटल)

२. इनामदारीण कादंबरी (प्रिंट व डिजिटल)

३. एकटे जीव कथासंग्रह (प्रिंट व डिजिटल)

४. मैत्रबंध कथासंग्रह (फक्त डिजीटल)

५. तीन शिल्पकार दीर्घकथा (फक्त डिजीटल)

६. त्रिवेणी संगम दीर्घकथा (फक्त डिजीटल)

७. थोडे हसू थोडे आसू कथासंग्रह (प्रिंट व डिजिटल)

सर्व डिजिटल पुस्तके www.esahity.com वर फ्री वाचायला मिळतील.


पुस्तके मिळवण्या साठी खालील पत्यावर संपर्क करावा....


प्रिंट प्रकाशक व वितरक-


सुहास खोपकर
सुहास्यरेखा प्रकाशन
३, नंदधाम डुप्लेक्स
मांजलपूर, वडोदरा- ३९० ०११
संपर्क – ९०९९९ २५९६८


श्री अरूण कुळकर्णी यांची ई साहित्यवरील इतर पुस्तके.


कव्हरवर क्लिक करताच उघडतील









तीन शिल्पकार
अरुण कुलकर्णी


थोडे... हसू... थोडे... आसू


श्रद्धा संस्कार

## ई साहित्य प्रतिष्ठानचे हे १३ वे वर्ष.
## अरुण कुळकर्णी यांचे ईसाहित्यवर हे आठवे पुस्तक.

अरुण कुळकर्णी खरे तर चित्रकार व्हायचे. त्यांच्या कथा म्हणजे रंगांची उधळण असते. मानवी मनातल्या भावतरंगांचे रंग ते नेमके टिपतात आणि ती ती छटा त्यांच्या शब्दांतून व्यक्त होते. त्यांची कथा वाचक वाचत नाहीत, पहातात. एखाद्या चित्रपटासारखी. पण चित्रपट द्विमितीत असतो आणि अरुण कुळकर्णींच्या कथांना तिसरी मिती असते. त्यांच्या व्यक्ती आपल्या आयुष्याचा भाग होतात. मग ती इनामदारीण असो, तीन शिल्पकारांतले ते ग्रामीण कुटुंब असो की मैत्रबंधांतली इवली मैत्रीण.

अरुण कुळकर्णी यांची पुस्तके नामवंत प्रकाशकांनी छापून प्रसिद्ध केली आहेत. पण त्यांनी आपली सर्व पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य दिली. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ.

मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(९), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(८), डॉ. नितीन मोरे (२८), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (६), अशोक कोठारे (५० खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १७ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(१९), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (८), अंकुश शिंगाडे(११), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(३) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(६) दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(८) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे

उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं ’इ’यें ।

दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।

आपले आयुष्य लहानपणापासून मित्रांनी हळू हळू भरत असते. असे मित्र की वर्षे उलटली तरी मनाच्या कोपऱ्यात दडून बसलेले असतात. काही व्यक्ती त्यांच्या वेगळेपणामुळे घोळत रहातात. केव्हातरी हळूच स्मृतिपटलावर येतात आणि त्या जुन्या दिवसांची आठवण देऊन जातात. पुनःप्रत्ययाचा एक अप्रतीम आनंद उपभोगायला मिळतो. कधी खळखळता हसरा तर कधी अंतर्मुख करायला लावणारा.

अशा कित्येक व्यक्ती माझ्या स्मरणातल्या, आज त्यांना तुमच्या समोर जिवंत करता येतात का? त्याचा हा प्रयोग.

गावं वेगळी, बोली वेगळ्या, जीवनशैलीही वेगळी तरी देखील त्यांनी आठवणींचा फेर धरला. तो तसाच रंगवलाय. या व्यक्तींचा रंगारी होण्याचा अद्वितीय आनंद जो मला मिळाला तो तुम्हालाही मिळाला का?

जरूर कळवा.

अरुण कुळकर्णी
संपर्क
७३५९२१२२११ किंवा ७२२८८८४०३०
Arungk1943@gmail.com